सेठ हिराचंद नेमचंद जैन अध्यासन

पुणे विद्यापीठ

# जैन विचारधारा
('सकाळ' वृत्तपत्रासाठी ४९ लघुलेख)

# जैन दृष्टीने गीता
('लोकमत' वृत्तपत्रासाठी ४९ लघुलेख)

भाग – २

सन्मति–तीर्थ प्रकाशन
नोव्हेंबर २०१०

डॉ. नलिनी जोशी

सेठ हिराचंद नेमचंद जैन अध्यासन
पुणे विद्यापीठ

* दोन लघुप्रकल्प *
(२००९-२०१०)

# जैन विचारधारा
('सकाळ' वृत्तपत्रासाठी ४९ लघुलेख)

# जैन दृष्टीने गीता
('लोकमत' वृत्तपत्रासाठी ४९ लघुलेख)

डॉ. नलिनी जोशी
प्राध्यापिका, जैन अध्यासन

सन्मति-तीर्थ प्रकाशन
नोव्हेंबर २०१०

**⁕ जैन विचारधारा ; जैन दृष्टीने गीता**

**⁕ संपादक**
नलिनी जोशी

**⁕ संपादन सहाय्य**
अनीता बोथरा
कौमुदी बलदोटा

**⁕ प्रकाशक**
सन्मति-तीर्थ (प्राकृत व जैनविद्या संशोधन संस्था)
८४४, शिवाजीनगर, बी.एम्.सी.सी.रोड
फिरोदिया होस्टेल, पुणे - ४११००४
फोन नं. - (०२०) २५६७१०८८

**⁕ सर्व अधिकार सुरक्षित**

**⁕ प्रकाशन : नोव्हेंबर २०१०**

**⁕ प्रथम आवृत्ति - १०००**

**⁕ मूल्य : रु. १५०/-**

**⁕ अक्षर जुळवणी - अजय जोशी**

**⁕ मुद्रक : कल्याणी कॉर्पोरेशन**
**१४६४, सदाशिव पेठ**
**पुणे - ४११०३०**
**फोन नं. - (०२०) २४४७१४०५**

## जैन विचारधारा

### मनोगत

हिंदू, जैन आणि बौद्ध हे भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीतील तीन मुख्य विचारस्रोत आहेत. त्यापैकी हिंदू आणि बौद्ध विचारप्रवाहांचा परिचय सामान्य माणसाला बऱ्याच अंशी झालेला असतो. त्या तुलनेने जैन तत्त्वज्ञान, भाषासाहित्य, कला आणि इतिहास यांची ओळख अतिशय कमी असते. जैनविद्या (जैनॉलॉजी) ही एक संपूर्ण ज्ञानशाखा आहे. 'तिचा परिचय करून देण्यासाठी वृत्तपत्रासारख्या सशक्त माध्यमाचा उपयोग करून घेतला पाहिजे', हा विचार अनेक वर्षे मनात घोळत होता. पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या जैन अध्यासनात प्राध्यापिका म्हणून मानद नियुक्ती झाल्यानंतर या विचाराने अधिकच जोर धरला. गेल्या दोन तपातील अखंड वाचन, चिंतनातून प्रस्तुत 'जैन विचारधारा' उद्भूत झाली.

मा. अभयजी फिरोदिया यांनी 'जैन विचारधारा' सकाळ वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रसिद्ध व्हावी म्हणून विशेष प्रयत्न केले. गुरुपौर्णिमा ते ऋषिपंचमी (जुलै-सप्टेंबर २००९) ह्या ४९ दिवसात ती सकाळ वृत्तपत्रात क्रमाने प्रसिद्ध झाली. अनेक अनुकूल आणि काही प्रतिकूलही प्रतिसाद आले. एकूण अनुभव उत्साहवर्धक होता.

२०१० सालचा जून महिना उजाडल्यावर जैन धर्माशी संबंधित असलेल्या विषयांवर स्फुटलेखन करावे अशी इच्छा पुन्हा एकदा मनात निर्माण झाली. लोकमत वृत्तपत्राचा वाचक वेगळा असल्याने लोकमतकडे जैन अध्यासनाच्या तर्फे एक लेखयोजना पाठविली. जैन आणि जैनेतर दोघांनाही रस वाटण्याच्या दृष्टीने विषयाची निवड केली. गीतेसारख्या लोकप्रिय ग्रंथात व्यक्त झालेल्या तत्त्वज्ञानात्मक विचारांची जैन दृष्टिकोणातून समीक्षा करावी असे वाटते. सन्मति-तीर्थच्या विद्यार्थिनींबरोबर वेळोवेळी झालेल्या चर्चेमुळे ५० वेगवेगळ्या मुद्यांवर आपल्याला लिहिता येईल, असा विश्वास वाटला. लोकमतच्या संपादकांनी लेखांच्या परियोजनेचे चांगले स्वागत केले. २०१० च्या गुरुपौर्णिमा ते ऋषिपंचमी या ४९ दिवसांच्या कालावधीत लेखमाला प्रसिद्ध झाली. त्या लेखांवर आलेल्या प्रतिक्रियांसंबंधी 'उपसंहार' व 'आवाहन' या शीर्षकांच्या शेवटच्या दोन लेखात विस्ताराने माहिती दिली आहे. ती कृपया वाचकांनी वाचावी.

या दोन्ही लेखमाला पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची इच्छा मा. अभयजी फिरोदिया यांनी व्यक्त केली. त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे व आर्थिक सहाय्यामुळे हे पुस्तक वाचकांच्या हातात पडत आहे.

पुस्तकाच्या लेखनापासून ते वितरणापर्यंत या प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्वांविषयी हार्दिक ऋण व्यक्त करते.

डॉ. नलिनी जोशी
जैन अध्यासन प्रमुख
पुणे विद्यापीठ

* जैन विचारधारा *

लोकमत वृत्तपत्रासाठी

जैनविद्येच्या विविध अंगांवर प्रकाश टाकणारे ४९ लघुलेख

कालावधी : गुरुपोर्णिमा, २४ जुलै २०१०

ते

ऋषिपंचमी, १२ सप्टेंबर २०१०

## अनुक्रमणिका
## जैन दृष्टिकोणातून भगवद्गीता


१) प्रस्तावना
२) जैन परंपरा आणि महाभारत
३) जैन परंपरेत अरिष्टनेमि आणि कृष्ण वासुदेव
४) जैन महाभारतात गीताच नाही !!
५) व्यवहार आणि निश्चयनयाची गल्लत
६) देव-मनुष्य संबंध (१)
७) देव-मनुष्य संबंध (२)
८) इंद्रिय-मन-बुद्धि-आत्मा : उत्तरोत्तर श्रेष्ठता
९) स्वधर्म-परधर्म
१०) 'सर्व धर्मांचा परित्याग करून मला एकट्यास शरण ये'
११) गीतेतील वेदविषयक विचार (१)
१२) गीतेतील वेदविषयक विचार (२)
१३) वेदविषयक जैन उल्लेख (१)
१४) वेदविषयक जैन उल्लेख (२)
१५) सिद्धानां कपिलो मुनि:
१६) तेजस्वितेची दखल
१७) उद्धरेत् आत्मना आत्मानम्
१८) तत्त्वज्ञानातील प्रतिमासृष्टी (भाग १)
१९) तत्त्वज्ञानातील प्रतिमासृष्टी (भाग २)
२०) तत्त्वज्ञानातील प्रतिमासृष्टी (भाग ३)
२१) युद्धाचे रूपक (१)
२२) युद्धाचे रूपक (२)
२३) गीतेतील यज्ञ : जैन समीक्षेसह (१)
२४) गीतेतील यज्ञ : जैन समीक्षेसह (२)
२५) गीतेतील यज्ञ : जैन समीक्षेसह (३)
२६) जैन ग्रंथातील यज्ञविचार (१)
२७) जैन ग्रंथातील यज्ञविचार (२)
२८) गीतेतील विश्वरूपदर्शन : पार्श्वभूमी
२९) विश्वरूपदर्शनाची जैन मीमांसा
३०) गीता आणि जैन परंपरेतील 'अद्भुतता'
३१) 'कर्म' कशाला म्हणतात ?
३२) कर्मण्येवाधिकारस्ते
३३) कर्मांचा लेप आणि आवरण
३४) कर्मांचा बंध
३५) कर्मबंधाचे प्रकार

## अनुक्रमणिका
## जैन दृष्टिकोणातून भगवद्‌गीता


**३६)** कर्मबंधाचे हेतू (कारणे) (१)
**३७)** कर्मबंधाचे हेतू (कारणे) (२)
**३८)** गीता कर्मपरक आहे आणि जैन धर्म ?
**३९)** यदा यदा हि धर्मस्य
**४०)** गीतेत तपाचे स्थान
**४१)** जैन आचारशास्त्रात तपाचे स्थान
**४२)** श्रद्धावान् लभते ज्ञानं
**४३)** श्रद्धा-ज्ञान-आचरण परस्परसंबंध
**४४)** दैवी संपदा आणि दशविध धर्म
**४५)** आचारांग, उपनिषदे आणि गीता (१)
**४६)** आचारांग, उपनिषदे आणि गीता (२)
**४७)** भक्ती : गीतेतील आणि जैन परंपरेतील (१)
**४८)** भक्ती : गीतेतील आणि जैन परंपरेतील (२)
**४९)** उपसंहार
**५०)** आवाहन


**********

## जैन दृष्टिकोणातून भगवद्‌गीता

### लेखांक १ : प्रस्तावना

गेली २५ वर्षे जैनविद्या आणि प्राकृतच्या प्रसाराला वाहिलेली 'सन्मति-तीर्थ' ही 'पुणे विद्यापीठ मान्यताप्राप्त संस्था' पुण्यात कार्यरत आहे. ती प्रामुख्याने संशोधनसंस्था असली तरी जैनविद्या आणि प्राकृतचे मूलभूत प्राथमिक ज्ञान देण्यासाठी ती सदैव कटिबद्ध आहे. जैनविद्या (जैनॉलॉजी, जैनिझम्) आणि प्राकृतचे श्रेणीबद्ध पाठ्यक्रम प्रत्येकी ५-५ वर्षे चालतात. त्यानंतर अनेक प्रगत पाठ्यक्रमांचीही व्यवस्था आहे. कोणत्याही शाखेत पदवी प्राप्त केलेला विद्यार्थी, हे पाठ्यक्रम पूर्ण केल्यावर एम्.ए (प्राकृत, जैनॉलॉजी) अधिक प्रभावीपणे करू शकतो. नंतर या क्षेत्रात अधिक समर्थपणे संशोधनकार्यही करू शकतो. आजपर्यंत पुणे व संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थ्यांनी (मुख्यत: विद्यार्थिनींनी) असे मूलभूत पाठ्यक्रम अत्यंत आवडीने व यशस्वीपणे पूर्ण केले आहेत. सन्मति-तीर्थच्या निरलसपणे कार्य करणाऱ्या ३० शिक्षिकांचा एकसंध समुदाय यासाठी झटतो आहे.

प्रसिद्ध उद्योजक स्व.नवलमलजी फिरोदिया यांच्या भक्कम पाठिंब्यावर १९८६ पासून या संस्थेचा आरंभ झाला. आज त्यांचे सुपुत्र मा. अभय फिरोदिया, संस्थेचे आधारस्तंभ आहेत. या संस्थेने तयार केलेले जैनविद्येचे अभ्यासक्रम पूर्णत: शैक्षणिक स्वरूपाचे आहेत. त्यात कर्मकांड आणि सांप्रदायिकता यांचा पूर्ण अभाव आहे. जैन परंपरेचा इतिहास, तत्त्वज्ञान, साहित्य आणि कला या चार दृष्टिकोणातून शुद्ध ज्ञानाची येथे उपासना केली जाते. विद्यार्थिवर्ग मुख्यत: जैनधर्मी असला तरी अनेक जैनेतरांनीही त्याचा लाभ घेतला आहे.

जैनविद्येचे (आठवड्यातून एकदा २ तास) याप्रमाणे सलग १२-१५ वर्षे अध्ययन केलेले अंदाजे १०० विद्यार्थी पुण्यात आहेत. हे कोर्सेस् केल्यानंतर, अर्थोपार्जनाची शक्यता नसतानाही, त्यांनी दाखविलेली ज्ञानलालसा आजच्या युगात अपवादात्मकच मानावी लागेल.

'जैन दृष्टिकोणातून भगवद्‌गीता'- या विषयाची एवढी प्रस्तावना कशासाठी ? कारण-सन्मति-तीर्थच्या अंदाजे ६० विद्यार्थिनींनी अत्यंत औत्सुक्याने, सलग ३ वर्षे गीतेतला एक-एक श्लोक वाचून, मन लावून अभ्यास केला. महिन्याच्या शेवटच्या शनिवारी 'गीतेची जैन दृष्टीने समीक्षा'-या विषयावर अनेक चर्चासत्रे झाली. 'सन्मति-तीर्थ'चे ब्रीदवाक्य आहे-'पण्णा समिक्खए धम्मं' अर्थात्, 'प्रज्ञेने धर्माची परीक्षा करा.' त्यानुसार गीतेची पार्श्वभूमी, महाभारतीय युद्ध, अर्जुनविषादयोग आणि क्रमाने गीतेचे अध्याय - या सर्वांची विद्यार्थिनींनी खूप साधकबाधक, उद्‌बोधक चर्चा केली. चर्चा इतकी प्रभावी होती की लेखमालेच्या रूपाने ती वृत्तपत्रात यावी असे 'जैन-अध्यासन-प्रमुख' या नात्याने मला वाटले. त्याप्रमाणे ५० लघुलेखांच्या द्वारे, गुरुपौर्णिमेच्या दिवशी या लेखमालेचा आरंभहोतो आहे. वाचकांना ती आवडेल याची खात्री आहे.

'''गीता' हा हिंदू धर्मीयांचा प्रातिनिधिक ग्रंथ आहे की नाही ?''-याविषयी अभ्यासकांमधे मतभेद असू शकतात ; परंतु गीतेची लोकप्रियता देश-विदेशात एवढी अफाट आहे की गीतेवर आधारित ग्रंथांचे एक मोठे संग्रहालय बनू शकते, नव्हे-अशी संग्रहालये उपलब्ध आहेत.

जैन परंपरा ही आपल्याच देशात प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली एक समृद्ध श्रमण परंपरा आहे. जैन तत्त्वज्ञान, कर्मसिद्धांत, विश्वस्वरूप आणि ज्ञानमीमांसा यांच्या पार्श्वभूमीवर 'गीता कशी दिसते ?'-याचा आलेख या लेखमालेत आहे. वैचारिकतेला यात प्राधान्य आहे. ''दृष्टिकोण बदलला की त्याच घटना कशा वेगळ्या दिसू शकतात''-हे या लेखमालेतून सांगायचे आहे. इतर कोणताही हेतू नाही, हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

**********

**जैन दृष्टिकोणातून भगवद्‌गीता**

## लेखांक २ : जैन परंपरा आणि महाभारत

'महाभारत हा ग्रंथ घरात ठेवू नये, कारण घराचं महाभारत होतं', हा समज कोणी, कसा आणि केव्हा पसरवला, हे एक गूढच आहे. हिंदूधर्मीय म्हणून गणल्या जाणाऱ्या घरांमधेही या मताचा आदर केला जात होता. अजूनही काही लोक महाभारत आणि त्याचं भाषांतर घरात ठेवणं अशुभ मानतात.

जैन लोकांचं तर विचारूच नका. परवाच माझी जैन मैत्रिण सांगत होती की रथावर आरूढ झालेल्या, कृष्ण आणि अर्जुन यांचं, उत्कृष्ट भरतकाम असलेलं चित्र, तिच्या घरातल्या ज्येष्ठ व्यक्तीनं काढून टाकायला लावलं.मग महाभारत ग्रंथ घरात ठेवण्याची तर गोष्टच नको !

''तौलनिक अभ्यास करण्यासाठी आपण जैनविद्येच्या अंतर्गत गीता शिकू या'', असा विचार मांडताच, सन्मति-तीर्थच्या पुण्याबाहेरच्या केंद्रातून तीव्र प्रतिक्रिया आल्या. 'अर्जुनाला युद्धास प्रवृत्त करून, प्रचंड हिंसा घडवून आणणारा हा हिंसोपदेशक ग्रंथ जैनांनी वाचू नये, शिकूही नये'; 'नंदीसूत्र नावाच्या अर्धमागधी ग्रंथात याला 'मिथ्याश्रुत' म्हटले आहे. म्हणून हे पाखंड शिकू नये'-असेही एक मत व्यक्त केले गेले.

नंदीसूत्रातला उल्लेख काढून पाहिला तर असं दिसतं की ब्राह्मण परंपरेतल्या 'वेद, रामायण, भारत, पातंजलशास्त्र, भागवत' अशा अनेक ग्रंथांना तिथं 'मिथ्याश्रुत' म्हटलं आहे. परंतु त्याच परिच्छेदाच्या अखेरीस असंही म्हटलं आहे की, हे ग्रंथ मिथ्यादृष्टीनं शिकल्यास 'मिथ्याश्रुत' आहेत परंतु 'सम्यक् दृष्टीनं' शिकल्यास 'सम्यक् श्रुत' आहेत. म्हणजे आपली तात्त्विक बैठक स्थिर ठेवून 'साहित्य म्हणून असलेली उपरोक्त ग्रंथांची वाचनीयता' जैनांनाही मान्य असलेली दिसते.

वर उल्लेखलेला 'नंदीसूत्र' ग्रंथ, प्राकृत इतिहासात सुप्रसिद्ध 'वसुदेवहिण्डी' हा ग्रंथ, हरिभद्रकृत 'धूर्त्ताख्यान' हा ग्रंथ, उद्योतनसूरिकृत 'कुवलयमाला' नावाचं चम्पूकाव्य-या सर्व प्राकृत ग्रंथांत महाभारताचा उल्लेख 'भारत' (भारह) या नावाने येतो.

आपल्याला माहितच आहे की महाभारताची एकूण तीन संस्करणे झाली. त्यापैकी दुसऱ्या संस्करणाचे नाव 'भारत' आहे. जैन इतिहास आणि महाभारताचा कालनिर्णय करणारे अभ्यासक यांच्या मतांवर नजर टाकली तर आपण म्हणू शकतो की, भ.महावीरांच्या कार्यकाळात 'महाभारता'चे दुसरे संस्करण चालू होते. आज आपल्यासमोर असलेले महाभारत (की जे सामान्यत: एक लाख श्लोकांचे आहे) भ.महावीरांच्या काळात प्रचलित नव्हते. म्हणूनच जैन साहित्यात 'भारत' नावाचे प्रचलन दिसते. तसेच आज उपलब्ध असलेल्या महाभारतावर जैन आणि बौद्ध विचारांचा प्रतिक्रियात्मक पगडा जाणवतो-असे मत लो.टिळकांनी व इतर अभ्यासकांनीही नोंदवून ठेवले आहे.

जैनांनी महाराष्ट्री, संस्कृत आणि अपभ्रंश भाषेत संपूर्ण रामायणाची रचना केलेली दिसते. अर्थात् त्यात भरपूर जैनीकरण व बदल आहेत. जैन परंपरेत महाभारतासंबंधी पौराणिक महाकाव्ये लिहिण्याचा आरंभ ८ व्या शतकातील जिनसेनकृत संस्कृत 'हरिवंशपुराणा'ने झाला. त्यानंतर 'हरिवंशपुराण', 'यदुवंशचरित', 'अरिष्टनेमिचरित' अशा नावाचे अनेक ग्रंथ मुख्यत: दिगंबर आचार्यांनी संस्कृत व अपभ्रंश भाषेत रचले. तेराव्या शतकानंतर 'पाण्डवपुराण', 'पाण्डवचरित' अशा नावांचे संस्कृत ग्रंथही लिहिले.

या ग्रंथांना आपण 'जैन महाभारत' म्हणू शकतो परंतु यातील बहुतांशी ग्रंथांत अरिष्टनेमि आणि श्रीकृष्ण यांना केंद्रस्थानी ठेवून रचना केलेली दिसते. एकमेकांना छेद देणाऱ्या अनेक जीवनपटांनी व्यामिश्र बनलेल्या व्यासकृत महाभारतासारखे 'जैन महाभारतां'चे स्वरूप नाही. विशेष म्हणजे 'महाभारत' हा शब्द त्यांनी कटाक्षाने टाळलेला दिसतो.

अरिष्टनेमि आणि श्रीकृष्ण यांचे जैन परंपरेतील स्थान उद्याच्या लेखात पाहू.

**********

## जैन दृष्टिकोणातून भगवद्‌गीता

### लेखांक ३ : जैन परंपरेत अरिष्टनेमि आणि कृष्ण वासुदेव

जैन परंपरेत अरिष्टनेमि (प्राकृत-रिट्ठणेमि/अरिट्ठनेमि) हे २४ तीर्थंकरांपैकी २२ वे तीर्थंकर आहेत. लो.टिळकांनी 'गीतारहस्या'च्या प्रस्तावनेत महाभारतीय युद्धाचा काळ इ.स.पू.२४०० असा मानला आहे. जैन परंपरेनेही कृष्ण वासुदेव आणि अरिष्टनेमींचा काळ इ.स.पू. १४०० मानावयास प्राय: काही हरकत दिसत नाही. महाभारतात श्रीकृष्णाला उपदेश करणारे 'घोर अंगिरस ऋषि' म्हणजे अरिष्टनेमि होत-असे अभ्यासकांचे मत आहे.

जैन इतिहासानुसार, 'शौर्यपुर' अथवा 'शौरिकपुर' येथे हरिवंशातील (यदुकुळातील) 'अंधकवृष्णि' राजास 'समुद्रविजय' हा ज्येष्ठ पुत्र होता आणि 'वसुदेव' हा कनिष्ठ पुत्र होता. समुद्रविजयाला दोन पुत्र होते-अरिष्टनेमि आणि रथनेमि. वसुदेवास दोन पुत्र होते-कृष्ण (वासुदेव) आणि बलराम.

'वसुदेव' या व्यक्तिरेखेला जैन पुराणात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. महाभारतातील वसुदेवाची व्यक्तिरेखा त्यामानाने धूसर आहे. वसुदेव अतिशय सुंदर होता. त्याला अप्रतिम गायन-वादनकला अवगत होती. नगरानगरात फिरण्याचा त्याला छंद होता. नगरस्त्रिया त्याच्याकडे आकृष्ट होत. म्हणून त्याच्या पित्याने त्याच्या स्वैरसंचारावर नियंत्रण आणले. त्याने एके रात्री वेषांतर केले व तो बाहेर पडला. 'वसुदेवहिंडी' (महाराष्ट्री प्राकृत ग्रंथ-६ वे शतक) या ग्रंथाची पार्श्वभूमी अशी आहे. त्याने १०० वर्षे (?) भ्रमण केले आणि १०० विवाह (?) केले. हा सर्व भ्रमणवृत्तांत 'वसुदेवहिंडी'त अंकित करण्यात आला आहे.

दक्षिण महाराष्ट्रात, मोरपीसांचा मुकुट चढवून, नाचत-गात भ्रमण करणारी जी 'वासुदेवां'ची लोकपरंपरा आहे त्याचे धागेदोरे जैन इतिहासातील 'वसुदेव' चरित्राशी असे अचानक जुळतात. 'वसुदेवहिंडी' ग्रंथ महाराष्ट्री भाषेत असणे हाही निव्वळ योगायोग मानता येत नाही. असो.

मुख्य कथाभाग असा की अरिष्टनेमि हे कृष्णाचे मोठे चुलतबंधू होते. आरंभापासूनच ते विरक्त वृत्तीचे होते. त्यांना राज्यकारभारात आणि संसारात गुंतविण्यासाठी कृष्ण वासुदेवाने त्यांचा विवाह उग्रसेनाची कन्या 'राजीमती' हिच्याशी ठरविला. विवाहासाठी कन्यागृही जात असताना त्यांना, मेजवानीसाठी कोंडून ठेवलेल्या पशुपक्ष्यांचा कोलाहल ऐकू आला. त्यांचा वैराग्यभाव पूर्ण जागृत झाला. त्यांचा दृढनिश्चय बघून कृष्णाने त्यांच्या दीक्षेची तयारी केली. दीक्षेनंतर ते रैवतक (गिरनार) पर्वतात विहारासाठी निघून गेले. त्यांच्या वाग्दत्त वधूने-राजीमतीनेही दीक्षा घेतली. कृष्णाने तिलाही शुभेच्छा दिल्या. हा सर्व वृत्तांत 'उत्तराध्ययनसूत्र' नावाच्या ग्रंथात थोडक्यात आणि दिगंबर चरित-पुराण ग्रंथात विस्ताराने नोंदवलेला दिसतो.

'नायाधम्मकहा' आणि 'अंतगडदसा' या अर्धमागधी ग्रंथात महाभारतापेक्षा वेगळेच कृष्णचरित्र नोंदवलेले दिसते. द्रौपदीचे अपहरण, कृष्णाचे सहाय्य, पांडवांना दक्षिणेत पांडुमथुरा (मदुराई) वसविण्याची केलेली आज्ञा, कृष्णाचे ६ जुळे भाऊ, उशिरा जन्मलेला 'गजसुकुमार', कृष्णाच्या आयुष्याच्या अंतिम टप्प्यात द्वारकाविनाशाची कथा, अरिष्टनेमींचे तद्विषयक भविष्य, कृष्ण द्वैपायन मुनींचा शाप, कृष्णाच्या राण्या, नातू, पणतू-अशा अनेक घटना जैनांच्या कृष्णचरित्रात येतात. प्राकृत ग्रंथात श्रीकृष्णाचा उल्लेख सतत 'कण्हे वासुदेवे राया' असा दिसतो.

जैन परंपरेत आपल्याला मुख्यत: 'प्रौढ कृष्ण'च भेटतो. एखादा अपवाद वगळता त्याच्या बाललीला, खोड्या, गोप-गोपिका, बासरीवादन इ. घटनांचे विस्तृत वर्णन आढळत नाही. 'कृष्ण वासुदेव' हे व्यक्तिमत्व तत्कालीन राजनैतिक इतिहासात एवढे महत्त्वाचे होते की ६३ शलाकापुरुषांच्या प्रारूपात 'वासुदेव' हे विशिष्ट पदच गणलेगेले. प्रत्येक तीर्थंकरांच्या तीर्थातील वासुदेव-प्रतिवासुदेव जैन पुराणात सांगितले आहेत.

शूर योद्धा, मुत्सद्दी राजकारणी असलेला कृष्ण वासुदेव जैन परंपरेनुसार 'ईश्वर, परमात्मा, भगवान्' इ. विशेषणांनी संबोधलेला दिसत नाही. परंतु त्याचा विलक्षण प्रभाव, आंतरिक अनासक्ती लक्षात घेता भावी काळात तो 'अमम' नावाचा तीर्थंकर बनणार आहे-अशी भविष्यवाणी वर्तवलेली दिसते.

**********

## लेखांक ४ : जैन महाभारतात गीताच नाही !!

मागील लेखात आपण पाहिलेच आहे की महापुराण, हरिवंशपुराण, अरिष्टनेमिचरित इ. जे जैन ग्रंथ आहेत त्यांनाच 'जैन महाभारत' असे संबोधण्याचा प्रघात आहे. 'सुप्रसिद्ध महाभारतीय युद्ध जैनांनी वर्णिले आहे का ?'–या प्रश्नाचे उत्तर अर्थातच होकारार्थी आहे. गुणभद्राच्या उत्तरपुराणात (संस्कृत) आणि पुष्पदंताच्या महापुराणात (अपभ्रंश) महाभारतीय कौरव–पांडव युद्धाचे वर्णन केवळ दोन ओळीत संपवले आहे. स्वयंभूदेवांच्या 'रिट्ठणेमिचरिउ' ऊर्फ हरिवंशपुराणात जवळजवळ ५० संधी (अध्याय) युद्धवर्णनासाठी खर्ची घातले आहेत.

कौरवांनी पांडवांना दिलेली अन्यायाची आणि अपमानाची वागणूक, त्यांचा राज्यावरील हक्क अमान्य करणे, कृष्ण वासुदेवाने आणि संजयाने संधीचे (तहाचे) केलेले प्रयत्न कौरवांनी उर्मटपणे धुडकावून लावणे इ. सर्व वृत्तांत स्वयंभूदेवांनी विस्ताराने वर्णिला आहे. गीतेच्या अर्जुनविषादयोगात, अर्जुनाने ऐन युद्धारंभी कच खाणे, हात–पाय गाळणे, वैराग्याच्या गोष्टी करणे आणि दुसऱ्या अध्यायात कृष्णाने त्याला प्रथम कडक शब्दात आणि नंतर आत्मज्ञानाची जोड देऊन समजावणे–असे सारे चित्तथरारक, नाट्यमय, आकर्षक प्रसंग भरले आहेत.

युद्धवर्णन विस्तृतपणे लिहिणाऱ्या स्वयंभूदेवांच्या हरिवंशपुराणात मी या नाट्यप्रसंगाचा उत्सुकतेने शोध घेऊ लागले. डोळ्यात तेल घालून वाचले तरी 'अर्जुनविषाद'ही दिसेना आणि 'कृष्णाचा उपदेश'ही सापडेना. अरेरे !एवढी मोठी उपदेशाची संधी जैन आचार्यांनी गमावली कशी ? स्वयंभूदेवांच्या मते तह मोडला, युद्धाची जमवाजमव झाली, आपापल्या सोयीनुसार सैनिकांनी पक्ष निवडला, ठराविक दिवशी योग्य मुहूर्तावर युद्धाला प्रारंभ झाला. अठरा दिवस घनघोर युद्ध झाले. अंतिमत: पांडवांचा विजय झाला. कृष्णाच्या युक्त्याप्रयुक्त्या पांडवांना विजयासाठी उपयोगी पडल्या. बस्. स्वयंभूदेव व इतरही जैन आचार्यांनी गीतोपदेशास वावच ठेवला नाही.

गीताप्रकरण वगळण्याची संभाव्य कारणे पुढील असू शकतील –

१) जैन परंपरेत जेव्हा महाभारत पोहोचले त्या संस्करणात भीष्मपर्वात गीता नसावीच. ती नंतर कोणीतरी घातली असावी.

२) खूप काथ्याकूट होऊन अटळ ठरलेल्या महासंग्रामात अर्जुनासारख्या अस्सल क्षत्रियाने ऐनवेळी कच खाणे त्यांना मान्य नसावे.

३) १२ ते १६ व्या शतकात लिहिल्या गेलेल्या जैन पुराणकारांसमोर आजची गीता असेल तर कृष्णाने रणांगणावर ७०० श्लोकांचा केलेला उपदेश त्यांना असंभाव्य व हास्यास्पद वाटला असावा. तसाही रामायण–महाभारतातल्या असंभाव्य गोष्टींचा खरपूस समाचार जैन आचार्य हरिभद्र आणि विमलसूरि यांनी घेतला आहेच. रणांगणावरील अद्भुत विश्वरूपदर्शन तर त्यांना खूपच खटकले असावे.

४) कृष्ण वासुदेवासारख्या शलाकापुरुषाच्या तोंडी अनेकांच्या हिंसेला कारण ठरणारे 'तू युद्ध कर', हे वाक्य त्यांना घालावयाचे नसावे.

५) एकंदरीतच गीतेची वर्णाश्रमप्रधान चौकट, जवळजवळ प्रत्येक अध्यायात यज्ञाचे सांगितलेले महत्त्व, कृष्णाने प्रथमपुरुषी एकवचनी वाक्यांमधे अर्जुनाला दिलेली आश्वासने, विष्णूने युगानुयुगे अवतार घेऊन जगताचा केलेला उद्धार, वेगवेगळ्या अध्यायात सांगितलेले वेगवेगळे अध्यात्ममार्ग – यासारख्या अनेक गोष्टी त्यांना जैन तत्त्वज्ञानाच्या चौकटीत न बसणाऱ्या वाटल्या असाव्यात.

वाचकहो, ही यादी आणखी कितीतरी वाढवता येईल.

या सर्वांचा परिपाक म्हणजे जैन महाभारतातून म्हणजेच मुख्यत्वे कृष्णचरितातून भगवद्गीता या प्रकरणाला पूर्णपणे टाळलेले दिसते.

**********

## लेखांक ५ : व्यवहार आणि निश्चयनयाची गल्लत

या लेखमालेच्या पहिल्या लेखात म्हटल्याप्रमाणे जैन तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास असलेल्या विद्यार्थिनींनी ''अर्जुनाचा विषाद आणि श्रीकृष्णाने त्याला युद्धप्रवृत्त करणे'' या गोष्टींवर खूप साधकबाधक चर्चा केली. काहींचे म्हणणे असे की अनायासेच त्याला वैराग्य आले होतेतर कृष्णाने आग्रह का करावा ? जैन दृष्टीने वैराग्य, दीक्षा या मार्गाने गेल्यास आत्मकल्याणच होते.

काहींनी असे मत व्यक्त केले की जैन दृष्टीने बघता सुद्धा अर्जुनाने युद्ध करणेच योग्य होते. जैन धर्म काही क्षत्रियांनी अन्यायाचा प्रतिकार करण्यास मनाई करीत नाही. शिवाय पांडवांचे युद्ध हे 'अतिक्रमण' नव्हते तर 'स्वसंरक्षण' होते. 'अर्जुनाचे वैराग्य काही खरे नव्हे' हे कृष्णाने ओळखले होते. 'यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वार मपावृतम्' किंवा 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' अशासारखी फसवी वाक्ये योजून कृष्णाने अर्जुनाची परीक्षा पाहिली.तो त्याला भुलला.

जैन दृष्टीने वरील दोन्ही वाक्ये अयोग्य आहेत. 'युद्ध म्हणजे स्वर्गाचे उघडलेले दारच !' हे म्हणणे खरे नाही कारण युद्धात हिंसा आहे. त्याचा बंध आहे. तो कर्मबंध झाल्यावर कर्मनिर्जरा केल्याशिवाय स्वर्गप्राप्ती शक्य नाही शिवाय 'मेलास तर स्वर्ग आणि जिंकलास तर पृथ्वीचे राज्य' या वाक्यात 'पराजित होणे आणि जिवंत रहाणे' अशी शक्यता गृहीत धरलेली नाही. कृष्णाने पांडवांना जिंकवण्याचा पण करण्यासारखेच हे आहे.

धर्म, कर्तव्य, राज्याची लालूच इ. सर्व गोष्टी तरी ठीक आहेत कारण त्या निदान व्यवहारनयाच्या पातळीवर सांगितलेल्या आहेत. गीतेच्या दुसऱ्या अध्यायात देहाची नश्वरता आणि आत्म्याची अमरता सांगितली आहे. आपापल्या जागी या दोन्ही गोष्टी खऱ्या असतीलही परंतु 'तू मारले नाहीस तरी देह कधी ना कधी मरणारच आहे' आणि 'तुला आपण मारला असे वाटले तरी आत्मा अमर राहून देहांतराची प्राप्ती करणारच आहे'–ही विधाने एकाने दुसऱ्याला मारायला उद्युक्त करण्याच्या व्यावहारिक पातळीवर आणणे खूपच गैर आहे. 'अच्छेद्य, अदाह्य, अशोष्य, नित्य' इ. आत्म्याची विशेषणे निश्चयनयानुसार केलेले वर्णन आहे. अर्जुन एक सांसारिक पातळीवर जगणारा क्षत्रिय आहे. युद्धही व्यवहारपातळीवर चालले आहे. आध्यात्मिक पातळीवर जाऊन व्यावहारिक निर्णय घेण्याची गल्लत गीतेच्या दुसऱ्या अध्यायात दिसते.

जैन दृष्टीने शुद्ध आत्म्याचे वर्णन संयम, निवृत्ति व ध्यानास उपयोगी आहे, युद्धास नव्हे.

**********

## लेखांक ६ : देव-मनुष्य संबंध (१)

गीतेचा तिसरा अध्याय वाचत असताना देव-मनुष्य संबंधांवर प्रकाश टाकणारा एक श्लोक आढळून येतो. तो श्लोक (३.११) असा आहे -

देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु व: ।
परस्परं भावयन्त: श्रेय: परमवाप्स्यथ ।।

अर्थात् - ''तुम्ही यज्ञाच्या द्वारे देवतांचे भावन (उन्नति, प्रसन्नता) करा. ते देव (इष्ट, प्रिय भोग तुम्हास देऊन) तुमचे भावन करोत. अशा प्रकारे परस्पर सहकार्य करून दोघेही परम कल्याण प्राप्त करून घ्या.''

तिसऱ्या अध्यायातील हा श्लोक, 'यज्ञ करणे कसे श्रेयस्कर आहे', या पार्श्वभूमीवर लिहिलेला आहे. देव आणि मनुष्यांमधील सहकार्य भावनेचे दिग्दर्शन यातून होते.

देवयोनी, स्वर्गलोक, स्वर्गीय सुखोपभोग, पुण्यप्रकर्षाने होणारी स्वर्गलोकाची प्राप्ती यांचे वर्णन हिंदू (वैदिक) आणि जैन प्राय: समानतेने करतात. 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति' (गी.९.२१) असे गीतावचन आहे. जैन मतानुसारही देवयोनीतील जीव पुण्यभोगानंतर मनुष्य किंवा तिर्यंच (कीटक, पशु-पक्षी इ.) गतीत जन्म घेतात. गीतेतला 'मर्त्यलोक' सामान्यत: जैनांचा 'मध्यलोक' समजण्यास हरकत दिसत नाही. देव-मनुष्य संबंध मात्र जैन दर्शनात वेगळ्या प्रकारे मांडलेला दिसतो.

पहिली गोष्ट अशी की देव आध्यात्मिक दृष्ट्या चौथ्या गुणस्थानावर असतात. म्हणजेच आध्यात्मिक विकासाच्या १४ पायऱ्यांपैकी चौथ्या पायरीवर असतात. ते व्रत, संयम इ. धारण करून आपली आध्यात्मिक प्रगती करून घेऊ शकत नाहीत. मानव मात्र मिथ्यात्व ह्या प्रथम गुणस्थानापासून चौदाव्या म्हणजे 'अयोगिकेवली' गुणस्थानापर्यंत प्रगती करून घेऊ शकतात. मनुष्यजन्मातून सिद्ध-बुद्ध-मुक्त होऊ शकतात. हे सामर्थ्य देवांच्या ठायी नसते.

त्यामुळेच आध्यात्मिक दृष्ट्या प्रगत मनुष्यांना वंदन करण्यासाठी देव स्वर्गातून भूतलावर अवतरतात. जैनांच्या सुप्रसिद्ध 'भक्तामर' या संस्कृत स्तोत्रात आरंभीच म्हटले आहे की,

''भक्तामर-प्रणत-मौलि-मणिप्रभाणा-
मुद्योतकं दलित-पाप-तमो-वितानम् ।
सम्यक् प्रणम्य जिनपादयुगं युगादा-
वालम्बनं भवजले पततां जनानाम् ।।''

भवसागरात बुडणाऱ्या लोकांना जे आधाराप्रमाणे आहेत अशा जिनवरांच्या चरणांना वंदन करण्यासाठी साक्षात् देवही पृथ्वीवर येतात, असा आशय या श्लोकात व्यक्त केला आहे. दिव्य-विपुल भोग, भोगसाधने, इतकेच काय देवगतीची प्राप्तीही तुलनेने सोपी आहे. 'धर्मबोधि' किंवा 'धर्मलाभ' मात्र मानवी योनीतच शक्य आहे, असे जैनशास्त्रात म्हटले आहे.

दशवैकालिक सूत्रातील प्रथम गाथेत म्हटले आहे की, 'देवा वि तं नमंसंति, जस्स धम्मे सया मणो.'अर्थात् - ज्याच्या मनात अहिंसा-संयम-तपरूपी धर्माचे सदैव अस्तित्व असते अशा व्यक्तीला देवसुद्धा वंदन करतात.

**********

## लेखांक ७ : देव–मनुष्य संबंध (२)

जैन तत्त्वज्ञानातील सारभूत तत्त्वे संक्षेपाने सांगणारा ग्रंथ आहे ‘द्रव्यसंग्रह’. त्याच्या मंगलाचरणात म्हटले आहे की –

‘‘जीवमजीवं दव्वं जिणवरसहेण जेण णिद्दिट्ठं ।
देविंदविंदवंदं वंदे तं सव्वदा सिरसा ।।’’ (गाथा १)

या गाथेच्या दुसऱ्या ओळीत देवांच्या समूहाकडून वंदन केल्या जाणाऱ्या जिनश्रेष्ठींना वंदन केले आहे. जवळजवळ प्रत्येक जैन ग्रंथाच्या आरंभी हा आशय व्यक्त केला गेला आहे की, ‘देवांपेक्षा आध्यात्मिक मानवांची श्रेष्ठता अधिक आहे.’

उत्तराध्ययनात म्हटले आहे की,

‘‘देव–दाणव–गंधव्वा, जक्ख–रक्खस–किन्नरा ।
बंभयारिं नमंसंति, दुक्करं जे करंति तं ।।’’ (उत्त. १६.१६)

देवांचे प्रकार–उपप्रकार (निकाय), स्थिति, वैशिष्ट्ये इ.चे वर्णन तत्त्वार्थसूत्राच्या चौथ्या अध्यायात विस्ताराने येते. ‘परमाधामी देव’ नरकातील जीवांना यातना देण्याचे काम करतात. असुर, नाग इ. ‘भवनपति’ देव आहेत. गंधर्व, यक्ष, किन्नर, राक्षस, भूत, पिशाच इ. ‘व्यंतरदेव’ आहेत. सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्र, तारका इ. ‘ज्योतिष्क’ देव आहेत. ‘वैमानिक’ देव सर्वश्रेष्ठ आहेत.

हिंदू पुराणांमध्ये स्वर्गलाकाची वर्णने असली तरी देवांचे प्रकार, नेमके स्थान, कार्य व तरतमभाव हे सुस्पष्टपेण नोंदवलेले दिसत नाही. गीतेच्या अकराव्या अध्यायात कृष्णाने प्रकट केलेल्या विश्वरूपदर्शनाने विस्मयचकित होऊन पहाणाऱ्या आदित्य, वसु, साध्य, विश्वेदेव, अश्विनीकुमार, मरूद्‌गण, पितरांचा समुदाय, गंधर्व, यक्ष, राक्षस व सिद्धगणांच्या समूहाचा उल्लेख येतो. विश्वपुरुषाच्या विराट् देहात सर्व देव, प्राणिमात्र, ब्रह्मदेव, ऋषी व सर्प निवास करतात, असेही म्हटले आहे. अशाप्रकारच्या विश्वपुरुषाची संकल्पना जैन शास्त्रास संमत नाही.

तीर्थंकरांच्या जन्म–दीक्षा आदि पंचकल्याणकप्रसंगी देव पृथ्वीवर येतात. परंतु त्यांचे प्रासंगिक ‘अवतरण’ म्हणजे हिंदू पुराणांप्रमाणे ‘अवतार’ नव्हेत. साधना, तपस्या करणाऱ्या मानवांना वेळप्रसंगी देव सहाय्य करू शकतात अशा प्रकारची उदाहरणे अनेक जैन चरितग्रंथांत आणि कथाग्रंथांत आढळतात. देवांचे शरीर ‘वैक्रियक’ असल्योनते विविध रूपेही धारण करू शकतात. जैन संकल्पनेनुसार मनुष्य मात्र देवांना सहाय्य करू शकत नाही. त्यांची आराधना करून विविध लौकिक फळे मिळवू शकतो.

जैन दृष्टीने देवांपेक्षा उच्च आध्यात्मिक साधना करणारा मानवी जीव नि:संशयपणे श्रेष्ठ आहे.

श्रीकृष्णाने दुसऱ्या अध्यायात अर्जुनाला सांगितले की, ‘तू युद्धात कर्तव्य बजावताना मृत्यू पावलास तर तुला स्वर्गप्राप्ती निश्चित आहे (हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं).’ जैन दृष्टीने मृत योद्ध्यालाही त्याच्या पाप–पुण्याच्या हिशेबानुसार पुढील गती मिळेल. ‘स्वर्गगतीच मिळेल’, अशी खात्री देता येत नाही.

देव–मनुष्य संबंधाबाबत जैन व हिंदू परंपरेतील अजूनही अशा प्रकारच्या मतभिन्नता नोंदविता येतील.

**********

**जैन दृष्टिकोणातून भगवद्‌गीता**

## लेखांक ८ : इंद्रिय–मन–बुद्धि–आत्मा : उत्तरोत्तर श्रेष्ठता

वाचकहो, कालच्या लेखात आपण मनुष्य आणि देव यांच्या परस्पर संबंधांविषयी विचार केला. मनुष्य आणि देवच नव्हे तर जगतातील प्रत्येक जीव तरतमतेनुसार इंद्रिये, मन, बुद्धि आणि आत्मा यांनी सहितच असतो. गीतेच्या तिसऱ्या अध्यायातील बेचाळिसाव्या श्लोकात म्हटले आहे की, ‘‘इंद्रियांना संयमित करून कामरूपी शत्रूला मारणे शक्य नाही असे तू म्हणू नकोस, कारण इंद्रियांच्या विषयांपेक्षा इंद्रिये पर (सूक्ष्म, श्रेष्ठ, बलवान) आहेत. इंद्रियंपेक्षा श्रेष्ठ मन आहे. मनाच्याही पलीकडे श्रेष्ठ अशी बुद्धी आहे. बुद्धीहून कितीतरी सामर्थ्यवान असा आत्मा आहे.’’

सर्वश्रेष्ठ, सामर्थ्यसंपन्न आत्म्याच्या सहाय्याने, इंद्रियांना आपल्या ताब्यात ठेवून, भोगेच्छा नियंत्रित करण्याचा हितकर सल्ला गीतेच्या या श्लोकात दिला आहे.

जैन दर्शनाने सुद्धा साधकांना हाच सल्ला दिला आहे. मन–वचन–कायेचा संयम हा जैन दर्शनाचा (आचारशास्त्राचा) गाभा आहे. आत्म्याचा बाह्य जगाशी संपर्क येतो तो इंद्रियांच्याच माध्यमातून. इंद्रियांची संख्या, त्यांचे ‘निर्वृत्ति’ आणि ‘उपकरण’ हे दोन भेद, भावेंद्रियाचे ‘लब्धि’ आणि ‘उपयोग’ रूप असणे, स्पर्शन–रसन–घ्राण–चक्षु–श्रोत्र ही इंद्रिये, त्यांचे विषय, उत्तरोत्तर प्रगत जीवांमध्ये क्रमाने आढळणारी इंद्रिये–यांचा विस्तृत विचार ‘तत्त्वार्थसूत्र’ या सूत्ररूप दार्शनिक ग्रंथात, दुसऱ्या अध्यायात नमूद करून ठेवला आहे.

जैनशास्त्रानुसार ‘मन’ हेही ज्ञानाचे साधन आहे. ते आंतरिक आहे. म्हणून तर त्याला ‘अंत:करण’ म्हणतात. मूर्त आणि अमूर्त असे दोन्ही विषय मनाचे प्रवृत्तिक्षेत्र आहे. ‘रूप’ आदि विषयांमध्ये प्रवृत्त होण्यासाठी ते चक्षुआदि इंद्रियांवर अवलंबून आहे. म्हणून तर त्याला ‘नो–इंद्रिय’ किंवा ‘अनिंद्रिय’ म्हणतात. मनाला आधारभूत धरून समग्र संसारी जीवांचे वर्गीकरण ‘समनस्क’–‘अमनस्क’ अशा दोन गटात केले आहे. इंद्रियांपेक्षा मनाचे असलेले सूक्ष्मत्व, श्रेष्ठत्व व सामर्थ्य जैनशास्त्राने प्रभावीपणे अधोरेखित केले आहे.

‘बुद्धि’ असे स्वतंत्र तत्त्व जैनशास्त्रात नाही. आत्म्याच्या ‘ज्ञानगुणा’त त्याचा अंतर्भाव करता येतो. आत्म्याचे (जीवाचे) लक्षण ‘उपयोग’, म्हणजेच ‘चेतना’. तो दोन प्रकारचा आहे. त्यापैकी ज्ञानोपयोग म्हणजे स्वत:च्या स्वतंत्र अस्तित्वाचे भान अथवा जाणीव. सांख्यशास्त्र आणि गीता अन्यत्र यास ‘अहंकार’ म्हणते. ‘दर्शनोपयोग’ म्हणजे आजुबाजूच्या वस्तूंचे भान अथवा जाणीव. या दोन ‘उपयोगां’चे वर्णन अन्य प्रकारेही करता येते.

जैनशास्त्रानुसार आत्मा ज्ञानमय, ज्ञानस्वरूप आहे. ज्ञानावरणीय कर्माचा जेवढा उद्‌घात असेल तेवढे ज्ञान त्या त्या जीवात प्रकट होते. त्यालाच व्यवहारात ‘बुद्धी’ म्हणतात. ती चार प्रकारची असते. आत्मा केवळ ज्ञानस्वरूपच नाही तर ज्ञान–दर्शन–वीर्य–सौख्य या अनंतचतुष्टयाने युक्त आहे. ‘यो बुद्धे: परतस्तु स:’ हे गीतावचन जैनशास्त्रानुसार अधिकच अर्थपूर्ण आहे.

सारांश काय ? इंद्रिय व मन:संयमासाठी सर्वश्रेष्ठ आत्मसामर्थ्याचा वापर करावा लागतो. गीता व जैनदर्शन दोहोंनाही हेच म्हणायचे आहे.

**********

## लेखांक ९ : स्वधर्म–परधर्म

'स्वधर्म–परधर्म' हे शब्द वाचले की गीताप्रेमींना आणि अभ्यासकांना गीतेच्या तिसऱ्या अध्यायातील पुढील श्लोकाची आठवण आल्याशिवाय रहाणार नाही.

''श्रेयान्स्वधर्मो विगुण: परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह: ।।'' (गी. ३.३५)

दुसऱ्या अध्यायात आत्म्याचे स्वरूप विस्ताराने सांगितल्यानंतर कृष्ण अचानक व्यावहारिक पातळीवरून युद्धाची आवश्यकता पटवून देऊ लागतो. त्यावेळीही तो म्हणतो,

''स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि ।''

हा व याच्या पुढील श्लोकातही 'धर्म्य संग्राम करणे क्षत्रियाचे कर्तव्य आहे'–असा एकंदर अभिप्राय दिसतो. त्याचाच अर्थ असा की 'धर्म' शब्दाचे अर्थ आणि व्याख्या अनेक असल्या तरी, 'वर्णाश्रमाच्या चौकटीने आखून दिलेले कर्तव्यकर्म'–असाच अर्थ येथे अभिप्रेत आहे.

सामाजिक इतिहास सामान्यत: असे सांगतो की गीतेच्या अंतिम संस्करणाच्या वेळेपर्यंत 'गुणाधार' वर्णाश्रमधर्म जातिव्यवस्थेत रूपांतरित झाला होता. जात्याधार उच्चनीचताही प्रविष्ट झाली होती. 'आपल्या व्यवसायाला प्रतिष्ठा नाही' अशी खंत बाळगणाऱ्यांसाठी 'विगुण:' (गुणरहित, कमी प्रतीचा) शब्द घातलेला दिसतो. समाजाची घडी बिघडू नये म्हणून 'स्वधर्मे निधनं श्रेय:' हा चरण घातलेला दिसतो. अर्जुन हा वर्णाने 'क्षत्रिय' व आश्रमाने 'गृहस्थ' आहे. त्यामुळे अर्जुनाने युद्ध केलेच पाहिजे. अर्जुनाचा 'प्रज्ञावाद' (गी.२.११) आणि विरक्ती त्याच्या वर्णाश्रमास शोभणारी नाही. त्यामुळे ती विरक्ती 'परधर्म' आहे. 'परधर्म' तर भयावह आहे.

जैन दृष्टिकोणातून याचा अन्वयार्थ कसा लावता येईल ? 'स्वधर्म कल्याणकर (श्रेयस्कर) आहे'–ही संकल्पना योग्यच आहे. 'वत्थुसहावो धम्मो' (धर्म म्हणजे वस्तूचा/व्यक्तीचा मूळ स्वभाव) हा अर्थ घेतला तर हे विधान खूपच जुळते. क्षमा, मार्दव, आर्जव इत्यादी 'दशविध धर्म' असा अर्थ घेतला तरी त्याचे श्रेयस्करत्व पटते. 'महाव्रत–गुप्ति–समितिरूप आचारधर्म' हाही अर्थ ठीक बसतो. परंतु जैन परंपरा कदापीही 'स्वधर्मा'ला 'विगुण' (गुणरहित, कमी प्रतीचा) म्हणणे शक्य नाही. जैन धर्मात तत्त्वत: उच्चनीचतेला स्थान नसल्याने, सर्वांनी एकाच प्रकारचे (अर्थात् साधूने साधूचे ; श्रावकाने श्रावकाचे) धर्माचरण करावयाचे आहे. त्यांच्या दृष्टीने जैन धर्मात 'वैगुण्य' असे काहीच नाही.

सारांश काय तर 'विगुण:' शब्द वगळता जैन दृष्टीनेही हा श्लोक एकंदरीत मान्य होण्यासारखा आहे. मात्र 'स्वधर्म' म्हणजे कदापीही वर्णाश्रमाच्या चौकटीतले कर्तव्य नव्हे.

'स्वधर्मा'चा आणखी एक रूढ अर्थ जैन शास्त्रात आहे. तो म्हणजे 'आत्मधर्म'. चैतन्यमय, ज्ञानस्वरूप आत्म्यावर तद्‌भिन्न अशा जड पुद्‌गलांच्या संपर्कामुळे केलेले वेगळ्याच गुणधर्मांचे आरोपण म्हणजे 'परधर्म'. स्व–परविवेकास जैन परंपरेने सर्वाधिक महत्त्व दिले.

''जैन–बौद्ध व इतर तत्कालीन संप्रदायांकडे होऊ लागलेला समाजाचा कल लक्षात घेऊन तर हा श्लोक नंतर समाविष्ट केला नसेल ना ?''–अशी शंकाही मनात डोकावल्याशिवाय रहात नाही.

**********

**जैन दृष्टिकोणातून भगवद्‌गीता**

## लेखांक १० : 'सर्व धर्मांचा परित्याग करून मला एकट्यास शरण ये'

वाचकहो, कालच्या लेखात आपण 'स्वधर्म'-'परधर्म' यांचा विचार केला. या धर्मचर्चेमुळे अचानक गीतेच्या अठराव्या अध्यायातील ६६ वा श्लोक नजरेसमोर आला. मनात आले की 'स्वधर्मे निधनं श्रेय:' म्हणणारा कृष्ण कोणत्या अभिप्रायाने म्हणतो आहे की, 'सर्व धर्मांचा परित्याग करून मला एकट्यास शरण ये. मी तुझी सर्व पापकर्मांपासून सुटका करीन. दु:ख, शोक करू नकोस.'

आता वरील श्लोकात 'धर्म' शब्दाचा अर्थ कोणता घ्यायचा ? 'स्वभावधर्म' हा अर्थ घेता येत नाही. कारण तो कसा सोडणार ? 'वर्णाश्रमविहित कर्तव्य' असाही घेता येत नाही. कारण ज्ञानी, अनासक्त साधकालाही कर्तव्यकर्म शेवटपर्यंत 'लोकसंग्रहार्थ' करण्याचा सल्ला गीतेत इतरत्र दिला आहे. गीतेत वेळोवेळी ज्ञानमार्ग (सांख्यनिष्ठा/संन्यासमार्ग), योगमार्ग, कर्ममार्ग (निष्काम कर्मयोग) आणि भक्तिमार्ग अशा विविध मार्गांचे विवेचन केलेले आहे. अध्यायांच्य नावांवरून सुद्धा याचा बोध होतो. 'मामेकं शरणं व्रज' या पदावलीने स्पष्टत: भक्तिमार्ग निर्दिष्ट केला आहे म्हणजेच या श्लोकातील 'सर्व धर्म' या शब्दाचा अर्थ 'भक्तिमार्गाखेरीज इतर सर्व मार्ग'-असाच घ्यावा लागतो.

श्लोकाच्या दुसऱ्या चरणात कृष्णाने अर्जुनाला पापमुक्तीची ग्वाही दिली आहे. जैन दृष्टीने या श्लोकातील कुठलाच मुद्दा टिकाव धरू शकत नाही. मोक्षप्राप्तीचे विविध पर्यायी मार्ग उपलब्ध नाहीत. दर्शन-ज्ञान-चारित्राची समन्वित आराधना हा एकमेव मार्ग आहे. 'सगुण' अगर 'निर्गुण' अशा कोणत्याच स्वरूपात 'ईश्वर' अगर 'परमेश्वर' मानलेला नाही. सिद्ध, तीर्थंकर, जिन, केवली, गुरू इ. कोणीही 'मला शरण ये' असे म्हणणार नाहीत. 'केवलीप्रज्ञप्त धर्मा'ला सर्वाधिक प्राधान्य आहे, व्यक्तीला नव्हे.

केवळ 'पापकर्मांपासून मुक्ती' हे जैन शास्त्राचे ध्येय नाही. पाप असो की पुण्य, दोन्ही प्रकारच्या कर्मबंधनातून सुटणे आवश्यक आहे. ही सुटका वर नमूद केलेले धर्मनायक सुद्धा करू शकत नाहीत. त्यासाठी 'तपस्ये'ची गरज आहे. 'ईश्वरशरणवादा'पेक्षा 'स्व-प्रयत्नां'वर भर आहे.

जैन दृष्टीने जर कशाचा परित्यागच करायचा असेल तर तो बाह्य व अंतरंग परिग्रहांचा व पर्यायाने आसक्तीचा करायचा आहे. भ. महावीर आचारांगात सांगतात-'या त्यागमार्गावर येण्यापूर्वी विचार कर. मार्गाची खडतरता जाणून घे. विचारांती पाऊल टाकले तर शोक, खेदाचे कारणच रहाणार नाही.'

जर या श्लोकातील कुठलाच मुद्दा जैन दृष्टीने तात्त्विक पातळीवर टिकाव धरू शकत नसेल तर जैन धर्मात इतकी भक्तिप्रधान स्तोत्रे कशी काय आली ? 'बेडा पार करो' किंवा 'जीवननैया तारो' हे सर्व अर्थवादच समजायचे का ? एवढे नक्की आहे की तीर्थंकर इत्यादी सर्व आध्यात्मिक पुरुष त्रिरत्नाच्या आराधनेचे केवळ प्रेरक व मार्गदर्शक आहेत. क्षमा, मृदुता, ऋजुता इत्यादी धर्म आपल्या दैनंदिन आचरणात प्रतिबिंबित झाले नाहीत तर फक्त भजन-पूजनाने काही साधणार नाही.

**********

## लेखांक ११ : गीतेतील वेदविषयक विचार (१)

'गीतेला वैदिक परंपरेतला ग्रंथ म्हणायचे, की ब्राह्मण परंपरेतला, की हिंदू परंपरेतला ?' असा प्रश्न गीतेच्या अभ्यासकांकडून वारंवार चर्चिला जातो. पैकी 'हिंदू' या संकल्पनेबाबत एकमत नाही. शब्दाचाच आधार घ्यायचातर 'ब्राह्मण' शब्द गीतेत खूपच कमी वेळा आला आहे. परंतु ब्राह्मणवाङ्मयाचा काळ यज्ञप्रधानतेचा होता. आणि गीतेच्या जवळजवळ प्रत्येक अध्यायात यज्ञासंबंधी काही ना काही विचार दिसतो. या अर्थाने गीतेला ब्राह्मणपरंपरेतला ग्रंथही म्हणता येईल. गीतेला वैदिक परंपरेतला ग्रंथ म्हणण्यासही काही प्रत्यवाय दिसत नाही कारण गीतेच्या अठरा अध्यायांपैकी जवळजवळ निम्म्या अध्यायांमध्ये वेदांसंबंधीचे उल्लेख येतात.

परंपरेनुसार गीतेला 'उपनिषदांचे सार' म्हणण्याचा प्रघात आहे. भारतीयांच्या वैचारिक इतिहासात उपनिषदांचा काळ विचारमंथनाचा, चिंतनाचा, आत्मपरीक्षणाचा काळ होता. त्यामुळे अर्थातच गीतेनेही वेदांकडे आदरणीय दृष्टीने आणि आत्मपरीक्षणात्मक दृष्टीने पाहिलेले दिसते. आजच्या लेखात गीतेचा वेदांकडे पाहण्याचा दृष्टिकोण जाणून घेऊ. पुढच्या दोन लेखात काही जैन ग्रंथांच्या आधारे जैन परंपेरच्या तद्विषयक मतांचा आढावा घेऊ.

गीतेच्या दुसऱ्या अध्यायात वेदविषयक उल्लेख सर्वात जास्त येतात. वेदांच्या अर्थाविषयी विविध वादात रममाण असलेल्या लोकांविषयी गीता म्हणते,

''यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चित: ।
वेदवादरता: पार्थ नान्यदस्तीति वादिन: ।।'' (गी.२.४२)

अर्थात्, वेदवादरत असलेले अविवेकी लोक फुलोऱ्याची, आकर्षक प्रलोभनांची भाषा बोलतात. वेदांशिवाय दूसरे काही अधिक श्रेयस्कर नाही असे म्हणतात.

पुढे असेही म्हटले आहे की त्या प्रार्थनांद्वारे ते धनधान्यपुत्रपौत्रादी ऐहिक कामना आणि स्वर्गसुखांसारख्या पारलौकिक कामनांच्या पूर्तीची इच्छा करतात. ते यज्ञयागादि क्रियाकांडावर भर देतात. परिणामी जन्मरूप कर्मफल देणाऱ्या भोग, ऐश्वर्याकडे आसक्त होतात. ऐहिक भरभराटीच्या विचारात त्यांचे मन गुंतून न पडण्याचा त्यांचा मानसिक निर्धार होऊ शकत नाही. ध्यान अगर समाधीत त्यांचे मन एकाग्र होऊ शकत नाही.

गीतेच्या दुसऱ्या अध्यायात प्रतिबिंबित झालेली वेदांकडे पाहण्याची दृष्टी अतिशय वस्तुनिष्ठ, परखड आहे. कृष्ण अर्जुनाला सांगतो,

''त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।
निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।।'' (गी.२.४५)

याचा अनुवाद लो.टिळक अशा प्रकारे करतात-''हे अर्जुना ! (कर्मकांडात्मक) वेद अशारितीने त्रैगुण्याच्या (सत्त्व-रज-तम यांनी बनलेल्या सांसारिक) गोष्टींनी भरलेले असल्यामुळे तू त्रिगुणातीत हो. नित्यसत्त्वस्थ, सुखदु:खादि द्वंद्वांपासून अलिप्त, योगक्षेमादि स्वार्थात न गढता आत्मनिष्ठ हो.'' 'त्रैगुण्यविषय' या शब्दाचा अर्थ 'धर्म-अर्थ-काम हे तीन व्यावहारिक पुरुषार्थ' अशा प्रकारेही काही अभ्यासक करतात.

याच्या पुढे आलेला श्लोक तर वाचकाला चकितच करतो. त्याचा आशय असा आहे -''आत्मविद्येचा आस्वाद घेतलेल्यास वेदांचे काय प्रयोजन ? पाण्याने तुडुंब भरलेल्या सरोवरात अवगाहन करणाऱ्यास छोट्या तळ्याची मातब्बरी ती काय असणार ?'' ५३ व्या श्लोकाच्या अनुवादात लो. टिळक म्हणतात, ''नाना प्रकारच्या वेदवाक्यांनी गांगरून गेलेली तुझी बुद्धी स्थिर झाल्यावरच तुला समत्वयोग प्राप्त होईल.''

वाचकहो, गीतेच्या पुढील अध्यायातील वेदविचार उद्याच्या लेखात पाहू.

**********

## लेखांक १२ : गीतेतील वेदविषयक विचार (२)

गीतेने वेदांसंबंधी काढलेले उद्गार प्रामुख्याने आठ–नऊ–दहा–अकरा–तेरा–पंधरा आणि सतराव्या अध्यायात विखुरलेले दिसतात.

आठव्या अध्यायात ‘वेदविद्’ लोकांबरोबरचा ‘वीतराग यतीं’चा उल्लेख महत्त्वाचा आहे. तेथेच वेद, यज्ञ, तप, दान यांनी मिळणारे पुण्यफल ओलांडून जाणाऱ्या योग्यांचा निर्देश आहे. नवव्या अध्यायात ऋग्वेद, सामवेद व यजुर्वेद यांची नावे येतात. नवव्या अध्यायातील २०–२१ हे श्लोक या दृष्टीने फारच महत्त्वाचे आहेत. लो. टिळकांनी त्याचा केलेला अनुवाद असा आहे–‘‘ऋक्–यजु–साम या तीन वेदातील कर्मे करणारे सोमरसप्राशी (म्हणजे सोमयाजी) लोक यज्ञाने स्वर्गप्राप्तीची इच्छा करतात. इंद्रलोकातील दिव्य भोग भोगतात. पुण्यक्षयानंतर पुन: मृत्युलोकी येतात. अशा प्रकारे ‘मृत्युलोक–स्वर्गलोक’ अशा येरझाऱ्या ते घालत रहातात.’’

दहाव्या विभूतियोग अध्यायात ‘सामवेद’ आणि ‘गायत्री छंदा’चा गौरवपूर्ण उल्लेख आहे. ‘वेद, यज्ञ, अध्ययन आणि उग्र तपाने ‘विश्वरूपदर्शन’ होणे शक्य नाही’–असे अकराव्या अध्यायात म्हटले आहे. क्षेत्र (शरीर) आणि क्षेत्रज्ञ (आत्मा) यांचा विचार वेदांच्या काही भागात आल्याचे तेराव्या अध्यायात नमूद केले आहे. ‘क्षर (नाशवान्) आणि अक्षर (अविनाशी) यांच्या पलीकडे ‘पुरुषोत्तम’ असून तो लोकात व वेदातही प्रसिद्ध आहे’– असे १५ व्या अध्यायात म्हटले आहे. १७ व्या अध्यायात ‘ॐ, तत्, सत्’ यांचा अर्थ अनुक्रमे ‘वेद, ब्राह्मण आणि यज्ञ’ असा घेण्यास सांगितले आहे. १८ व्या अध्यायात वेद, श्रुति अगर छंद यांचा साक्षात् उल्लेख नाही.

गीतेतल्या सर्व उल्लेखांची छाननी केली तर असे दिसून येते की, नवव्या अध्यायापर्यंत गीतेचा वेदांकडे बघण्याचा दृष्टिकोण आत्मपरीक्षणात्मक दिसतो. दहाव्या अध्यायापासून वेदांविषयीची पूज्यता व आदरणीयता गीतेत प्रतिबिंबित झालेली दिसते.

गीतेच्या पारंपारिक भाष्यकारांनी ‘वेदांचा कर्मकांडात्मक भाग’ आणि ‘वेदातील आत्मविद्याप्रधान ज्ञानकांडात्मक भाग’ अशी विभागणी केलेली दिसते. उपनिषदांमध्ये प्रतिबिंबित झालेल्या आत्मविद्येला, अध्यात्मविद्येला अगर ब्रह्मविद्येला ते ‘वेदांत’ अगर ज्ञानकांडात्मक भाग मानतात. वेदांच्या पुनर्विचाराची प्रक्रिया उपनिषदांमधेच सुरू झालेली दिसते. त्यामुळे अर्थातच ‘उपनिषदांचे सार’ असलेल्या गीतेतही हे विचार आलेले दिसतात.

आत्मपरीक्षणाला उद्युक्त करणाऱ्या घटकांचा विचार करू लागलो तर ते घटक दोन प्रकारे सांगता येतील. ‘स्वत:च्या चिंतनाने स्वत:त काळानुरूप बदल घडवून आणणे’– हे वैदिक परंपरेचे वैशिष्ट्य आहे असे अभ्यासक मानतात. परंतु त्याचबरोबर जैन आणि बौद्ध विचारवंतांनी वेळोवेळी प्रकट केलेल्या वेद, यज्ञ आणि वर्णाश्रमव्यवस्थेविषयीच्या मतांचाही या आत्मपरीक्षणात मोठा वाटा असला पाहिजे.

पुढील लेखात यासंबंधी असलेल्या जैन विचारांचा मागोवा घेऊ.

**********

## लेखांक १३ : वेदविषयक जैन उल्लेख (१)

जैनांची आणि बौद्धांची इतर धर्मसंप्रदायांवर टीकाटिप्पणी करण्याची पद्धत वेगवेगळी आहे. बौद्धांची टीका बरीच परखड, रोखठोक आणि प्रसंगी उपहासात्मक आहे. अनेकदा असे गृहीत धरले जाते की जे जे बौद्धांनी केले, ते ते सर्व जैनांनीही केले. परंतु असे म्हणणे म्हणजे सत्याचा अपलाप आहे. वेद, यज्ञातील पशुहत्या आणि वर्णाश्रमव्यवस्था यासंबंधीची मते प्राचीन जैन ग्रंथात जरूर नोंदवलेली दिसतात. परंतु ती कर्कश, कठोर नसून अतिशय संयमितपणे व्यक्त केलेली आहेत.

अष्टपाहुड ग्रंथातील शीलपाहुडात 'शील' अर्थात् 'चारित्रा'चा महिमा सांगताना कुंदकुंद म्हणतात,

''वायरण छंदवइसेसियववहारणायसत्थेसु ।
वेदेऊण सुदेसु य तेसु सुयं उत्तमं शीलं ।।'' (शीलपाहुड १६)

अर्थात्, ''वेद (श्रुत), व्याकरण, छंद, वैशेषिक, व्यवहार आणि न्यायशास्त्र यातील पारंगततेपेक्षा 'उत्कृष्ट शील' हेच सर्वोत्तम होय.''

अर्धमागधी ग्रंथांपैकी 'नंदीसूत्र' हा ग्रंथ जैन वैदिक परंपरांच्या आदानप्रदानांच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. याची रचना इसवीसनाच्या पाचव्या शतकात झाली. त्यावेळेपर्यंत जैन विचारक्षेत्रात 'कु-श्रुत', 'मिथ्यात्व' अगर 'पाखंडविषयक' कल्पना दृढ होऊ लागल्या होत्या. त्या दृष्टीने नंदीसूत्रात 'कोणकोणत्या ग्रंथांना पाखंड म्हटले आहे'-ते नंदीसूत्राच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयास केला जातो. नंदीसूत्रानुसार,

''से किं तं मिच्छासुयं ? मिच्छासुयं जं इमं अण्णाणिएहिं मिच्छादिट्ठिएहिं सच्छंदबुद्धिमइविगप्पियं, तं जहा- भारहं, रामायणं--वइसेसियं, बुद्धवयणं---पुराणं---चत्तारि य वेया संगोवंगा ।''

अर्थात्, यामध्ये अज्ञानी मिथ्यादृष्टी व्यक्तींनी स्वच्छंदपणे आपल्या कल्पनाशक्तीतून निर्माण केलेल्या भारत, रामायण आदि अनेक ग्रंथांचा उल्लेख आहे. या यादीत अखेरीस अंग, उपांगसहित चारही वेदांची सुद्धा 'मिथ्याश्रुत' म्हणून संभावना केली आहे.

वरवर पाहता असे वाटते की हे मत अतिशय परखड व सांप्रदायिक आहे. परंतु नंदीसूत्रातील यापुढील वाक्य वाचल्यास चांगलाच भ्रमनिरास होतो. नंदीसूत्रात पुढे अशी पुस्ती जोडली आहे की, 'मिथ्यात्वींनी मिथ्यादृष्टीनग्रहण केले तर हे ग्रंथ मिथ्याश्रुत आहेत परंतु तेच सम्यक्त्वी व्यक्तींनी सम्यक् दृष्टी ठेवून वाचले तर सम्यक् श्रुत आहेत.'

जैन परंपरेत 'दृष्टिवादा'चे महत्त्व खूप आहे. ''समोर असलेले ग्रंथ कोणती दृष्टी ठेवून वाचायचे, त्यातून कोणता बोध घ्यायचा, हे व्यक्तिसापेक्ष आहे''-अशी जैन विचारवंतांची धारणा आहे. म्हणूनच त्यांच्या वेदविषयक मतातही अनेकांतदृष्टी दिसून येते.

वेद, यज्ञ आणि वर्णाश्रमव्यवस्था यांच्यावर भाष्य करणारे एक उत्कृष्ट संवादात्मक अध्ययन 'उत्तराध्ययन' या अर्धमागधी ग्रंथात येते. त्याचा आशय उद्याच्या लेखात पाहू.

**********

## लेखांक १४ : वेदविषयक जैन उल्लेख (२)

‘उत्तराध्ययनसूत्र’ या अर्धमागधी ग्रंथातील १४ वे अध्ययन म्हणजे वेद, यज्ञ आणि वर्णाश्रमव्यवस्थेवर संवादातून उलगडत जाणारे उत्कृष्ट भाष्यच आहे. वैदिक परंपरेचा पाईक असलेला ‘पुरोहित’ आणि निर्ग्रंथ (जैन) परंपरेची दीक्षा घेऊ इच्छिणारे त्याचे दोन पुत्र–यांच्यात घडलेला हा संवाद आहे.

पुरोहित म्हणतो, ‘पुत्रांनो, वेदांचे ज्ञाते असे म्हणतात की निपुत्रिकांना चांगली गती मिळत नाही. म्हणून तुम्ही वेदांचे अध्ययन करा, ब्राह्मण भोजन घाला, विवाह करा, स्त्रियांसह विषयोपभोग घ्या, पुत्रोत्पत्ती करा, पुत्रांवर घरची जबाबदारी सोपवून अरण्यवासी व्हा आणि अखेर मुनिधर्मा ?ा स्वीकार करा.’

उत्तराध्ययनातील या दोन गाथा खूपच बोलक्या आहेत. त्यात ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम या सर्वांचा निर्देश आहे.ब्राह्मणवर्णाच्या कर्तव्यांचेही सूचन आहे.

पुरोहिताचे दोन्ही पुत्र अतिशय संयमपूर्वक, फक्त एकाच गाथेत, या सर्व मुद्यांना ठामपणे उत्तर देतात. ते म्हणतात, ‘पठण केले वेद आम्हाला तारक ठरणार नाहीत. यज्ञप्रसंगी ब्राह्मणांना भोजन घातले तर ते आम्हाला अंधारातून अधिक अंधाराकडेच नेतील. पत्नी आणि पुत्र हे देखील आमचे रक्षक (त्राते) होऊ शकत नाहीत. तेव्हा आपल्या या प्रस्तावाला कोण बरे अनुमती देईल ?’

अशा ठाम नकारानंतर पुरोहितपुत्र पित्याला जीवनासंबंधीची अनेक तथ्ये उलगडून दाखवतात. परंतु त्यात टिकाटिप्पणी नसून जैन धर्माची आचार–विचारसरणी विस्ताराने समजावून सांगितली आहे. शेवटी, मुलांच्या परिपक्व विचारांनी भारावून गेलेला पुरोहित अखेरीस स्वत: मुलांच्या मार्गाचे अनुसरण करतो, असे अध्ययनात दाखवले आहे.

‘यज्ञीय’ नावाच्या २५ व्या अध्ययनात ‘जयघोष मुनि’ आणि ‘विजयघोष ब्राह्मण’ यांच्यामधील संवाद अंकित केला आहे. विशेष गोष्ट अशी की हा संवाद यज्ञमंडपात घडला आहे. जयघोष स्पष्टपणे सांगतात, ‘‘यज्ञाप्रीत्यर्थ पशुवध करण्यासाठी, पशूंना बांधून ठेवण्याचा उपदेश करणारे वेद, त्या दु:शील व्यक्तीला तारू शकत नाहीत. कारण कर्मे बलवान् असतात. (म्हणजे दुष्ट कर्मांचे दुष्ट फळ भोगावेच लागते.)’’ त्यानंतर जयघोष मुनि श्रमण, ब्राह्मण, मुनि आणि तापस या चार शब्दांचे खरे अर्थ उलगडून दाखवतात.

पुण्य म्हणजे काय ?, ते कशाने मिळते ?, पुण्यप्रकर्षाने जास्तीत जास्त कोणते फळ मिळते ; तसेच ‘मोक्ष’ म्हणजे काय आणि तो कशाने प्राप्त होतो याचे स्पष्ट दिग्दर्शन अनेक जैन ग्रंथात आढळते. विशेषत: कुंदकुंदांच्या सिद्धांतप्रधान ग्रंथांतून याची चर्चा विस्ताराने आढळते. व्रत, पूजा, दान इत्यादी मुख्यत: कर्मकांडात्मक आहेत. त्यामुळे त्यांचे जास्तीत जास्त फल पुण्याच आहे. (पूयादिसु वयसहियं पुण्णं हि जिणेहिं सासणे भणियं – भावपाहुड ८३)

वाचकहो, ब्राह्मण आणि श्रमण या दोन परंपरांमध्ये कोणत्या प्रकारचे वैचारिक आदानप्रदान चालू होते, ते जैन ग्रंथातून अशा प्रकारे स्पष्ट होते. ‘अशा प्रकारच्या विचाराची एक प्रतिक्रिया म्हणून गीतेमध्ये वेदांचा पुनर्विचार केला गेला असेल’– ही शक्यता कोणत्याही सुबुद्ध व्यक्तीला मान्य करावी लागेल !!

**********

## लेखांक १५ : सिद्धानां कपिलो मुनिः

कपिल मुनींचा उल्लेख गीतेच्या दहाव्या 'विभूतियोग' अध्यायात अशा प्रकारे येतो –

''अश्वत्थ: सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारद: ।
गंधर्वाणां चित्ररथ: सिद्धानां कपिलो मुनि: ।।'' (गी.१०.२६)

अर्थात्, सर्व वृक्षांमध्ये पिंपळ, देवर्षींमध्ये नारद, गंधर्वांमध्ये चित्ररथ आणि सिद्धांमध्ये कपिलमुनि विभूतिसंपन्न आहेत.

अश्वत्थाला पूजनीय मानणे, देवर्षींच्या परंपरेत नारदाचे विशेष स्थान असणे आणि गंधर्वांमध्ये 'चित्ररथ' नावाचा गंधर्व उठून दिसणे–या तीन संकल्पना हिंदू विचारधारेत, मान्यता पावलेल्या दिसतात. 'सिद्धानां कपिलो मुनि:' हा उल्लेख वाचून मात्र जैन परंपरेचा अभ्यासक चकित होतो. 'सिद्ध–बुद्ध–मुक्त' ही शब्दावली जैन परंपरेत अतिशय प्राचीन आणि रुळलेली आहे. अभ्यासकांच्या मते 'मुण्'–जाणणे या प्राकृत (देशी) क्रियापदापासून 'मोण' म्हणजे 'ज्ञान' हा शब्द बनला. त्या (आत्म)ज्ञानाने जो संपन्न तो 'मुणी' होय. या अर्थाने 'मुणी' शब्द 'आचारांग' ग्रंथाच्या प्राचीन भागात अक्षरश: शेकडो वेळा आला आहे. जसे–से हु मुणी परिण्णायकम्मे ; एयं मोणं समणुवासेज्जासि ; मुणी मोणं समादाय धुणे कम्मसरीरगं ; से हु दिट्ठपहे मुणी इत्यादि इत्यादि. 'मुनि' शब्दाचा श्रमणपरंपरेशी असलेला अतूट संबंध कोणताही नि:पक्षपाती अभ्यासक नाकारू शकत नाही.

कपिलमुनि सांख्यदर्शनाचे प्रवर्तक आहेत. प्राचीन सांख्यांचे तत्त्वज्ञान जैनदर्शनाशी जुळणारे होते. महाभारतातील शांतिपर्वात म्हटले आहे की कपिलाचा शिष्य आसुरी होता. त्याचा शिष्य पंचशिख होता. त्याने जनकास उपदेश दिला. कपिल मुनींविषयी अधिक माहिती हिंदू परंपरेत मिळू शकत नाही.

जैन परंपरेनुसार, जनकाच्या पिढीत पुढे 'नमि' नावाचे तीर्थंकर झाले. ते एकविसावे तीर्थंकर होते. त्यांना 'राजर्षि' संबोधले जाई. ते विदेहातील 'मिथिला' नगरीचे राजे होते. जनकाचा म्हणजे रामायणाचा काळ हा विसावे तीर्थंकर 'मुनिसुव्रत' यांच्याशी निगडित आहे. याचाच अर्थ असा की जनकाच्या गुरुपरंपरेतील पूर्वज गुरू 'कपिलमुनि' रामायणाच्या आधी होऊन गेले.

उत्तराध्ययनाच्या आठव्या अध्ययनात कपिलमुनींनी केलेला उपदेश संग्रहीत केला आहे. या अध्ययनाच्या व्याख्याकाराने कपिलमुनींच्या आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण प्रसंग तेथे नोंदवला आहे. दोन मासे सोन्यापासून, कोडो सुवर्णमुद्रांपर्यंत त्यांच्या लोभी मनाचा प्रवास कसा झाला आणि स्वत:च्याच लोभीपणावर चिंतन करीत ते विरक्त कसे झाले–हे सर्व त्या कथेत नोंदवले आहे. कपिलांचा उपदेश मुख्यत: निर्लोभता व अपरिग्रहावर आधारित आहे.

निरासक्त, निर्लोभी अशा विदेही राजर्षींच्या परंपरेतील पूर्वजांना कपिलांपासून उपदेश मिळाला असणे अत्यंत स्वाभाविक वाटते. 'सिद्ध' आणि 'मुनि' शब्दाने गीतेने त्यांचा केलेला गौरव लक्षणीय वाटला म्हणून हा लेखनप्रपंच !

**********

## लेखांक १६ : तेजस्वितेची दखल

कपिल मुनींचा उल्लेख असलेल्या गीतेच्या दहाव्या अध्यायाचे नाव आहे 'विभूतियोग'. हा अध्याय लोकप्रिय आहे, आकर्षक आहे. गीताप्रेमींना तो कंठस्थही असतो. जगातील तेजस्वितेची दखल घेताना गीतेत कृष्ण अर्जुनाला म्हणतो,

''यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ।।'' (गी.१०.४१)

अर्थात्, 'जे जे काही विभूतियुक्त, कांतिमान्, शक्तियुक्त आहे, ते सर्व माझ्या तेजाच्या अंशापासून बनले आहे, हे तू जाण.'

जैन दृष्टीने जगतात अनंत जीव असून ते अनादिकाळापासूनच स्वतंत्र आहेत. ते त्यांच्या त्यांच्या कर्मांना अनुसरून संसारात भ्रमण करीत आहेत. तेजस्वितेचा साठा असलेल्या परमात्म्याचे ते ठिणग्यांप्रमाणे अंश नाहीत. 'परमात्म्यापासून उत्पन्न आणि परमात्म्यात विलीन' ही संकल्पना जैन विचारांच्या चौकटीत बसत नाही. मनुष्ययोनीतील कोणताही साधक जीव आध्यात्मिक उन्नती करीत करीत स्वत:च 'परमात्मा' होतो. असे मुक्त परमात्मे सिद्धरूपाने सिद्धशिलेवर सतत विद्यमान असतात. त्यांच्यापासून तेजांशनिर्मिती इ. संभवत नाही.

'परमात्म्याचे अंश म्हणून नव्हे, पण जगात अस्तित्वात असलेल्या तेजस्वितेची दखल जैन परंपरेने घेतली आहे. 'सूत्रकृतांग' या अर्धमागधी ग्रंथात महावीरांची स्तुती करताना म्हटले आहे की, 'वृक्षात जसा शाल्मली,वनात जसे नंदनवन, शब्दात जशी मेघगर्जना, ताऱ्यांमध्ये जसा चंद्र, गंधात चंदन, समुद्रात स्वयंभूरमण, नागात धरणेंद्र, हत्तीत ऐरावत, मृगात सिंह, नद्यात गंगा, पक्ष्यात गरुड, योद्ध्यात विश्वसेन, कमळात अरविंद, दानात अभयदान, तपात ब्रह्मचर्य जसे श्रेष्ठ आहे तसे ज्ञातृपुत्र महावीर सर्व लोकात उत्तम आहेत.'

जैन इतिहास-पुराणात ५४ महापुरुष आणि ६३ शलाकापुरुष प्रसिद्ध आहेत. 'शलाका' म्हणजे तेजस्वी प्रकाशकिरण. 'शलाका' शब्दाऐवजी 'श्लाघा' शब्दही वापरला जातो. त्याचा अर्थ स्तुत्य, श्लाघनीय व्यक्ती.

चोवीस तीर्थंकर सर्वाधिक श्लाघनीय असले तरी चक्रवर्ती, बलदेव, वासुदेव, इतकेच काय प्रतिवासुदेवांमध्येही 'शलाका'-तेजस्विता आहे. समवायांगसूत्रात ही संख्या ५४ आहे. आचार्य हेमचंद्रांनी त्रेसष्ठ शलाकापुरुषांचे चरित्र लिहिले आहे. 'तिलोयपण्णति' या ग्रंथात याखेरीज ११ रुद्र, २४ कामदेव आणि ९ नारदांचीही नोंद केलेली दिसते.हे तेजस्वी पुरुष कालचक्राच्या प्रत्येक अवसर्पिणीत आणि उत्सर्पिणीत होतच राहणार आहेत.

तेजस्वी पुरुषांच्या नोंदीसाठी जैनांनी वापरलेली ही चौकट, हा फॉरमॅट, हे मॉडेल लक्षणीय आहे. 'कृष्ण वासुदेवाच्या प्रखर, प्रभावी, आकर्षक व्यक्तिमत्वामुळे अशी चौकट बनवायला चालना मिळाली'-असे जैनविद्येच्या अभ्यासकांचे मतही येथे नोंदवावेसे वाटते.

**********

## लेखांक १७ : उद्धरेत् आत्मना आत्मानम्

गीतेच्या सहाव्या अध्यायाचे नाव 'ध्यानयोग', 'आत्मसंयमयोग' किंवा 'अध्यात्मयोग' असे नोंदवलेले दिसते. पतंजलींची योगसूत्रे आणि गीतेचा सहावा अध्याय यात विलक्षण साम्य आहे. पातंजलसूत्रे आणि जैन आचार्य उमास्वामिकृत तत्त्वार्थसूत्रे यांच्यातही अनेक साम्यस्थळे आढळतात. साहजिकच गीतेतील ध्यानयोग आणि जैनदर्शनाची विचारसरणी एकमेकांना पूरक आहे. संपूर्ण सहाव्या अध्यायाचा विचार एका लेखात करणे शक्य नाही. म्हणून त्यातील 'आध्यात्मिक स्वावलंबनाच्या' श्लोकावर लक्ष केंद्रित करू. तो श्लोक असा–

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मन: ।। (गी.६.५)

अर्थात्, आत्म्याने आत्म्याचा (स्वत:ने स्वत:चा) उद्धार करावा. स्वत:ला खचू देऊ नये. (कारण) आपणच आपल्या स्वत:चा बंधू किंवा आपणच आपला शत्रू आहोत.

या विचारांचे जणू काही पडसाद, प्रतिध्वनी वाटावेत असे विचार जवळजवळ सर्वच उपदेशपर व तत्त्वज्ञानपर जैन ग्रंथात उमटलेले दिसतात. ब्राह्मण किंवा वैदिक परंपरेच्या जोडीने, किंबहुना तिच्याही पूर्वीपासून चालत आलेल्या निर्ग्रंथ परंपरेतील मौलिक विचारांचा गाभाच मुळी 'आत्मावलंबन' आणि 'आत्मविजय' आहे.

आचार्य कुंदकुंद म्हणतात, 'आलंबणं च मे आदा, अवसेसाइं वोसरे ।'(भावपाहुड ५७)–आत्माच माझे अवलंबन आहे. इतर सर्वांचा मी त्याग करतो. कुंदकुंदांच्या 'एकत्व' आणि 'अन्यत्व' या अनुप्रेक्षांचा रोख 'आत्मनिर्भरता' हाच आहे. 'अशरण' अनुप्रेक्षेत तर वारंवार ते म्हणतात, 'तम्हा आदा हु मे सरणं' (म्हणून माझा आत्माच माझे शरणस्थान आहे.)

उत्तराध्ययनाच्या पहिल्या अध्ययनात आत्मविजयाचे महत्त्व सांगताना म्हटले आहे की,

''अप्पा चेव दमेयव्वो, अप्पा हु खलु दुद्दमो ।
अप्पा दंतो सुही होइ, अस्सिं लोए परत्थ च ।।'' (उत्त.१.१५)

आत्म्याचेच दमन करावे कारण तोच दुर्दम्य आहे. अशा दमनाने इहपरलोकी आपण सुखी होतो. उत्तराध्ययनाच्या विसाव्या अध्ययनात 'आपण आपले मित्र व आपणच आपले शत्रू', हा आशय प्रकट केला आहे. तेथेच अधिक काव्यात्मकतेने म्हटले आहे की, 'नरकातील भयंकर वैतरणी नदी व काटेरी शाल्मली वृक्ष माझ्याच आत्म्यात आहेत. तसेच माझ्याच आत्म्यात कामधेनू आणि नंदनवन यांचेही वास्तव्य आहे.'

'तू सुखकर्ता तू दुखहर्ता' असे हिंदू परंपरेत गणपतीच्या आरतीत म्हणतात. जैन परंपरा असे म्हणेल की, 'हे मनुष्यप्राण्या, तूच तुझ्या सुखांचा कर्ता आणि तूच तुझ्या दु:खांचा हर्ता आहेस.' उत्तराध्ययनातील गाथा तर अक्षरश: अशी आहे –

''अप्पा कत्ता विकत्ता य, दुहाण य सुहाण य''–तूच तुझ्या सुखदु:खांचा कर्ता आणि हर्ता आहेस.

**********

## लेखांक १८ : तत्त्वज्ञानातील प्रतिमासृष्टी (भाग १)

उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, दृष्टांत, अर्थांतरंन्यास हे अर्थालंकार आणि यमक, अनुप्रास इत्यादि शब्दालंकार हे खरेतर काव्याचे विषय आहेत. परंतु तत्त्वज्ञान सोप्या भाषेत समजावून देताना किंवा धार्मिक उपदेश देताना आध्यत्मिक व धार्मिक ग्रंथातही स्वाभाविकपणे यांचा आधार घेतला जातो. या काव्यविशेषांचा एकत्रित उल्लेख 'प्रतिमासृष्टी'या शब्दाने केला आहे. आपला प्रस्तुत विषय भगवद्‌गीता असल्याने तिच्यातील प्रतिमासृष्टीचा शोध जैन ग्रंथात घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातील साम्याने आश्चर्यचकित होण्याचे काहीच कारण नाही ; कारण हिंदू (वैदिक, ब्राह्मण) परंपरा आणि जैन परंपरा दोन्ही याच भारतवर्षात पुष्पित-फलित झाल्या आहेत. आजुबाजूचा निसर्ग आणि सामाजिक परिस्थितीतही समानच आहे. केवळ जैनच नव्हे तर धम्मपद, सुत्तनिपात इ. बौद्ध ग्रंथातही अनेकदा समान प्रतिमासृष्टी आढळून येते. विषय मोठा रंजक असल्याने तो एकंदर तीन लेखांमध्ये पाहू.

कुंदकुंदांचे 'अष्टपाहुड', शिवार्यांची 'भगवती आराधना' किंवा अर्धमागधी ग्रंथ 'उत्तराध्ययन' हे गीतेच्या बरोबर डोळ्यासमोर आणले तर गीतेपेक्षा विपुल आणि वेगळी प्रतिमासृष्टी त्यांमध्ये दिसते. गीतेच्या विस्ताराच्या मानाने उपमा, दृष्टांत इ. तुरळक असले तरी ते प्रामुख्याने नजरेसमोर ठेवून जैन ग्रंथातला आशय पाहू.

गीतेच्या दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगताना म्हटले आहे की,

''यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः ।
इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।।''

येथे इंद्रियसंयमासाठी कूर्माचा-कासवाचा दृष्टांत दिला आहे. 'ज्ञातृधर्मकथा' या कथा-दृष्टांतप्रधान ग्रंथात भ.महावीरांनी दोन कासवांची गोष्ट सांगितली आहे. वेळेवर इंद्रियांचे गोपन केल्याने एक कासव सुरक्षित राहिले. दुसरे मात्र संयम न केल्याने कोल्ह्याच्या भक्षस्थानी पडले. 'हिंदू मंदिरांमध्ये संयमाचे प्रतीक म्हणूनच कासव असते'-असा एक अन्वयार्थ लावला जातो.

'आवृत करणे', 'आवरण असणे' अशा शब्दावलींचा प्रयोग गीतेच्या तिसऱ्या अध्यायात दिसतो. धुराने अग्नी, धुळीने आरसा आणि वारेने गर्भ जसा आवृत होतो तसे 'कामा'ने म्हणजे 'भोगेच्छे'ने ज्ञान आवृत होतेअसे दृष्टांत गीतेत येतात. जैन कर्मशास्त्रात 'आवरणा'च्या सिद्धांताला अतिशय महत्त्व आहे. कर्मांच्या आठ प्रकारांमध्ये पहिले दोन प्रकार 'ज्ञानावरणीय' व 'दर्शनावरणीय' हे गणले जातात. ज्ञानावरणीय कर्म हे आत्म्याच्या ज्ञानगुणाला आवृत करते, झाकोळून टाकते असे म्हटले आहे. आवरणाप्रमाणेच कर्माच्या लेपाची उपमा गीतेत आढळते (४.१४) तर कर्मलेपाचा संपूर्ण दृष्टांत 'ज्ञाताधर्मकथा' ग्रंथात दिसतो.

गीतेच्या पाचव्या अध्यायात कमलपत्राची सुप्रसिद्ध उपमा आली आहे. ती उपमा आणि गीतेच्या पुढील अध्यायातील प्रतिमासृष्टी यानंतरच्या दोन लेखात पाहू.

**********

## लेखांक १९ : तत्त्वज्ञानातील प्रतिमासृष्टी (भाग २)

पाण्यात राहूनही त्यापासून अलिप्त राहणाऱ्या कमलाचा अथवा कमलपत्राचा दृष्टांत हिंदू व जैन परंपरात समानतेने येतो. अनासक्त पुरुषाने परमात्म्याच्या ठिकाणी कर्मे अपर्ण केल्याने त्याची स्थिती गीतेत अशा प्रकारे वर्णिली आहे– ''लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ।। (गी.५.१०)''. उत्तराध्ययनात म्हटले आहे–

''जहा पोमं जले जायं नोवलिप्पइ वारिणा ।
एवं अलित्तो कामेहिं तं वयं बूम माहणं ।।'' (उत्त.२५.२७)

या गाथेत 'खऱ्या ब्राह्मणा'चे लक्षण सांगताना, अलिप्त कमलाचे उदाहरण दिले आहे. या ग्रंथात 'पोक्खरिणीपलास' म्हणजे कमलपत्राचा दृष्टांत ३२ व्या अध्ययनातही दिला आहे. 'जह सलिलेण ण लिप्पइ कमलिणिपत्तं सहावपयडीए'–असे उदाहरण कषायमुक्त सत्पुरुषासाठी 'भावपाहुड' मध्ये दिले आहे.

गीतेच्या सहाव्या अध्यायात योग्याच्या स्थिरचित्ताला निर्वात स्थळी ठेवलेल्या दिव्याच्या शांतप्रकाशित ज्योतीची उपमा दिली आहे (गी.६.१९). भावपाहुडात कुंदकुंद म्हणतात –

''जह दीवो गब्भहरे मारुयबाहा विवज्जिओ जलइ ।
तह रायाणिलरहिओ झाणपईवो वि पज्जलइ ।।''

या गाथेतील दीप, गर्भगृह, वाऱ्याची बाधा नसणे, ध्यानप्रदीप प्रज्वलित होणे इत्यादी शब्द गीतेतील कल्पनेशी विलक्षण जुळणारे आहेत.

गीतेच्या सहाव्या अध्यायात अर्जुन कृष्णाला म्हणतो, 'मन मोठे प्रमाथी, बलवान व दृढ आहे. वाऱ्याला बांधून ठेवणे जसे अशक्य तसेच मनाचे आहे.' शिवार्य हे प्राचीन जैन ग्रंथकार मात्र आपल्या अस्सल शौरसेनी प्राकृत भाषेत मनाची तुलना माकडाशी करतात. ते म्हणतात, 'माकडाला चाळे करायला सतत कोणत्या ना कोणत्या वस्तूचा आधार लागतो. त्याप्रमाणे मन हे कोणत्यातरी विषयावाचून राहू शकत नाही. या मनमर्कटाला जिनोपदेशात रमवण्याचा प्रयत्न करावा.' (भ.आ.७६३–६४). ही उपमा त्यातील वेगळेपणामुळे चांगलीच लक्षात राहते.

'ज्ञानरूपी अग्नी आणि कर्मरूपी इंधन' हे गीतेचे आवडते रूपक आहे (गी.४.२१ ; ४.३७). जैन परंपरेनुसार कर्मक्षयासाठी ज्ञानापेक्षा तपाला महत्त्व दिलेले दिसते. 'भगवती आराधना' ग्रंथात अशा अर्थाच्या दोन–तीन गाथा येतात. 'तपरूपी अग्नी भवबीज दग्ध करते'–असे विधान 'मूलाचार' ग्रंथातही येते (मूला.७४९).

अग्नीत वेगाने उडी घेणाऱ्या पतंगाचा दृष्टांत गीतेच्या अकराव्या अध्यायात दिसतो. उत्तराध्ययनात अग्नीच्या 'आलोकलोल' रूपाने आकृष्ट होऊन मरण पत्करणाऱ्या पतंगाचा उल्लेख अतिशय काव्यमयतेने प्रस्तुत केला आहे (उत्त.३२.२४).

संसाराला म्हणजेजन्ममरणचक्राला सागराची उपमा देणे हे एकंदरीतच भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य दिसते. गीतेत कृष्ण म्हणतो, 'तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।' (गी.१२.७). उत्तराध्ययन, भगवती आराधना, अष्टपाहुड आणि इतरही अनेक ग्रंथांत 'संसारसागर' आणि 'संसारमहार्णव' हे शब्द वारंवार येतात. फरक इतकाच की जैन शास्त्रानुसार हा समुद्र त्याने पार करायचा आहे. 'शरीर ही नाव आहे. जीव हा नाविक आहे. संसार हा सागर आहे तो नाविकाने स्वसामर्थ्याने तरून जायचा आहे'.

**********

## लेखांक २० : तत्त्वज्ञानातील प्रतिमासृष्टी (भाग ३)

गीतेच्या १५ व्या अध्यायाच्या आरंभी 'ऊर्ध्वमूल', 'अध:शाख' अशा अश्वत्थवृक्षाचे रूपक आले आहे. 'अश्वत्थमेनं सुविरूढमूलं असङ्गशस्त्रेण दृढेण छित्वा' असाही उल्लेख आहे (गी.१५.३). भावपाहुडात म्हटले आहे की, 'मोहमहातरूवर चढलेली ही मायावल्ली, विषयरूपी विषपुष्पांनी लगडली आहे. मुनी या वृक्षवल्लींना ज्ञानरूपी शस्त्राने तोडून टाकतात' (भा.पा.१५६).

गीतेच्या याच अध्यायात, जन्मांतराच्या वेळी शरीर सोडून जाताना, जीव (आत्मा) आपल्याबरोबर काय घेऊन जातो त्याचे एका दृष्टांताच्या सहाय्याने वर्णन केले आहे. त्याचा आशय असा-'जसा वायू हा सुगंधित पुष्पाचा गांध बरोबर घेऊन दुसरीकडे जातो तसा एका शरीरातून दुसऱ्या शरीरात जाताना जीवात्मा पाच इंद्रिये व मन बरोबर घेऊन जातो.' गीतेतील दृष्टांत तर अतिशय बोलका आहे परंतु देहांतराच्या वेळी जीव (आत्मा) काय बरोबर घेऊन जातो याबाबत जैनशास्त्रात वेगळेच वर्णन येते. देहांतराच्या वेळी इंद्रिये व मन बरोबर जात नसून केवळ तैजस व कार्मणही अतिसूक्ष्म शरीरे बरोबर जातात.

गीतेच्या सोळाव्या अध्यायात, कामना-इच्छा-वासनांना 'दुष्पूर' असे विशेषण प्रयुक्त केले आहे. सामान्य संसारी मनुष्यांचे वर्णन 'आशापाशशतै: बद्धा:' अशा शब्दात केले आहे. उत्तराध्ययनाच्या 'कापिलीय' अध्ययनातही आशा-कामनांसाठी 'दुप्पूर' (दुष्पूर) हाच शब्दप्रयोग येतो. 'नमिप्रव्रज्या' अध्ययनात म्हटले आहे की, 'इच्छा हु आगाससमा अणंतिया'-लोभी माणसाची इच्छा ही खरोखरच आकाशाइतकी अनंत आहे.

'हरिकेशबल' नावाचे मुनी एक महिन्याच्या उपवासानंतर भिक्षा मागण्यासाठी निघतात. ते एका यज्ञमंडपाशी पोहोचतात. यज्ञशाळेतच राजकुमारीच्या विवाहाप्रीत्यर्थ भोजनाची तयारी सुरू असते. मुनी भिक्षा मागतात. मुनींचा एकंदर अवतार बघून यज्ञासाठी जमलेले ब्राह्मण त्यांना हाकलू लागतात. राजकुमारी मुनींचा प्रभाव जाणत असते. ती त्यांची क्षमा मागते. भिक्षा देते. ब्राह्मणांना प्रतिबोध देण्याची विनंती करते. 'आस्रव आणि संवर' या तत्त्वांचा तेउपदेश देतात. अखेरीस 'यज्ञा'चा आध्यात्मिक अर्थ समजावून सांगतात. ते म्हणतात-

'तप ही ज्योती आहे. जीवात्मा हा ज्योतिस्थान आहे. मन-वचन-कायेच्या प्रवृत्ती या आहुतीच्या पळ्या आहेत. शरीर हे गोवऱ्या आहे. कर्म हे इंधन आहे. संयमी आचरण हा शांतिपाठ आहे. असा प्रशस्त यज्ञ (होम) मी सतत करीत असतो' (उत्त.१२.४४)

यज्ञप्रधान संस्कृतीचे समाजात प्रचलन असताना, जैन विचारवंतांनी त्याचा लावलेला हा प्रतीकात्मक अर्थ दोन परंपरांच्या वैचारिक आदानप्रदानावर चांगलाच प्रकाश टाकतो.

**********

## लेखांक २१ : युद्धाचे रूपक (१)

भगवद्‌गीता हा ग्रंथ भारतीयांच्या गळ्यातला ताईत आहे. भारतातल्याच नव्हे तर जगभरातल्या विचारवंतांना या ग्रंथाने मोहिनी घातली आहे. महाभारतातल्या त्याच्या स्थानावरून असे दिसते की कौरव-पांडव युद्धासाठी कुरुक्षेत्रावर एकत्र जमल्यावर अचानक विषण्ण झालेल्या अर्जुनाला युद्धप्रवृत्त करण्यासाठी श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला हा उपदेश आहे. काही अभ्यासकांच्या मते गीतेला लाभलेली ही रणांगणाची पार्श्वभूमी हेच एक रूपक आहे. 'कर्तव्य काय आणि अकर्तव्य काय ?' असा समरप्रसंग सामान्य माणसाच्या आयुष्यातही अनेकदा येतो. अशा प्रसंगी गीता ही दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरते.

आपण या लेखमालेच्या आरंभी पाहिले आहे की जैन महाभारतात गीता नाही. 'महाभारतीय युद्ध' बहुधा ऐतिहासिक (?) घटना असावी. अशा हिंसाप्रधान पार्श्वभूमीवर तत्त्वज्ञानाची व विशेषत: अध्यात्माची मांडणी करावी, हे जैन ग्रंथकारांना रुचले नसावे. परंतु युद्धाचे रूपकात्मक वर्णन मात्र जैन ग्रंथकारांनी अनेक ठिकाणी, अनेक प्रकारे केलेले दिसते. भगवती आराधना, अष्टपाहुड आणि उत्तराध्ययनातील रूपकात्मक युद्धवर्णन पाहू.

दिगंबरीय आचार्य त्यांच्या 'शौरसेनी' भाषेत निबद्ध असलेल्या ग्रंथात युद्धाचे रूपक कसे सजवितात ते आजच्या लेखात पाहू. श्वेतांबरीय अर्धमागधी ग्रंथातील युद्धाच्या रूपकाची मांडणी उद्याच्या लेखात पाहू.

भावपाहुडातच कुंदकुंद आचार्य 'भंजसु इंदियसेणं' अशा शब्दात इंद्रियरूपी सैन्याचे 'भंजन' (बीमोड) करण्यास सांगतात. 'इंद्रियांना त्यांच्या त्यांच्या विषयांपासून दूर ठेवणे'- हा त्यांचे भंजन करण्याचा मार्ग आहे.

ज्ञान-दर्शन-चारित्र-तप यांची आराधना साधू करीत असतो. संयम व समभाव यांचा तो अभ्यास करतो. त्याच्या आध्यात्मिक विजयाचे वर्णन करताना भगवती आराधना म्हणते - ''लक्ष्यवेध, शस्त्रप्रहार इत्यादींमध्ये दक्ष असा योद्धा राजपुत्र जसा शत्रूला जिंकून त्याचा ध्वज हिरावून घेतो, तसा वर वर्णन केलेला साधू संथारारूपी रणभूमिवर आराधनेची पताका ग्रहण करतो'' (भ.आ.२२;२३). पुढे असेही म्हटले आहे की अभेद्य कवचाने सुरक्षित योद्धा जसा विजयी होतो तसाच संवररूपी कवचाने क्षपक परिषहरूपी शत्रूंना जिंकतो (भ.आ. १६७६;१६७७).

कुंदकुंदांच्या मते स्वर्गप्राप्ती करणे म्हणजे एका योद्ध्याला जिंकणे. मोक्षप्राप्ती म्हणजे करोडो योद्ध्यांना जिंकणे (मोक्षपाहुड २२). स्वर्ग-मोक्षाची अशी तुलना अभिनवच म्हणाची लागेल. जैन परंपरेतले मोक्षाचे श्रेष्ठत्व आणि स्वर्गाचे कनिष्ठत्वही यातून उत्तम प्रकारे अधोरेखित होते. बोधपाहुडात म्हटले आहे,

'मइधणुहं जस्स थिरं सुदगुण बाणा सुअत्थि रयणत्तं ।
परमत्थबद्धलक्खो णवि चुक्कादि मोक्खमग्गस्स ।।' (बोधपाहुड २३)

अर्थात् ''मतिज्ञानरूपी धनुष्य, श्रुतज्ञानरूपी प्रत्यंचा, रत्नत्रयरूपी बाण आणि निजशुद्धात्मरूप लक्ष्य असलेला मुनी मोक्षापासून कसा वंचित राहील ?''

**********

**जैन दृष्टिकोणातून भगवद्‌गीता**

## लेखांक २२ : युद्धाचे रूपक (२)

उत्तराध्ययनात नमी राजर्षी आणि ब्राह्मणरूपातील इंद्र यांच्यामधील संवाद अंकित केला आहे. नमी राजर्षी मिथिला नगरीचे राजे आहेत. ते विरक्त वृत्तीचे असल्यामुळे त्यांना राज्याची सर्व कर्तव्ये पार पाडल्यानंतर, दीक्षा धारण करावयाची आहे. त्यांच्या दीक्षेच्या निर्णयाने मिथिला नगरीतील लोक आक्रंदन करीत आहेत. त्यांना त्यांच्या राजकर्तव्यांची जाणीव करून देण्यासाठी इंद्र हा ब्राह्मण रूपात आला आहे. इंद्र हा नमींच्या क्षत्रियत्वाला आव्हान देत आहे. नमी राजर्षी इंद्राला आध्यात्मिक भाषेत उत्तर देत आहेत. युद्धाचे समग्र रूपक या अध्ययनात विस्ताराने सांगितले आहे.

''श्रद्धा हे माझे नगर आहे. तप-संयम या अर्गला आहेत. क्षमारूपी प्राकार त्रिगुप्तींनी सुरक्षित केला आहे. पुरुषार्थ हे धनुष्य, ईर्यासमिती ही प्रत्यंचा, दृढनिश्चय ही मूठ आहे. कर्मरूपी कवच भेदून विजेता मुनी हे अंतर्युद्ध जिंकतो. हजारो योद्ध्यांना जिंकण्यापेक्षा एकट्या आत्म्याला जिंकणे श्रेष्ठ आहे. 'अप्पाणमेव जुज्झाहि, किं ते जुज्झेण बज्झओ ?' हे आध्यात्मिक युद्ध महत्त्वाचे. बाह्य युद्धे कितीही जिंकून काय उपयोग ?'' (उत्तराध्ययन ९)

क्षुधा, तृष्णा, दंश-मशक, ज्ञानाचा अहंकार इत्यादी २२ कोष्टींना जैन शास्त्रात 'परिषह' (सहन करण्याच्या गोष्टी) असे म्हटले आहे. अध्यात्ममार्गी मुनीचे हे शत्रू आहेत. 'ते शत्रू त्रास देऊ लागले तर मुनीने काय करावे ?' याबद्दल उत्तराध्ययनात म्हटले आहे की –

''ते तत्थ पत्ते न वहिज्ज भिक्खू ।
संगामसीसे इव नागराया ।।'' (उत्त.२१.१७)

अर्थात् – युद्धात शत्रूचे बाण व प्रहार जसा आघाडीवर असलेला हत्ती निर्भयतेने सहन करतो त्याप्रमाणे भिक्षूने परिषह सहन करावेत. व्यथित होऊ नये.

जैन शास्त्राचा एकंदर अभिप्राय असा दिसतो की 'संयम' करणे हे 'बुझदिल' व्यक्तीचे काम नव्हे. संयमासाठी लागणारा 'पराक्रम' मुनीकडून अपेक्षित आहे. मानवी जन्मातील चार गोष्टींना परम अंग म्हटले आहे. चतुरंगीय या अध्ययनात म्हटले आहे की,

''चत्तारि परमंगाणि दुल्लहाणीह जन्तुणो ।
माणुसत्तं सुई सद्धा संजमंमि य वीरियं ।।'' (उत्त.३.१)

अर्थात् – या संसारात प्राणिमात्रांसाठी चार गोष्टी दुर्लभ आहेत. मनुष्यत्व, सद्धर्माचे श्रवण, श्रद्धा आणि संयमामध्ये पराक्रम.

केशीकुमार श्रमणांना याच अर्थाने 'घोर पराक्रमी' म्हटले आहे.

जैन परंपरेत क्षत्रियत्वाला प्राधान्य दिसते. चोवीसही तीर्थंकर क्षत्रिय आहेत. सर्व सुखोपभोग हात जोडून पुढे उभे असून आणि क्षत्रियोचित लढाऊ बाणा असूनही त्यांनी पराक्रम दाखविला तो अध्यात्माच्या प्रांतात ! युद्धाची रूपकात्मक वर्णने प्राचीन जैन ग्रंथात मिळण्याचे कदाचित् हेच कारण असेल !!

**********

## लेखांक २३ : गीतेतील यज्ञ : जैन समीक्षेसह (१)

अगदी मोजके अध्याय वगळता गीतेच्या प्रत्येक अध्यायात यज्ञविषयक विधाने आणि यज्ञसंस्थेचा पुरस्कार दिसून येतो. या लेखात आणि यापुढील दोन लेखात जैन समीक्षेसह गीतेतील यज्ञविषयक विचार प्रस्तुत केले आहेत.

गीतेला याची कल्पना आहे की यज्ञाचे निर्देश वेदांतूनच मिळतात. यज्ञकर्म हे 'काम्यकर्म' असून ते स्वर्गफल प्राप्त करून देतात. यज्ञाची क्रियाकांडप्रधानता आणि भोग-ऐश्वर्य देण्याची शक्ती दुसऱ्या अध्यायात नमूद केली आहे. 'भोगात आसक्तचित्त झालेल्यांची बुद्धी समभावात स्थिर होत नाही'-हे गीतेतीलच वाक्य यावरील उत्तम भाष्य आहे. कारण जैन दर्शनाचीही अशीच धारणा आहे.

गीतेच्या तिसऱ्या अध्यायात १० ते १६ या श्लोकांमध्ये 'यज्ञचक्रप्रवर्तन' ही संकल्पना मांडली आहे. प्रजापतीने यज्ञासह प्रजेची निर्मिती करून म्हटले की, 'यज्ञाद्वारे तुम्ही इच्छापूर्ती करून घ्या. यज्ञाद्वारे तुम्ही व देव परस्परांची उन्नती करून घ्या. अन्नापासून प्राणिमात्र जन्मतात, पर्जन्यापासून अन्न उत्पन्न होते, यज्ञामुळे पर्जन्य पडतो, यज्ञ हा कर्मसमुद्भव आहे, कर्म ब्रह्मापासून (वेदांपासून) जाणून घ्या. वेद परमात्म्यापासून उत्पन्न झाले. अशा प्रकारे ते सर्वगत ब्रह्म यज्ञात प्रतिष्ठित आहे. हे यज्ञचक्र अथवा सृष्टिचक्र सतत चालू ठेवण्यात मानवी जीवनाचे सार्थक आहे. यज्ञाप्रीत्यर्थ केलेली कर्मे मनुष्याला 'बंधक' ठरत नाहीत.'

जैन शास्त्रानुसार 'जगन्निर्मिती' प्रजापतीद्वारा झाली नसून 'जगत्' हे अनादि काळापासून अनंत जीवांच्या कर्मानुसार चालू आहे. प्रत्येक जीवाची इच्छापूर्ती ही शुभ कर्मांच्या पुण्यफलाच्या उदयावर अवलंबून असते. तो 'उदय' असला तरच इच्छापूर्ती होते अन्यथा नाही. त्याबाबत यज्ञीय कर्मे सहाय्य करू शकत नाहीत. 'देवान्भावयतानेन' इत्यादी श्लोकाची समीक्षा 'देव-मनुष्य संबंध' या लेखात यापूर्वीच केली आहे. पर्जन्य-अन्न व प्राणिमात्रांची शरीरे हा तार्किक क्रम सामान्यत: जैन शास्त्रास मान्य आहे. पर्जन्याचे कारण 'यज्ञ' नसून तो तर सृष्टीत चाललेल्या वायुकायिक आणि जलकायिकाचा खेळ आहे.

यज्ञीय कर्मांचे विधान वेदांमध्ये आहे हे खरे परंतु वेद परमात्म्यापासून झाले आहेत, हे मान्य करता येत नाही कारण परमात्मा नावाच्या स्वतंत्र, स्वयंभू व जगन्निर्मात्याची स्वतंत्र कल्पना जैन शास्त्रात नाही. कोणताही जीव (आत्मा) आध्यात्मिक प्रगतीने 'परमात्मा' संबोधला जाऊ शकतो. असा परमात्मा जगन्निर्मितीच्या प्रक्रियेत कोणताही सहभाग घेत नाही. 'यज्ञाच्या द्वारे सृष्टिचक्राचे प्रवर्तन होते', हा गीतेतील यज्ञविचाराचा गाभा आहे. जैन शास्त्रानुसार सृष्टिचक्र चालू राहण्याचा मुख्य गाभा जीवांची शुभाशुभ कर्मे आहेत, यज्ञ नव्हे. जैन मतानुसार प्रत्येक कर्म हे बंधकारक आहे. यज्ञीय कर्मेसुद्धा त्याला अपवाद ठरू शकत नाहीत.

अशा प्रकारे सृष्टिचक्राकडे पाहण्याचा जैनांच्या आणि वैदिकांच्या दृष्टीत मूलगामी भेद आहेत.

**********

## लेखांक २४ : गीतेतील यज्ञ : जैन समीक्षेसह (२)

गीतेच्या चौथ्या अध्यायातील २३ ते ३३ या श्लोकांमध्ये पुन्हा एकदा यज्ञविचार विस्ताराने केलेला दिसतो. यज्ञांचे विविध प्रकार सांगून त्यातील सर्वात श्रेष्ठ यज्ञ कोणता, याचीही चिकित्सा गीतेने केली आहे. तिसऱ्या अध्यायापेक्षा या अध्यायातील यज्ञसंकल्पनेची मांडणी पूर्णपणे वेगळी आहे. येथे केवळ कर्मकांडात्मक यज्ञाची चिकित्सा नसून 'आणखी कोणकोणत्या गोष्टींचा यज्ञात समावेश करता येईल', याचा विचार येथे आहे.

तेविसाव्या श्लोकात निरासक्त, मुक्त व ज्ञानी व्यक्तीचा उल्लेख आहे. जैन शास्त्रातही आदर्श मुनीचे वर्णन याच शब्दात केले जाते. 'यज्ञायाचरत: कर्मसमग्रं प्रविलीयते'–या गीतावाक्यात म्हटल्याप्रमाणे 'यज्ञार्थ केलेली कर्मे बंधकारक होत नाहीत' ही संकल्पना मात्र जैन शास्त्र मान्य करणार नाही. 'ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्'–या श्लोकार्धात ध्याता, ध्येय आणि ध्यान यांची एकरूपता सूचित केली आहे. असाच आशय कुंदकुंदांनी मोक्षपाहुडात व्यक्त केला आहे. ते म्हणतात,

''आरुहवि अंतरप्पा बहिरप्पा छंडिऊण तिविहेण ।
झाइज्जइ परमप्पा उवइट्ठं जिणवरिंदेहिं ।।'' (मोक्षपाहुड ७)

गीतेत यानंतर देवतांच्या पूजनालाही यज्ञ असे संबोधले आहे. 'श्रोत्रादि इंद्रियांना त्यांच्या शब्दादि विषयांपासून संयमाच्या सहाय्याने दूर करणे'–हा देखील गीतेच्या मते यज्ञच होय. सर्व इंद्रियकर्मे आणि प्राणकर्मे यांच्या सहाय्याने केलेले आत्मसंयमन हा 'योगयज्ञ' होय. गीतेच्या या अध्यायातील २९ आणि ३० व्या श्लोकात 'प्राणायाम' आणि 'नियताहार' यांनाही यज्ञकोटीत घातले आहे.

जैन आचारपरंपरेतील संयम, तप व ध्यान यांचे महत्त्व लक्षात घेता असे म्हणता येईल की, गीतेच्या चौथ्या अध्यायातील यज्ञविचार हा बहुतांशी जैन शास्त्राशी मिळताजुळता असाच आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की, 'द्रव्यमय यज्ञापेक्षा ज्ञानमय यज्ञ श्रेष्ठ आहे', हा विचार आणि 'ज्ञानाचे श्रेष्ठत्व' गीता अशाप्रकारे नोंदवते–

''श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञ: परंतप ।
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ।।'' (गी.४.३३)

ज्ञानाचे व ज्ञानयज्ञाचे श्रेष्ठत्व गीतेने इतरत्रही वारंवार नोंदविलेले दिसते. जैन ग्रंथांतही ज्ञानाचे श्रेष्ठत्व वारंवार सांगितलेले दिसते. ते मोक्षाचे एक मुख्य अंग असून 'भगवती आराधना' नावाच्या ग्रंथात कित्येक गाथांमध्ये या ज्ञानाचा महिमा सांगितला आहे.

भारतातल्या अवैदिक परंपरांनी कर्मकांडात्मक यज्ञाला जो विरोध नोंदविला त्याची आत्मपरीक्षणात्मक प्रतिक्रिया गीतेच्या चौथ्या अध्यायात स्पष्टपणे उमटलेली दिसते. परिणामी द्रव्ययज्ञाबरोबरच विविध यज्ञांचा उल्लेख करून अखेरीस ज्ञानयज्ञालाच झुकते माप दिले आहे.

**********

## लेखांक २५ : गीतेतील यज्ञ : जैन समीक्षेसह (३)

यज्ञांचे विविध प्रकार सांगून ‘ज्ञानयज्ञा’चे सर्वश्रेष्ठत्व सांगणे, हा गीतेच्या यज्ञविचारातील एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. पहिल्या लेखात नमूद केल्याप्रमाणे पाचव्या अध्यायापासून अठराव्या अध्यायापर्यंत प्राय: सर्व अध्यायात यज्ञविषयक विचार दिसतात. त्या विचारांचे निष्पक्ष विश्लेषण करू लागलो, तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. यज्ञीय उल्लेखांचा कल प्रथम द्रव्ययज्ञाकडून ज्ञानयज्ञाकडे झुकू लागला आणि गीतेच्या त्यापुढील अध्यायात त्यामध्ये भक्तीचे रंग भरू लागले. केवळ यज्ञाच्या बाबतीतच नव्हे तर अनेक महत्त्वाच्या मुद्यांबाबत गीतेत असे वैचारिक स्तर दिसतात. त्यावरून गीता ही ‘एककालिक’ आणि ‘एककर्तृक’ नाही याला पुष्टीच मिळते.

पाचव्या अध्यायाच्या शेवटच्या श्लोकात अचानक कृष्ण म्हणू लागतो, ‘मी सर्व यज्ञांचा व तपांचा भोक्ता, सर्व लोकांचा धनी आणि अवघ्या भूतांचा सखा आहे. माझे ‘सर्वलोकमहेश्वरात्मक’ स्वरूप ओळखले की व्यक्तीला शांति प्राप्त होते.’ आठव्या अध्यायात, ‘आधिभूत, आधिदैव आणि आधियज्ञ सर्व काही मीच आहे’–असे श्रीकृष्णाने परमेश्वराच्या वतीने म्हटले आहे. तसेच ‘अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च’ असेही तो म्हणतो. भक्तिमार्ग म्हटला की नामस्मरण व जप अनिवार्यपणे येतोच. विभूतियोग अध्यायात ‘यज्ञानां जपज्ञोऽस्मि’ असा उल्लेख दिसतो. ‘माझे अद्‌भुत विश्वरूपदर्शन वेद, तप, दान अगर यज्ञाने होणे शक्य नाही’–असा उल्लेख अकराव्या अध्यायात येतो. विश्वरूपदर्शनाची समीक्षा आपल्याला वेगळ्या लेखात करावयाची आहे.

सोळाव्या अध्यायाच्या पहिल्या तीन श्लोकांमध्ये दैवी संपत्तीचे अनेक गुण सांगितले आहेत. अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांती, अपैशुन्य, दया, क्षमा, दान, दम, स्वाध्याय, तप इत्यादि अनेक उत्तमोत्तम गुणांची ती यादी आहे. त्यात यज्ञाचा केलेला समावेश तार्किक दृष्ट्याही सुसंगत वाटत नाही. वैदिक परंपरेचे वैशिष्ट्य असलेला‘यज्ञ’ हा त्या यादीत घालणे, गीताकाराला अनिवार्य वाटले असावे.

सतराव्या अध्यायात यज्ञाचे सात्विक, राजस व तामस असे प्रकार केले आहेत. थोडे चिंतन केल्यावर असे लक्षात येते की, हे वस्तुत: यज्ञाचे प्रकार नसून व्यक्तींच्या मानसिकतेचेच वेगवेगळे प्रकार आहेत. त्याकाळच्या समाजात यज्ञ व होम तर चालू होते परंतु त्यांचे हेतू आणि प्रकार वेगवेगळे होते. कोणीकोणी दंभाने, अहंकाराने, सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्याच्या हेतूने, श्रद्धाहीन व मंत्रहीनपणेही ‘यज्ञ’ करीत असत. वैदिकेतर संप्रदायांनी यज्ञांकडे अनादरणीय दृष्टीने पाहण्याचे कारण सतराव्या अध्यायात गीतेने स्वत:च नोंदविलेले दिसते.

‘‘वेद, यज्ञ, तप आणि दान याने जे पुण्यफल प्राप्त होते ते सर्व ओलांडून (पार करून) ध्यानयोगी सर्वश्रेष्ठ पद प्राप्त करतो’’, हे गीतेच्या आठव्या अध्यायातील विधान मात्र जैन दृष्टीने सर्वांशाने यथार्थ ठरते.

**********

## लेखांक २६ : जैन ग्रंथातील यज्ञविचार (१)

वाचकहो, आपल्याला असे वाटेल की गीतेतल्या यज्ञविचारांची जैन दृष्टीने समीक्षा केल्यावर आता अजून काय वेगळे सांगणार ? पण वस्तुस्थिती अशी आहे की यज्ञसंस्था ही त्याकाळी भारतात अतिशय दृढमूल असल्यामुळे भगवान् महावीरांच्यापासून थेट १२-१३ व्या शतकापर्यंत, वेगवेगळ्या जैन ग्रंथांत, यज्ञाविषयीची निर्ग्रंथ परंपरेची स्पष्ट मते नोंदविली जात होती. ती मते अतिशय लक्षवेधी आणि मूलगामी असल्यामुळे जैन-अजैन सर्वांनाच त्यातून अनेक नव्या गोष्टी समजतील. म्हणून हा पुढचा लेखनप्रपंच !

आचारांगसूत्रात यज्ञ, यज्ञकुंड, यज्ञोपवीत, आहुती, पशुबली आणि द्रव्ययज्ञ या गोष्टींचा साक्षात् उल्लेख केलेला दिसत नाही. यज्ञाचा साक्षात् निर्देश न करता, अग्निकायिक जीवांच्या हिंसेचा परिणाम या ग्रंथात दाखवून दिला आहे जैन दर्शनाच्या दृष्टीने अग्निकायिक जीवांना एकेंद्रिय जीव मानले आहे. केवळ 'अग्नी प्रज्वलित केल्यामुळे किती जीवांची हिंसा होते', याचे प्रत्ययकारी वर्णन आचारांगात येते. यातून भ. महावीरांना असे ध्वनित करावयाचे आहे की, जर केवळ अग्नी प्रज्वलित केल्यामुळे एवढी जीवहिंसा होते तर द्वींद्रियांपासून पंचेंद्रियांपर्यंत हिंसा जेथे केली जाते, अशा यज्ञांचा विचार देखील करणे अशक्यप्राय गोष्ट आहे. म्हणूनच आचारांगात अहिंसा विवेचनानंतर या विचाराला पूर्णविराम दिला आहे.

'भगवतीसूत्र' आणि 'स्थानांगसूत्र'यांमध्ये नरकगतीची चार कारणे दिली आहेत. ती अशी-महाहिंसा, महापरिग्रह, प्राणिवध आणि मांसभक्षण. या चारही गोष्टी प्रामुख्याने यज्ञाशीच निगडित आहेत. परंतु यज्ञाचा प्रत्यक्ष संबंध जोडून दाखवलेला नाही. 'उत्तराध्ययनसूत्रा'त हरिकेशबल मुनींनी यज्ञाचा प्रतीकात्मक अर्थ समजावून सांगितलेला आहे. त्याचे विवेचन यापूर्वीच्या लेखात केलेलेच आहे.

'निरयावलियाओ' या उपांगग्रंथात सोमिल ब्राह्मणाची कथा दिली आहे. आरंभी तो पशुवधात्मक यज्ञ करीत असतो. नंतर मनन, चिंतन करून तूप, तीळ, तांदूळ अशा अहिंसक द्रव्ययज्ञाकडे वळतो. इतरही समाजोपयोगी कामे करतो. कालांतराने त्याला एक देवता बोध देते. त्याला त्या कृत्यांमधीलही फोलपणा कळतो. अखेर तो श्रावकव्रते धारण करतो. म्हणजेच, 'स्वत:हून विचार करण्याचे सामर्थ्य असलेल्या ब्राह्मणांनी स्वत:मध्ये योग्य ते बदल करूनच जिनधर्माचे अनुयायित्व पत्करले', हे या प्रातिनिधिक घटनेवरून स्पष्ट होते.

अर्धमागधी आगमग्रंथांमध्ये दिसून येणाऱ्या उल्लेखांवरून असे जाणवते की वैदिक परंपरेत यज्ञ करणे हे स्वर्ग व पुण्यप्राप्तीचे साधन मानले असले तरी धर्माच्या निमित्ताने केलेली हिंसासुद्धा जैन धर्माला मान्य नाही. समाजमनावर असलेले यज्ञाचे प्रभुत्व पाहून, यज्ञाची निंदा न करता, प्रतीकात्मक दृष्टी वापरली आहे. कठोर विरोध समाजप्रवाहाच्या विरुद्ध जाणारा होता त्याचबरोबर वैदिक परंपरेतही औपनिषदिक चिंतनाची प्रक्रिया सुरू झाली होती. म्हणून अर्धमागधी आगमांच्या काळात यज्ञावर प्रखर टीका दिसत नाही.

**********

## लेखांक २७ : जैन ग्रंथातील यज्ञविचार (२)

वाचकहो, कालच्या लेखात आपण अर्धमागधी ग्रंथांतील यज्ञविचारांचा आढावा घेतला. आज आपण ‘जैन महाराष्ट्री’ भाषेतल्या तीन प्रातिनिधिक ग्रंथांत आणि जैन पुराणात नोंदवलेल्या यज्ञविचारांचे सार पाहू.

जैन रामायण ‘पउमचरिय’ (पद्मचरित-रामचरित) मध्ये नारदाच्या तोंडून संपूर्ण यज्ञाचाच प्रतीकात्मक अर्थ वदविला आहे. ‘अज’ शब्दाचा अर्थ ‘बोकड’ असा करावा की, ‘‘अ-ज-अंकुरित होण्याची शक्ती नाहिशी झालेले ‘जव’ असा करावा ?’’ अशी चर्चा नारद-पर्वत-वसु-संवादात केली आहे. पुढे स्पष्टपणे म्हटले आहे की पशुवधाला पाठिंबा देणाऱ्यांना नरकप्राप्ती होते (पउम.१२.२५,२६).

‘विशेषावश्यकभाष्य’ ग्रंथात ‘अग्निहोत्रं जुहुयात् स्वर्गकाम:’ या सुप्रसिद्ध वाक्याचा अर्थ लावताना वेगळीच पद्धत अवलंबिली आहे. ‘‘मृत्यूची देवता यम, धनाची देवता कुबेर अशा प्रकारच्या देवता काल्पनिक आहेत. त्यांचे अस्तित्वच नसल्याने त्यांची स्वर्गीय निवासस्थाने, स्वर्गकामना, देवता-आवाहन आणि देवताप्रीत्यर्थ यज्ञ हे सर्व निरर्थक होय’’ असे म्हटले आहे (गा.१८८३).

‘धर्मोपदेशमालाविवरण’ हा ग्रंथ उपदेशपर प्राकृत ग्रंथांचे प्रतिनिधित्व करतो. यातील यज्ञविषयीची टीका अतिशय स्पष्ट आहे. ब्राह्मणपुत्र ‘दत्त’ आणि सुप्रसिद्ध जैन आचार्य ‘कालकाचार्य’ यांचा संवाद या कथेत रंगविला आहे. दत्त हा कालकाचार्यांना यज्ञाचे फळ विचारतो. ते तीन वेळा तुटक-तुटक उत्तरे देतात. ती अशी-१) पंचेंद्रिय प्राण्यांच्या वधाने जीव नरकात जातात. २) पापकर्मांचे फळ नरकच आहे. ३) धर्माचे लक्षण अहिंसा आहे.

दत्त चिडून नेमके फळ विचारतो. अखेर मुनी स्पष्टपणे सांगतात, ‘‘हिंसक यज्ञाचे फळ नरकच आहे.’’

कालकाचार्य क्रांतिकारी विचारांचे असल्याने त्यांनी यज्ञांना प्रखर, स्पष्ट विरोध धाडसाने केलेला दिसतो (धर्मो.पृ.३०-३१).

आ.पुष्पदंतकृत ‘महापुराण’ अपभ्रंश भाषेतील जैन पुराणांचा प्रातिनिधिक ग्रंथ आहे. त्यात पशुबळी, सुरापान इ.नी युक्त यज्ञाला तीव्र विरोध दिसतो. धूप, दीप, फुले, तांदूळ यांनी केलेल्या धार्मिक पूजांना त्यांनी ‘याग, यज्ञ, क्रतु, पूजा, सपर्या, इज्या, अध्वर, मख’ असे संबोधले. म्हणजेच आ. पुष्पदंतांनी द्रव्यात्मक यज्ञ जैन पूजाविधींच्या रूपात परिवर्तित केलेला दिसतो.

सुमारे ११-१२ व्या शतकापासून जैन समाजात पूजा, व्रते, मंदिरे, ग्रंथपूजन, क्रियाकांड, उत्सव इ. गोष्टींचा प्रवेश झालेला दिसतो. ऐहिक अभ्युदयासाठी हळूहळू स्तोत्रे, मंत्र, होम-हवन इ. वाढत गेले. जिनरक्षकदेवतांच्या पूजनाची परंपराही सुरू झाली. १४ व्या शतकाच्या आरंभी ‘विधिमार्गप्रपा’सारखे ग्रंथही लिहिले जाऊ लागले.

सारांश, आगमकाळात यज्ञाला स्पष्ट विरोध न करता, तो हिंसा-अहिंसेच्या विवेचनाच्या रूपात दिसतो. चौथ्या शतकापासून नवव्या शतकापर्यंत सर्व प्रकारच्या यज्ञांना विरोध स्पष्ट नोंदवलेला दिसतो. दहाव्या-अकराव्या शतकात व नंतर जैन समाजात पूजा व क्रियाकांड दृढमूल होऊ लागलेले दिसतात.

तात्त्विक सिद्धांत आणि आचार-व्यवहार यातील स्थित्यंतरे ही कोणत्याही परंपरेत चालू रहातात हेच खरे !

**********

## लेखांक २८ : गीतेतील विश्वरूपदर्शन : पार्श्वभूमी

महाभारतातील भीष्मपर्वाच्या अंतर्गत आलेल्या गीतेचे वर्णन आपण 'दार्शनिक काव्य' अशा शब्दात करू शकतो. कुरुक्षेत्रावरील रणभूमीवर केल्या गेलेल्या ह्या श्रीकृष्ण-उपदेशात कधी दार्शनिक अंश दिसून येतात तर कधी काव्यात्मक अंशांचा प्रभाव दिसून येतो. गीतेच्या अनेकानेक भक्तांनी गीतेतील ११ व्या 'विश्वरूपदर्शन' अध्यायाची इतकी प्रशंसा केली आहे की त्याचे जैन दार्शनिक दृष्टीने परीक्षण तसेच मूल्यांकन करणे आवश्यक आहे.

गीतेच्या प्रत्येक अध्यायाची पार्श्वभूमी वेगवेगळी आहे. दुसऱ्या अध्यायाचा आरंभ संजयाच्या निवेदनाने होतो. काही अध्यायांमध्ये कृष्णाचे प्रत्यक्ष कथनच आहे तर काही अध्यायांमध्ये अर्जुन प्रश्न विचारतो आणि कृष्ण उत्तरस्वरूप अध्यायाचे कथन करतो. 'विश्वरूपदर्शन' हा गीतेतील अकरावा अध्याय आहे. दहाव्या अध्यायात कृष्णाने 'विभूतियोगा'चे कथन केले आहे. या विश्वात जे जे विभूतिमत्, सत्त्व, श्रीमद् तसेच उर्जित आहे त्या सर्वांना कृष्णाने परमेश्वराच्या विभूती मानल्या. 'हे सर्व ईश्वराचे अंशरूप आहेत', अशा प्रकारच्या वचनाने प्रभावित होऊन अर्जुनाची जिज्ञासा जागृत झाली.

एवमेतद्यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर ।
द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ।।
मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो ।
योगश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ।। (गी.११.३ ; ११.४)

पुरुषोत्तमाचे समग्र ऐश्वर्यसंपन्न रूप तो पाहू इच्छितो. त्याला हेही माहीत आहे की अशाप्रकारचे ऐश्वर्यसंपन्न रूप पाहण्याचे सामर्थ्य आपल्या चर्मचक्षूंमध्ये नाही. म्हणून तो अतिशय नम्रपणे पुरुषोत्तमाचे ऐश्वर्यसंपन्न रूप पाहण्याची इच्छा प्रकट करतो.

गीतेच्या उपदेशाच्या प्रवाहात या 'विश्वरूपदर्शन' विषयाला समाविष्ट करण्याचे काय कारण आहे ? दार्शनिक दृष्टीने कमी महत्त्व असलेल्या या काव्यमय, अद्भुत, रोमांचक आणि रौद्र वर्णनयुक्त या अध्यायाचे मूलस्रोत कोठे सापडतील ? वैदिक परंपरेतील कोणकोणत्या ग्रंथांमध्ये अशा प्रकारचे उल्लेख येतात ? अशा अनेक महत्त्वपूर्ण विषयांचा शोध घेत घेत आपण ऋग्वेदाच्या 'सहस्रशीर्षा पुरुष:' या सूक्तवचनापर्यंत पोहोचतो. ऋग्वेदातील पुरुषसूक्त, यर्जुर्वेदातील रुद्राध्याय, अनेक प्रमुख उपनिषदे, श्रीमद्भागवत तसेच अनेक पुराणे व गीतेचे अनुकरण करणाऱ्या अनेक अन्य गीतांमध्ये कोणत्या ना कोणत्या स्वरूपात 'विश्वरूपदर्शन' येतेच. आद्यशंकराचार्य, डॉ. राधाकृष्णन्, योगी अरविंद, लोकमान्य टिळक तसेच अन्यही अभ्यासकांनी या 'विश्वरूपदर्शना'ची अतिशय प्रशंसा केली आहे. 'सर्व अध्यायांचे सार', 'गीता-पर्वताचे सर्वोच्च शिखर', 'गीतेच्या सुवर्णपात्रातील मिष्टान्न' इ. स्तुतिसुमनांद्वारे अलंकृत अशा 'विश्वरूपदर्शना'चे, जैन दार्शनिक दृष्टीने आपण मूल्यांकन करणार आहोत.

**********

## लेखांक २९ : विश्वरूपदर्शनाची जैन मीमांसा

अर्जुनाच्या विनंतीनंतर कृष्ण म्हणतो,

पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रश: ।
नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ।। (गी११.५)

अर्थात् 'हे पार्था, नाना वर्णांची आणि आकृतींची माझी शेकडो हजारो रूपे तू बघ', असे म्हणून कृष्ण स्वत:च्या देहामध्ये अर्जुनाला विराट विश्वरूपाचे दर्शन घडवितो. जैन शास्त्रानुसार विश्वनिर्मिती, परिपालन तथा संहार करणारा तसेच विश्वाचे विराट स्वरूप स्वत:त समेटू शकणारा असा कोणीही ईश्वर, परमेश्वर अथवा ईश्वरी अवतार नाही. सर्वज्ञ अथवा केवली त्यांच्या देहात असे विराट दर्शन कधीही घडवत नाहीत. विश्वातील समग्र वस्तूंचे सर्व पर्यायांसहित ज्ञान त्यांना होते. परंतु त्यात सत्यता असते, अद्‌भुतता नसते. विश्वदर्शनाची नुसती इच्छा प्रकट केल्याने ते होणार नाही. त्यासाठी स्वत:चे प्रयत्न व सामर्थ्य यांची आवश्यकता आहे. कृष्णाच्या कथनानुसार त्यची ही शक्ती 'यौगिक शक्ती अथवा ऐश्वर्य' आहे. जैन मतानुसार तीर्थंकर-केवली यांच्यातही अशा अनंत शक्ती असतात. परंतु कोणाच्या विनंतीवरून अथवा स्वत:हूनही आपल्या यौगिक शक्तींचे प्रगटीकरण जैन शास्त्रास संमत नाही.

कृष्ण जाणत आहे की अर्जुनाच्या चर्मचक्षूंमध्ये विश्वरूप पाहण्याचे सामर्थ्य नाही. म्हणून तो म्हणतो, 'दिव्यं ददामि ते चक्षु: ।' जैन शास्त्रानुसार हे दिव्यचक्षु 'ज्ञानचक्षु'च असू शकतात. कारण ज्ञानचक्षूंमध्येच सर्व काही पाहण्याचे सामर्थ्य असते. परंतु हे ज्ञानचक्षु स्वत: केलेल्या ज्ञानाराधनेनेच प्राप्त होतात, ती 'देण्या-घेण्याची' वस्तू नाही. जैन शास्त्रानुसार कृष्ण आणि अर्जुन दोन स्वतंत्र जीव आहेत. एक जीव कधीही दुसऱ्याच्या आध्यात्मिक शक्तीत हस्तक्षेप करू शकत नाही.

विराट स्वरूपाचे दर्शन घडवून कृष्णाने अर्जुनाला युद्धाची प्रेरणा दिली आहे. कृष्ण म्हणतो,

''तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व, जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् ।
मयैवैते निहता: पूर्वमेव, निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ।।'' (गी.११.३३)

जैन शास्त्रानुसार कोणताही व्यावहारिक हेतू साध्य करण्यासाठी, आध्यात्मिक दृष्टीने अपरिपक्व असलेल्या जीवाला आंशिक विश्वरूपदर्शन घडविणे हे तीर्थंकर, केवली यांच्यासारख्या वीतरागी व्यक्तींबाबत केवळ असंभवनीय आहे.

अकराव्या अध्यायाच्या ३२ ते ३४ या श्लोकांमध्ये विराट पुरुषाच्या रौद्र रूपाचे व असहनीय तेजाचे वर्णन अर्जुन करतो. मृत्युमुखात प्रवाहित होणाऱ्या योद्ध्यांना बघून अर्जुन भयभीत होतो, थरथर कापतो, व्यथित होतो. जैन दृष्टीने आपण असे म्हणू शकतो की सर्वज्ञ केवलींना ज्ञानोपयोगाने विश्वाचे यथार्थ ज्ञान जेव्हा होते तेव्हा ते त्या वस्तुनिष्ठ सत्याचा सहज स्वीकार करतात. त्यांच्यामध्ये भीती आणि खिन्नता निर्माण होण्याचा प्रश्नच नाही.

'निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्' हा कृष्णाने अर्जुनाला दिलेला आदेश आहे. जैन दर्शनालाही हे संमत आहे की जीवाला सुखदु:ख इत्यादि प्राप्त होण्यासाठी विविध निमित्ते त्याच्या संपर्कात येत असतात. परंतु कोणाच्या मृत्यूला जाणूनबुजून निमित्त बनण्याची प्रेरणा देणे, हे जैन दर्शनाच्या दृष्टीने अत्यंत चुकीचे आहे.

**********

## लेखांक ३० : गीता आणि जैन परंपरेतील 'अद्भुतता'

गीतेत श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वाच्या चार पैलूंचे दर्शन गीतेच्या अकराव्या अध्यायात होते. हेच या अध्यायाचे वैशिष्ट्य आहे. अकराव्या अध्यायापर्यंत कृष्ण हा अर्जुनाचा बंधू, सखा, सारथी आणि मार्गदर्शक आहे. या अध्यायात प्रथमच कृष्ण हजारो मस्तके, बाहु, मुखे असलेला विराट पुरुष बनतो. रौद्रस्वरूपी 'काळ' बनून समोर येतो. विस्मयचकित आणि भीतिग्रस्त अर्जुनाने वारंवार वंदन आणि विनंती केल्यावर सौम्य चतुर्भुज विष्णुरूपात दिसतो. काही वेळातच दोन हात असलेल्या वासुदेव कृष्णाच्या रूपात अवस्थित होतो. 'या अध्यायातील अद्भुतता आणि रोमांचकता जैन चरित आणि पुराणग्रंथात येते का ?'–असा प्रश्न विचारल्यावर त्याचे उत्तर होकारार्थी द्यावे लागते.

खुद्द भ.महावीरांच्या चरित्रात अद्भुततेचे अनेक अंश आढळतात. त्रिशला राणीची चौदा स्वप्ने ; हरिणैगमेषी देवांच्या द्वारे देवानंदा ब्राह्मणीच्या उदरातून गर्भस्थ बालकाचे अपहरण आणि त्रिशलेच्या उदरात स्थापना ; अंगुष्ठद्वारा मेरुपर्वताचे चालन ; त्यांचे चौतीस अतिशय ; गोशालकाने तेजोलेश्या सोडल्यावर यक्षद्वारा संरक्षण ; गौतमादिगणधरांच्या मनातील प्रश्न जाणून त्यांचे केलेले समाधान–असे अनेक अद्भुत प्रसंग हेच सिद्ध करतात की भ.महावीरांचा जनमानसावरील प्रभाव दृढ करण्यासाठी त्यांच्या चरित्रकारांनी हे अद्भुत अंश आणले असावेत. 'कृष्णचरितातील अद्भुत अंशांशी त्यांचे दिसून येणारे साधर्म्य'–हीदेखील एक लक्षणीय बाब मानावी लागेल.

केवलींनी 'लोकपूरण समुद्घाता'च्या द्वारा आपले आत्मप्रदेश त्रैलोक्यात पसरविणे ; आ. कुंदकुंदांचे चारणऋद्धिद्वारा महाविदेहक्षेत्रात गमन ; जैन मुनींचे आकाशगमन, अंजनसिद्धी आदि सिद्धींचे प्रयोग ; आ.प्रभवांनी केलेला अवस्वापिनी विद्येचा प्रयोग ; स्थूलिभद्रांनी सिंहाचे रूप धारण करणे–इत्यादि अनेक अद्भुत कृत्यांची भरमार जैन चरित–पुराणांमध्ये दिसते. जर जैन या साऱ्या अद्भुत रोमांचक घटनांवर विश्वास ठेवत असतील तर विश्वरूपदर्शनातील अद्भुततेवर संदेह व्यक्त करणे ठीक नव्हे !

सारांश दोन्ही परंपरेत अद्भुतांचे अंश आहेत. आपल्याला एकाची अद्भुतता 'ग्राह्य' आणि दुसऱ्याची 'त्याज्य' असे मानता येणार नाही. मानले तर तो आपला सांप्रदायिक अभिनिवेश ठरेल. जर या अद्भुतांची योजना महावीरचरितात 'धर्मप्रभावनार्थ' असे मानले तर कृष्णचरितातही ती 'धर्मसंस्थापनार्थ' मानावी लागेल. जैन साहित्याच्या चिकित्सक विचारवंतांनी भ.महावीरांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेऊन असे विचार प्रकट केले आहेत की, त्यातील सारी अद्भुतता दूर हटविली तरीही त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

हीच गोष्ट कृष्णाच्या बाबतीतही तितकीच खरी आहे. फरक इतकाच की दोघांची कार्यक्षेत्रे वेगवेगळी होती. भ.महावीर आध्यात्मिक दृष्टीने महान आत्मा होते तर भ.श्रीकृष्ण समकालीनांमध्ये निपुण राजनीतिज्ञ होते.

**********

## लेखांक ३१ : 'कर्म' कशाला म्हणतात ?

भारतीय परंपरेत 'कर्म' शब्द अनेक अर्थांनी वापरलेला दिसतो. कोणतीही 'हालचाल' म्हणजे कर्म. 'कृत्य' अगर 'कार्य' या अर्थानेही 'कर्म' शब्द वापरतात. ते कार्य चांगले असल्यास 'सत्कर्म' आणि वाईट असल्यास 'दुष्कर्म' संबोधले जाते. 'नशीब' किंवा 'नियति' यांचा निर्देशही 'कर्म' शब्दाने केला जातो. सामान्य व्यक्तीकर्माचा उल्लेख 'प्रारब्ध' असाही करते. 'कर्मभोग', 'कर्मधर्मसंयोग' असे वाक्प्रयोग किंवा 'दैव देते कर्म नेते' असे वाक्प्रचार एकंदरीतच भारतीयांच्या हाडीमाशी खिळले आहेत. रोग, अपमृत्यू इत्यादि विविध प्रकारच्या दु:खांची उपपत्ती लावण्यासाठी 'कर्म', 'ललाटलेख' अशा शब्दांचा आधार विशेषच घेतला जातो. मानवी प्रयत्नांनी जे चुकवता येत नाही अशा गोष्टींचा समावेश 'कर्मा'त करण्याकडे प्रवृत्ती दिसते. म्हणूनच चार्वाकांसारखे 'नास्तिक' वगळता भारतातल्या विविध विचारधारांनी आपापल्या तत्त्वज्ञानात 'कर्मसिद्धांत', 'पूर्वजन्म-पुनर्जन्म' आणि 'कार्य-कारण-संबंध' यांची चर्चा एकत्रितपणे केलेली आढळते.

व्याकरणशास्त्राच्या दृष्टीने ''कर्त्याला जे अत्यंत इष्ट असते, ते 'कर्म' होय''. ''मी भोजन करतो''-या वाक्यात 'मी' हा 'कर्ता' आणि 'भोजन' हे कर्म होय. उत्तराध्ययनसूत्रात 'कत्तारमेवा अणुजाइ कम्मं' असे वचन आहे. 'कर्म हे कर्त्याच्या पाठोपाठ जाते'-हे वाक्य व्याकरणाच्या दृष्टीने जितके बरोबर आहे तितकेच तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेही बरोबर आहे. यज्ञाला प्राधान्य देणारे 'मीमांसा' नावाचे दर्शन 'यज्ञीय क्रियाकांडाला' 'कर्म' म्हणतात. 'उदरभरणनोहे जाणिजे यज्ञकर्म'-असे म्हणताना आपल्यालाही हाच अर्थ अपेक्षित असतो. 'बाह्य उपचार, अवडंबर' या सर्वांना 'कर्मकांड' म्हणण्याकडेही आपला कल असतो. 'वैशेषिक' दर्शन त्यांच्या विशिष्ट परिभाषेत 'कर्म' शब्दाचा अर्थ नोंदवते. सांख्य दर्शनात 'कर्म' शब्द 'संसार' (जन्म-मृत्यु-संसरण) या अर्थानेही आलेला दिसतो. महाभारतात आत्म्याला बांधणाऱ्या शक्तीला 'कर्म' म्हटले आहे. शांतिपर्वात असे वचन आहे की, 'प्राणी कर्माने बांधला जातो व विद्येने मुक्त होतो.' (शांति.२४०.७)

'अंगुत्तर-निकाय' या बौद्ध ग्रंथात सम्राट मिलिंदाच्या प्रश्नाला उत्तर देताना भिक्षू नागसेन म्हणतात, 'हे राजन्, कर्मांच्या विविधतेमुळे माणसांमध्ये विविधता येते. सर्व प्राणी त्यांच्या त्यांच्या कर्मांचे उत्तराधिकारी आहेत. आपले कर्म हाच बंधू, आश्रयस्थान आहे.' अशोकाच्या शिलालेखातील ९ व्या सूचनेत 'कर्मांच्या प्रभावानेच व्यक्ती सौख्यभोग घेते'-असा आशय व्यक्त केला गेला आहे. पातंजलयोगसूत्रातील दुसऱ्या साधनपादात 'कर्माशय-त्यांचे विपाक-पाप-पुण्य' यांची चर्चा येते.

गीतेच्या अठराही अध्यायात वेगवेगळ्या संदर्भात कर्मविषयक उल्लेख येतात. कर्म, अकर्म, विकर्म, नैष्कर्म्य, सात्त्विक-राजस-तामस कर्म - अशा प्रकारचे उल्लेख संपूर्ण गीतेत विखुरलेल्या स्वरूपात दिसतात. कर्मसिद्धांताची एकत्रित सुघट मांडणी गीतेत नाही. प्रासंगिक व संवादस्वरूप गीतेत ती तशी असणे अपेक्षितही नाही.

जैन परंपरेत 'कर्मसिद्धांत' हा संपूर्ण आचारशास्त्राचा पाया असल्याने केवळ या विषयाला वाहिलेले अक्षरश: शेकडो लहानमोठे ग्रंथ उपलब्ध आहेत. जैन वाङ्मयात 'कर्मसाहित्य' ही एक स्वतंत्र शाखाच आहे. त्याखेरीज तत्त्वप्रधान, कथाप्रधान ग्रंथांत, इतकेच काय पुराण आणि चरितग्रंथांतसुद्धा वेळोवेळी कर्मसिद्धांत उपदेशरूपाने आलेला दिसतो.

वाचकहो, यापुढील काही लेखांमध्ये गीतेतील कर्मविषयक विचारांचा जैन दृष्टीने अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

**********

## लेखांक ३२ : कर्मण्येवाधिकारस्ते

निष्काम कर्मयोगाची महती सांगणारा गीतेच्या दुसऱ्या अध्यायातला हा ४७ वा श्लोक, अध्यायक्रमानुसार कर्मविचार पाहू लागलो तर पहिलाच श्लोक आहे. दुसऱ्या अध्यायाचा एकंदर रोख, 'तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चय:' (अर्जुना, ऊठ आणि युद्ध कर) असाच आहे. आत्म्याचे स्वरूप सांगून झाल्यावर ३१ व्या श्लोकापासून कृष्णाचा व्यावहारिक उपदेश सुरू होतो. प्रस्तुत श्लोकात कृष्ण म्हणतो, ''कर्म करण्यापुरताच तुझा अधिकारआहे, फळावर तुझा अधिकार नाही. फलाशा मनात ठेवून कर्म करू नकोस. (पापाच्या भीतीने) कर्म टाळण्याकडे तुझा कल नसावा.''

लो. टिळक या श्लोकाला 'निष्काम कर्मयोगाची चतु:सूत्री' म्हणतात. वरकरणी पाहता, यात तर्कसंगतीच्या दृष्टीने आणि जैन दृष्टीनेही अनेक विसंगती जाणवतात. त्या प्रथम प्रश्नरूपाने उपस्थित करू. 'अधिकार' शब्दाचा नक्की अर्थ काय ? अधिकारात 'निवडीचे स्वातंत्र्य' असते. प्रत्येक कामाबाबत आपल्याला तसे असते का ? कर्माचा जो कर्ता असतो तोच भोक्ताही असतो. म्हणजे 'अधिकार' असो वा नसो प्रत्येक कर्माचे फळ अनिवार्यपणे भोगावेच आहे. ध्येयप्राप्ती, उद्दिष्ट यांना 'फलाशा' मानले तर, ती ठेवल्याशिवाय काम करणे शक्य आहे का ? विनाप्रयोजन काम तर 'मंद' व्यक्तीही करणार नाही.

''(हिंसारूप) पापापासून सुटका व्हावी म्हणून अनेक प्रकारची 'सावद्य कर्मे' टाळावीत''-असा उपदेश तर अनेक जैन ग्रंथांत येतो. मग या चतु:सूत्रीचा अर्थ लावायचा कसा ?

पहिली गोष्ट अशी की ही चार कर्मविषयक विधाने अर्जुनाचे क्षत्रियत्व आणि गृहस्थत्व लक्षात घेऊन केलेला प्रासंगिक उपदेश आहे. त्याचे कर्मसिद्धांतात रूपांतर करता येत नाही. पापाच्या भीतीने अर्जुनाने केलेला पलायनवाद कृष्णाला मान्य नाही म्हणून हा सल्ला आहे.

चातुर्वर्ण्यव्यवस्था आणि विशेषत: जातिव्यवस्था जैन आणि बौद्ध दोघांनीही वेळोवेळी नाकारली. जैनांनी धार्मिक आचाराच्या दृष्टीने 'गृहस्थधर्म' आणि 'साधुधर्म' सांगितला. या दोन्ही आचारातही नियमावली घालून दिली. आता जैन दृष्टीने तीच त्यांची 'कर्तव्यकर्मे' ठरतात. 'बारा व्रते' किंवा 'अकरा प्रतिमा' श्रावक-श्राविकांनी आदरपूर्वक ग्रहण करावी आणि निष्ठापूर्वक पाळावी अशी अपेक्षा आहे. पाच महाव्रते आणि गुप्ति-समिती इत्यादींचे पालन साधु-साध्वींकडून अपेक्षित आहे. 'निदान' (म्हणजे विशिष्ट उद्दिष्टाने) तप करू नये-असा आदेश आहे. संथारा धारण करताना 'जीविताशंसा' व 'मरणाशंसा' दोन्ही ठेवू नये-असे सांगितले. हाच तो 'फलाशेचा त्याग' आहे. 'मा ते सङ्गो अस्तु अकर्मणि'-याची जैन दृष्टीने अशीही उपपत्ती लावता येईल की, 'स्वयंपाक इ. करण्याने अग्निकायिक, जलकायिक, वनस्पतिकायिकांची हिंसा होते. म्हणून मी स्वयंपाकच करणार नाही'-असा पलायनवाद तर जैन श्राविकेकडूनही अपेक्षित नाही. जैन गृहस्थाने उपजीविकेसाठी व्यवसाय करताना 'निषिद्ध व्यवसाय' टाळावेत परंतु 'पाप लागेल' म्हणून कोणताच व्यवसाय करू नये-असे जैन शास्त्रही सांगत नाही. श्रावकाने सोयीपुरते साधूसारखे वागणे आणि साधूने वेळोवेळी सबबी सांगून श्रावकांसारखे वागणे जैनशास्त्राच्या कडक आचारप्रणालीत बसत नाही.

सारांश काय, वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था नाकारली तरी 'निष्काम कर्मयोग' जैन परिप्रेक्ष्यातही बऱ्याच अंशी लागू पडतो.

**********

**जैन दृष्टिकोणातून भगवद्‌गीता**

## लेखांक ३३ : कर्मांचा लेप आणि आवरण

आजच्या लेखापासून आपण कर्मसिद्धांताच्या मांडणीतील मुख्य विषयाला प्रारंभ करणार आहोत. कर्मांच्या बाबतीत तीन पदावली जैन आणि हिंदू दोन्ही परंपरेत वारंवार वापरण्यात येतात. त्या म्हणजे, 'कर्मांचा लेप', 'कर्मांचे आवरण' आणि 'कर्मांचा बंध'.

जीवाला अर्थात् जीवात्म्याला त्याने केलेल्या प्रत्येक कर्माचा जणू काही लेप बसत असतो. गीतेच्या चौथ्या अध्यायात कृष्ण स्वत:चाच दाखला देऊन सांगतो, 'न मां कर्माणि लिम्पन्ति, न मे कर्मफले स्पृहा' (गी.४.१४). पाचव्या अध्यायातील कमलपत्राच्या दृष्टांतात म्हटले आहे की, 'परमात्म्याच्या ठिकाणी कर्मे ठेवून, जो निरासक्त राहतो तो पाण्यातील कमलपत्राप्रमाणे, संसारात राहूनही पापाने लिप्त होत नाही'.

जैन शास्त्राने कर्मांच्या लेपाचा विचार अधिक सूक्ष्मतेने केला आहे. त्यांचे म्हणणे असे की कर्म म्हटले की 'लेप' हा आलाच. निरासक्त राहिले तर तो लेप 'हलका' असेल. दुर्भावना (कषाय) ठेवून कर्म केले तर तो 'पक्का' असेल. जैन दृष्टीने कृष्ण हा 'वासुदेव' आहे. त्याची निरासक्ती, श्रेष्ठता, प्रभाव जैनांनाही मान्य आहे. म्हणूनतर तो 'शलाकापुरुष' आहे. कृष्णाचे आयुष्य अनेक घटनांनी गजबजलेले आहे. तो सतत 'कार्यरत' आहे. त्याचीही कर्मांचा लेप, आवरण अगर बंध यातून सुटका नाही. म्हणून तर तो कृष्णाच्या जन्मातून 'मोक्षगामी' झाला नाही. त्या सर्व कर्मलेपातून मुक्त झाल्यावर भावी काळात तो 'तीर्थंकर' होणार आहे. 'कर्म केले की लेप अगर बंध आलाच'–या जैन चौकटीतून विचार केला तर हे पटवून घ्यायला काही हरकत नाही. कृष्णश्रद्धेला धक्का बसणार असेल तर त्यांनी हा विचार सोडून द्यावा.

कर्मांच्या लेपाचा दृष्टांत जैन परंपरेत अत्यंत रुळलेला आहे. एका भोपळ्यावर आठ लेप एकावर एक चढलेले आहेत. भोपळ्यात वस्तुत: पाण्यावर तरंगण्याची शक्ती आहे. तरीही तो आठ लेपांमुळे 'जड' बनतो व जलाशयाच्या तळापर्यंत जातो. पाण्याचा परिणाम होऊन जसजसा एक–एक लेप दूर होईल तसतसा तो वरती येऊ लागेल. लेप पूर्ण दूर झाल्यावर जलाशयाच्या पृष्ठभागावर तरंगू लागेल. तसाच जीवात्मा आहे.

जैन शास्त्रानुसार 'ज्ञानावरणीय', 'दर्शनावरणीय', 'वेदनीय', 'मोहनीय', 'आयुष्क', 'नाम', 'गोत्र' आणि 'अंतराय' अशी आठ प्रकारची कर्मे आहेत. अनादि काळापासून संसारात भ्रमण करणाऱ्या जीवाला याचे लेप बसलेले आहेत. मानवी जीवनात संयम आणि तपाने लेप 'जीर्ण' करता येतात. असे 'ढिले' किंवा 'जीर्ण' लेप जीवापासून दूर होणे म्हणजे 'कर्मनिर्जरा' होय. लेप पूर्ण दूर झाले की वर वर्णन केलेल्या भोपळ्याप्रमाणे जीव 'ऊर्ध्वगामी' होतो. मोक्षगामी होतो. उत्तराध्ययनात 'जयघोष मुनि' म्हणतात–'उवलेवो होइ भोगेसु, अभोगी नोवलिप्पइ' (उत्त.२५.४१).

'कर्माचे आवरण' ही पदावली देखील गीता आणि जैन ग्रंथात समान दिसते. गीतेच्या चौथ्या अध्यायात म्हटले आहे की, 'धुराने जसा अग्नी, धुळीने जसा आरसा आणि वारेने जसा गर्भ, तसे काम–क्रोध इत्यादींनी ज्ञान झाकले जाते' (गी.३.३८–३९). कर्मांच्या 'आवरणशक्ती'चा असाच उल्लेख अठराव्या अध्यायातही येतो.

जैन कर्मशास्त्रानुसार आठ कर्मांपैकी प्रथम दोन कर्मांची नावेच मुळी 'ज्ञानावरणीय' आणि 'दर्शनावरणीय' अशी आहेत.

'कर्मलेप' अगर 'कर्मावरण' हे केवळ भावात्मक आहे की द्रव्यात्मक आहे ?–याचा खुलासा गीतेत दिसत नाही. जैन कर्मशास्त्राप्रमाणे मात्र कर्मांचेही अतिसूक्ष्म परमाणु असतात. ते जीवाला 'लिप्त' व 'आवृत' करतात. त्यांचेच सूक्ष्म 'कार्मण शरीर' बनते. ते शरीर मृत्यूनंतर प्रत्येक जीवाबरोबर पुढील जन्मात जात असते.

**********

## लेखांक ३४ : कर्मांचा बंध

वाचकहो, कालच्या लेखात आपण ‘कर्मांचा लेप आणि आवरण’ या संकल्पनांची चर्चा केली. परंतु कर्मसिद्धांतातील सर्वात महत्त्वाची संकल्पना आहे ‘कर्मांचा बंध’. कर्मसिद्धांत मानणाऱ्या सर्वच भारतीय विचारधारांनी ‘कर्मांनी बद्ध होणे’ आणि ‘कर्मांपासून मुक्त होणे’ ही पदावली स्वीकारलेली दिसते. आजच्या लेखात गीतेच्या सर्व अध्यायात विखुरलेले ‘कर्मबंधा’चे स्वरूप एकत्रितपणे पाहू.

गीतेनुसार, सर्व प्रकारच्या कायिक, वाचिक आणि मानसिक हालचाली म्हणजे ‘कर्म’. जैन शास्त्रानुसारही ‘कायवाङ्मन:कर्म योग:’ (तत्त्वार्थ ६.१) अर्थात् जैन परिभाषेत त्रिविध कर्मांना ‘काययोग’, ‘मनोयोग’ व ‘वचनयोग’ असे म्हणतात. गीतेत ‘योग’ शब्द अनेक अर्थांनी वापरला आहे. पण हा विषय वेगळा असल्याने वेगळ्या लेखात पाहू. कायिक इ. तीन कर्मांनी जीवात्म्यास ‘बंध’ होत असतो. कर्मांशिवाय तर क्षणभरही रहाणे शक्य नाही (गी.३.५).

गीतेचा सर्वात अधिक भर आहे तो कर्मांच्या बंधकत्वावर. ‘कर्मभि: न स बध्यते’, ‘आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय’, ‘मोक्ष्यसे कर्मबन्धनै:’ असे कर्मबंधाचे उल्लेख थेट अठराव्या अध्यायापर्यंत येतात. ‘प्रकृति’चे सत्त्व, रज आणि तम हे गुण जीवात्म्याला शरीराशी कसे बांधून ठेवतात याचे वर्णन १४ व्या अध्यायात येते. सत्त्वगुण सुखाच्या आणि ज्ञानाच्या आसक्तीने बांधतो. रजोगुण तृष्णेच्या आसक्तीने बांधतो. तमोगुण प्रमाद, आळस व निद्रेने बांधतो. या बंधामुळे क्रमाने शुभ व अशुभ फळे मिळत असली तरी आत्मकल्याणाच्या दृष्टीने सर्व ‘बंध’च आहेत. जैन शास्त्रातही सुवर्णाच्या व लोखंडाच्या बेडीचा दृष्टांत नेहमीच देण्यात येतो.

कर्मांनी बंध होतो म्हणून कर्मे करणे थांबविणेही शक्य नाही कारण कर्मांशिवाय ‘शरीरयात्रा’ चालणार कशी ? (गी.३.२४) हा मोठाच पेचप्रसंग आहे. कर्मे करणे भाग आहे. त्यांचा बंध होणेही अटळच आहे. गीतेने कर्मबंधनातून सुटकेचे मार्गही सुचविले आहेत. अनासक्ती, निष्कामता, फलाशा सोडणे, कर्मे परमेश्वरार्पण करणे, स्थितप्रज्ञता, समत्व–अशा विविध शब्दावलीतून हे मार्ग सूचित होतात. गीतेच्या चौथ्या अध्यायात ‘गहना कर्मणो गति:’ असे विधान येते. तेथेच कर्म, विकर्म (निषिद्ध कर्म) आणि अकर्म (अनासक्त कर्म) यांचेही उल्लेख येतात.

यज्ञ, यज्ञीय कर्मे आणि त्यांचे बंधकत्व–अबंधकत्व यासंबंधीचे गीतेच्या तिसऱ्या अध्यायात व्यक्त केलेले विचार मात्र जैन विचारचौकटीत बसू शकत नाहीत. गीता म्हणते–यज्ञ हा कर्मसमुद्भव आहे. कर्म हे ब्रह्मसमुद्भव (ब्रह्मदेव अथवा वेदांपासून उद्भवलेले) आहे. ब्रह्म हे अक्षरसमुद्भव (परमात्म्यापासून उत्पन्न) आहे. यास्तव ‘यज्ञीय कर्मे सोडून इतर सर्व कर्मे बंधक होतात.’

यज्ञीय कर्मांचा केलेला हा अपवाद जैन शास्त्राला मुळीच मान्य नाही. गीतेच्या अनेक व्याख्याकारांनी ‘यज्ञ’ शब्दाचा अर्थ बदलण्याचा येथे प्रयत्न केला आहे. परंतु गीतेत यज्ञाची (प्रत्यक्ष कर्मकांडात्मक द्रव्यप्रधान यज्ञाची) भलावण अनेक अध्यायात केली आहे. यज्ञात कोणकोणत्या प्रकारे जीवहिंसा होते, हे आधीच्या लेखात चर्चिले असल्याने येथे पुनरुक्ती करीत नाही. तात्पर्य काय ? जैन दृष्टीने यज्ञीय कर्मेही बंधकच आहेत.

तत्त्वार्थसूत्राच्या आठव्या अध्यायाचे नावच आहे ‘बंध’–अर्थातच कर्मांचा बंध. किंबहुना, जैनशास्त्रात नव–तत्त्वांचे संपूर्ण प्रारूपच बंध आणि बंधमुक्ती यावर आधारित आहे. त्याचा विचार उद्याच्या लेखात करू.

**********

## लेखांक ३५ : कर्मबंधाचे प्रकार

गीतेने कर्मबंधाचा विचार वारंवार केला असला आणि 'कर्मबंधापासून संपूर्ण मुक्ती म्हणजे मोक्ष'–असे सांगितले असले तरी 'कर्मबंध' या विषयावरचे जैन शास्त्रकारांचे चिंतन आणि प्रतिपादन कितीतरी सूक्ष्म आणि उदाहरण–दृष्टांतांनी अत्यंत जिवंत आणि प्रत्ययकारी असे दिसून येते.

जैन तत्त्वज्ञान नऊ तत्त्वांमध्ये बसविलेले आहे. जीव (consciousness, energy) आणि अजीव (matter) हे अनादि काळापासून एकमेकांच्या संपर्कात आहे.केवळ 'अजीव' तत्त्व पुद्‌गलरूपाने (परमाणु किंवा स्कंधरूपाने) स्वतंत्रपणे दिसू शकेल पण 'जीव' तत्त्व, या लोकात, 'अजीव' तत्त्वाच्या संपर्काशिवाय राहू शकत नाही. जीव–अजीव संपर्क म्हणजे कर्मे आलीच. ती कायिक–वाचिक–मानसिक तीनही प्रकारची आहेत. ही कर्मे जीवामध्ये सतत स्रवत, प्रवेश करीत रहातात. हेच 'आस्रव' तत्त्व होय. आस्रवित झालेली कर्मे जीवात्म्याला बांधतात. हे 'बंध' तत्त्व होय. आस्रव–बंध प्रक्रिया अनंत काळापासून चालू असल्याने आपल्या कर्मबंधांचा ठाव सामान्य माणसाला घेता येत नाही.

कर्मांपासून मुक्ती हवी असेल तर प्रथम आत येत रहाणारी कर्मे थांबवली पाहिजेत. त्यांना रोखणे म्हणजे 'संवर' तत्त्व होय. संवराची साधने अनेक आहेत. व्रतधारणा आणि संयमपालन ही त्यात मुख्य आहेत. बाहेरून येणारा कर्मास्रव रोखणे जितके आवश्यक आहे तितकाच आधीच्या कर्मांचा क्षय करणे आवश्यक आहे. हेच 'निर्जरा' तत्त्व होय. '''पाप' आणि 'पुण्य' ही स्वतंत्र तत्त्वे नाहीत'', असे काही चिंतकांचे मत आहे. 'आस्रव' आणि 'बंध' या तत्त्वांमध्ये त्यांचा अंतर्भात करता येतो. सर्व कर्मांचा पूर्ण क्षय होऊन जीवाची शुद्ध चैतन्यावस्था म्हणजे 'मोक्ष' तत्त्व होय.

तत्त्वार्थसूत्राच्या आठव्या अध्यायात कर्मबंध, त्याचे पाच हेतू, कर्मबंधाचे स्वरूप, त्याचे प्रकार, कर्मांच्या आठ मूळ प्रकृती आणि उत्तरप्रकृती यांची चर्चा खूपच विस्ताराने येते. प्रत्येक जीव हा कषाययुक्त (क्रोध, अहंकार,कपट, लोभ इ.नी युक्त) असल्याने तो सूक्ष्म कर्मपुद्‌गलांचे ग्रहण करतो. आत्म्याचा व कर्मपुद्‌गलांचा हा संबंध म्हणजे'बंध' होय. जसा दिवा हा वातीच्या मार्फत तेलाचे ग्रहण करून आपल्या उष्णतेने त्याला ज्योतीच्या रूपात प्रकट करतोतसा जीव कषायरूप विकारवासनांनी, योग्य त्या पुद्‌गलांचे ग्रहण करून ते कर्मरूपात परिणत करतो.

ज्ञानाला, दर्शनाला आवृत करणे, सुख–दु:ख देणे इत्यादी प्रत्येक कर्माचे जे स्वभाव आहेत त्या स्वभावाची निर्मिती म्हणजे 'प्रकृतिबंध' होय. ज्या प्रकारचे कर्म जीवांनी बांधले, ते किती काळ जीवाबरोबर रहाणार तीकालमर्यादा हा 'स्थितिबंध' होय. कर्मे बांधताना ती किती तीव्रतेने अगर मंदतेने बांधली आहेत हा 'अनुभावबंध' होय. यातीव्र–मंदतेलाच 'अनुभाग', 'रस' अगर 'विपाक' अशी नावे आहेत. अर्थात् कर्मांची विविध फळे देण्याची शक्ती हा 'अनुभाव' होय. ग्रहण केलेली कर्मराशी आपापल्या स्वभावानुसार परिणमित होऊन आत्मप्रदेशांशी बांधली जाणे म्हणजे 'प्रदेशबंध' होय.

पारिभाषिक शब्दांमुळे काहीसे क्लिष्ट वाटणारे हे बंधाचे चार प्रकार उदाहरणाद्वारे समजावून घेऊ.

गाय इत्यादी प्राण्यांनी गवतचारा खाल्ल्यानंतर तो दुधात परिणत होतो तेव्हा स्वभावत:च त्यात माधुर्य निर्माण होते, हा प्रकृतिबंध होय. दुधाचा हा स्वभाव किती काळापर्यंत कायम रहाणार याची कालमर्यादाही त्यात तयार होते, हा स्थितिबंध होय. त्या दुधाच्या मधुरतेत जी तीव्रता–मंदता असते, तो अनुभागबंध होय. या दुधाचे जे पौद्‌गलिक (परमाणूंपासून होणारे)परिणाम आहेत तो प्रदेशबंध होय.

जैन शास्त्रात सांगितलेले कर्मबंधाचे  पाच हेतू (कारणे) गीतेतून कशी प्रतीत होतात ते पुढील लेखात पाहू.

**********

## लेखांक ३६ : कर्मबंधाचे हेतू (कारणे) (१)

'कर्मांचा बंध कशाकशाने होतो ?' या प्रश्नाचे उत्तर देताना जैन शास्त्राने त्याची पाच गटात वर्गवारी केली आहे. तसे पाहिले तर असंख्य कारणे सांगता येतील. परंतु शिष्यांना बोध देण्यासाठी कर्मबंधाचे पाच हेतू तत्त्वार्थसूत्रात नमूद केले आहेत. त्यांची पारिभाषिक नावे आहेत–मिथ्यात्व, अविरति, प्रमाद, कषाय आणि योग.

कर्मबंधाच्या हेतूंची नावे गीतेत जशीच्या तशी येणे शक्य नाही. परंतु प्रत्येकाचा भावार्थ लक्षात घेतला तर गीतेत पाचही बंधहेतूंची चर्चा विविध ठिकाणी आढळते.

या पाचही संकल्पना नीट समजावून घ्यायच्या असतील तर पाच स्वतंत्र लेख लिहावे लागतील. विशेषत: 'मिथ्यात्व' आणि 'सम्यक्त्व' या विषयावर जैन आचार्यांनी स्वतंत्र ग्रंथ लिहिले आहेत. व्यवहारनयाने आणि निश्चयनयोन दोहोंच्या विविध प्रकारच्या व्याख्या केलेल्या दिसतात. सामान्यत: असे म्हणता येईल की ज्या गोष्टी वस्तुत: श्रद्धेय नाहीत–त्या गोष्टींना, व्यावहारिक लाभाकडे नजर ठेवून श्रद्धेय मानणे, त्यांचे पूजन–उपासना करणे हे मिथ्यात्वहोय.

विविध प्रकारच्या लहानमोठ्या देवतांची उपासना–पूजा करणे हे गीतेलाही मान्य नाही, असे दिसते. चौथ्या अध्यायात म्हटले आहे की,

कांक्षन्त: कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवता: ।
क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ।। (गी.४.१२)

भावार्थ असा की तात्कालिक ऐहिक लाभांसाठी लोक देवदेवता पूजतात. त्यांच्या कामनांची पूर्तीही होते. परंतु त्याने आत्मकल्याण अगर परमात्मप्राप्ती मात्र होणे शक्य नाही.

१७ व्या अध्यायात असेही म्हटले आहे की सात्त्विक लोक देवांची, राजस लोक यक्षराक्षसांची आणि तामस लोक भूतप्रेतांची उपासना करतात. देवपूजनाने सुद्धा पुण्य आणि स्वर्गफलच प्राप्त होते. 'यो यच्छ्रद्धः स एव स:' (गी.१७.३) या कथनानुसार गीतेला आध्यात्मिक प्रगतीसाठी 'सम्यक् श्रद्धा'च अपेक्षित आहे असे दिसते. म्हणजेच पर्यायाने अनाठायी श्रद्धा अर्थात् 'मिथ्यात्व' कर्मबंधाकडे नेणारे आहे–असा गीतेचा अभिप्राय दिसतो. श्रद्धाहीनपणे केलेल्या गोष्टींना गीतेने 'तामस' म्हटले आहे. बाह्यत: इंद्रियनिग्रह करून जी व्यक्ती मनाने कामभोगांचे चिंतन, स्मरण करते, अशा व्यक्तीच्या आचरणाला गीतेने 'मिथ्याचार' असे संबोधले आहे.

कर्मबंधाचा दुसरा हेतू आहे 'अविरति'! म्हणजे दोषांपासून विरत न होणे. अर्थात् 'आपल्या अंगच्या दोषांपासून आपल्याला दूर जायचे आहे', 'दोष काढून टाकायचे आहेत', याची जाणीव न ठेवणे. गीतेच्या सोळाव्या अध्यायात आसुरी प्रवृत्तीच्या लोकांचे वर्णन येते. त्या वर्णनाचा एकंदर अभिप्राय असा आहे की क्रूर, दांभिक, अहंकारी लोक हिंसा, असत्य, चौर्य इत्यादी 'अव्रतां'च्या आहारी जातात. परिणामी अधिकाधिक दृढ कर्मबंध करून घोर नरकात जाऊन वारंवार संसारभ्रमण करतात. सोळाव्या अध्यायाच्या १० व्या श्लोकातील 'अशुचिव्रत' हा शब्द 'अविरति' या बंधहेतूशी अतिशय मिळताजुळता आहे.

कर्मबंधाच्या 'मिथ्यात्व' आणि 'अविरति' या दोन हेतूंचा विचार आजच्या लेखात केला. 'प्रमाद', 'कषाय' आणि 'योग' या तीन हेतूंचा विचार उद्याच्या लेखात करू.

**********

## लेखांक ३७ : कर्मबंधाचे हेतू (कारणे) (२)

कर्माचा बंध होण्याचे तिसरे कारण म्हणजे 'प्रमाद'. प्रमाद-अप्रमाद, प्रमत्तता-अप्रमत्तता - या गोष्टींना जैन आचारशास्त्रात अनन्यसाधारण महत्त्व आहे. दुर्लक्ष, असावधानी, बेफिकिरी, विस्मरण-अशा अनेक अर्थछटांचा 'प्रमादा'त समावेश होतो. 'गौतमा, तू क्षणभरही प्रमाद करू नकोस' हे भ. महावीरांचे शब्द याबाबत वारंवार उद्धृत करण्यात येतात. प्रमाद म्हणजे आत्मविस्मरण. चांगल्या कार्यांविषयी अनादर ! कर्तव्य-अकर्तव्य जाणण्यात केलेला बेसावधपणा.

सदैव सावध रहाण्याचा इशारा गीतेतही दिला आहे. 'तामस सुखा'चे वर्णन करताना म्हटले आहे की,

'यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मनः ।
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ।।' (गी.१८.३९)

गीतेत'अप्रमाद' या शब्दासाठी 'अतन्द्रित' अर्थात् 'सावधान' या शब्दाचा उपयोग केला आहे. आशय असा की निद्रा, आळस, कामचुकारपणा इ. सर्व वरकरणी सुखकारक वाटले तरी अंतिमतः आत्म्याला कर्मबंध निर्माण करणारे ठरतात.

कर्मबंधाचा चौथा हेतू आहे 'कषाय'. जैन परिभाषेत क्रोध, मान (गर्व, अहंकार), माया (ढोंग, कपट) अणि लोभ या चौकडीला 'कषाय' म्हणतात. हे चार राग (आसक्ती) आणि द्वेषाचीच रूपांतरे होत. याशिवाय मोह, कम, मत्सर, दंभ इ. सर्व दुर्गुणांचीही कषायांमध्ये गणना करता येईल. हे दुर्गुण आत्म्याचा शुद्ध, शांत स्वभाव गढूळकरून टाकतात. त्यामुळे यांच्या आहारी गेलेली व्यक्ती कर्मबंधाची भागीदार होते. ज्यांची 'षड्‌रिपु' म्हणून गणनाकेली जाते तेच हे कषाय होत. त्यांचे दुष्परिणाम सांगणारे अक्षरशः असंख्य श्लोक गीतेत येतात.

''काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः'' (गी.३.३६) या श्लोकात कामक्रोधांना महान अग्नी, सर्वभक्षक, पापी शत्रू म्हटले आहे. दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोरता आणि अज्ञान यांना 'आसुरी संपत्ती' म्हटले आहे (गी१६.४). कामभावना इंद्रिये-मन-बुद्धी या सर्वांना व्यापून टाकते. जीवात्म्याला मोहित करते. ''कामी पुरुष कामनांच्या द्वारा बांधला जातो'' असा कर्मबंधविचार पाचव्या अध्यायात येतो.

कर्मबंधाचा पाचवा हेतू आहे 'योग'. म्हणजे मन-वचन-कायेची हालचाल. जैन शास्त्राने या योगांचे शुभ-अशुभ असे दोन प्रकार सांगून दोन्हीही अंतिमतः बंधकारक आहेत असे म्हटले आहे. गीतेचा अभिप्रायही सामान्यत असा दिसतो की रागद्वेषयुक्त होऊन केलेली शारीरिक, वाचिक, मानसिक कर्मे बंधक होतात.

कर्मबंधाचे 'साम्परायिक' आणि 'ईर्यापथिक' असेही दोन प्रकार जैन शास्त्रात येतात. कर्मबंधाच्या हेतूंचे सामान्य वर्णन गीतेत असले तरी तत्त्वार्थसूत्राच्या सहाव्या आणि आठव्या अध्यायात येणारी कर्मविषयक सूक्ष्म, समग्र आणि पद्धतशीर चिकित्सा हे जैन शास्त्राचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

**********

**जैन दृष्टिकोणातून भगवद्गीता**

## लेखांक ३८ : गीता कर्मपरक आहे आणि जैन धर्म ?

'श्रीमद्-भगवद्-गीता हा ग्रंथ कर्मप्रवणतेला प्राधान्य देणारा आहे'-हे नव्याने सांगण्याची गरज नाही. आरंभ आणि उपसंहार पाहिला असता तिची कर्मपरकता अतिशय सुस्पष्ट आहे.

'कर्मण्येवाधिकारस्ते', 'न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्', 'नियतं कुरु कर्म त्वं', 'तस्मादसक्त: सततं कार्यं कर्म समाचर', 'स्वे स्वे कर्मण्यभिरत: संसिद्धिं लभते नर:'-अशी प्रेरक वचने गीतेत सर्वत्र विखुरलेली आहेत. म्हणूनच लो.टिळक गीतेला 'कर्मयोगशास्त्र' म्हणतात. 'यज्ञ, वेद आणि वर्णाश्रमधर्माची भलावण'-या गोष्टी गीतेच्या कित्येक अभ्यासकांना रुचत नाहीत. गीतेतल्या लंब्याचौड्या विषयांतरांवरही अनेकांना आक्षेप आहे.

तरीही निरासक्तपणे काम करीत रहाण्याचा तिचा संदेश, 'लोकसंग्रहार्थ' कर्मे करावीत-यातून गीतेला असलेले सामाजिक भान आणि क्लिष्ट तत्त्वज्ञान व कर्मकांडातून 'भक्तियोगा'च्या रूपाने सर्वसामान्यांसाठी काढलेली वाट-यामुळे भगवद्-गीतेने जनमानसावर चांगलीच पकड बसवलेली आहे. संत ज्ञानेश्वरांसारख्या संन्याशालाही ती प्राकृतात आणावीशी वाटली. स्वामी विवेकानंदांनी जगभरातील तरुणाईला तिच्या आधारे बोध दिला.

या परिप्रेक्ष्यात जैन धर्म कसा दिसतो ? अनेक अभ्यासकांनी ठरवूनच टाकले की ब्राह्मण (वैदिक, हिंदू) परंपरा प्रवृत्तिगामी आहे आणि श्रमणपरंपरा निवृत्तिगामी आहे. संयम, दीक्षा, विरक्ती, त्याग, तप यांची वर्णने जैन साहित्यात आणि उपदेशात ठायी ठायी दिसून येतात. 'हे त्यागा', 'हे सोडा', 'ह्याला आवर घाला', 'हे परिमित करा' अशा पदावलीतून आम समाजापर्यंत जैन धर्माची निवृत्तीच पोहोचली.

वस्तुस्थिती ही आहे की जैन विचारधारेत साधुधर्म खडतर आहे. मोजक्या, पूर्ण विरक्तांसाठी साधुधर्माचे प्रावधान आहे. गृहस्थ अगर श्रावकवर्ग खूप मोठा असणे अपेक्षित आहे. भ.महावीरांनी 'उट्ठिए, णो पमायए'-उठा, प्रमाद (आळस) करू नका-असाच संदेश दिला आहे. श्रावकधर्माच्या पालनाच्या पायऱ्या अगर टप्पे लक्षात घेतले तर ती क्रमाक्रमाने निरासक्तीकडे केलेली वाटचाल आहे असेच दिसते. हळूहळू 'निष्काम' कसे व्हावे याचा तो वस्तुपाठ आहे. त्यागही 'यथाशक्ति', 'झेपेल तेवढाच' आहे.

जैन आचार्यांनी वेळोवेळी समकालीन प्राकृत भाषांमध्ये केलेली प्रचंड साहित्यनिर्मिती साधुवर्गाचीही कार्यप्रवणता दाखवते. निरासक्तीसाठी साधु-साध्वींना अखंड विहारप्रवृत्ती सांगितली आहे. गृहस्थावस्थेतही 'केवली' झालेल्या 'कूर्मापुत्रा'सारखा कर्मयोगी जैन धर्मातही आहे.

जैन श्रावकांच्या कार्यप्रवणतेची प्रतीके आहेत त्यांच्या दानधर्मातून उभी राहिलेली मंदिरे, शिल्पे, गुंफा, स्तंभ, मूर्ती, चित्रे आणि शिलालेख ! जैन धर्मीयांचे भारतीय कला आणि संस्कृतिसंवर्धनातील योगदान अभूतपूर्वच म्हणावे लागेल.

व्यापार, शेती, साहित्य आणि कलानिर्मिती यासाठी प्रचंड कार्यप्रवणता लागते ना ? ती त्यांनी जैन विचारधारेत राहूनच जोपासली ना ?

ऋषभदेवांचा वारसा जपणारा जिनानुयायी वर्ग प्रसंगी प्रवृत्तिपर आहे आणि प्रसंगी निवृत्तिपरही आहे.

प्रवृत्ति-निवृत्तीचा तोल सांभाळतच जैन परंपरा भ.महावीरांनंतर २६०० वर्षे आपले अस्तित्व समर्थपणे टिकवून आहे.

काळानुरूप दोष कुणात नसतात ? कोणतीच परंपरा त्याला अपवाद नाही.

**********

## लेखांक ३९ : यदा यदा हि धर्मस्य

पौराणिक हिंदू धर्मात दृढमूल झालेली अवतारवादाची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी गीतेच्या चौथ्या अध्यायातील ७ वा आणि ८ वा श्लोक नेहमीच उद्धृत केला जातो. दूरदर्शनवरील ‘महाभारत’ महामालिकेने शीर्षकगीत म्हणून निवडल्याने ते श्लोक लहानथोर सर्वांनाच मुखोद्गत झाले. कृष्ण स्वत:च अर्जुनाला सांगत आहे–‘‘हे भारता ! जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते आणि अधर्म बळावतो, तेव्हा तेव्हा मी आपल्या योगमायेने स्वत:ला प्रकट करतो. सज्जनांच्या परित्राणासाठी, दुष्टांच्या निर्दालनासाठी आणि धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी मी युगायुगात जन्म घेत असतो’’

जैन दृष्टीने याची मीमांसा करताना प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की अवतारांची तुलना तीर्थंकरांशी करता येत नाही. दोघांची जीवनोद्दिष्टे भिन्न भिन्न आहेत. तीर्थंकर धर्मतीर्थाच्या स्थापनेचे कार्य करीत असले तरी स्वत:च्या अत्युच्च आध्यात्मिक विकासाच्या शिखरावर अतुलनीय पुरुषार्थाने आरूढ झाल्यानंतर, उर्वरित आयुष्य ते धर्मोपदेशाने सार्थकी लावतात. दुष्टांचे निर्दालन प्रत्यक्ष युद्ध आदींच्या द्वारे ते कधीच करीत नाहीत. ‘एकच जीव (आत्मा) युगायुगात पुन:पुन्हा जन्म घेतो’, ही संकल्पना तीर्थंकरांच्या संदर्भात योग्य ठरत नाही. कारण तीर्थंकर मोक्षगामी जीव आहेत. त्यांचे पुनरागमन संभवत नाही.

शिवाय ‘‘धर्माची ग्लानी आणि अधर्माचा बुजबुजाट’’ अशा मोक्याच्या प्रसंगी हेतुपूर्वक जन्म घेणे हे तीर्थंकरांच्याही हातात नाही. त्यांनी तर जन्मोजन्मी कर्मक्षय करून तीर्थंकर–नाम–गोत्राचा बंध केला. त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीशी त्यांचा जन्म जोडलेला नाही. शिवाय प्रत्येक युगात (जैन दृष्टीने कालचक्राच्या प्रत्येक आऱ्यात) तीर्थंकर होत नाहीत. वर्तमान अवसर्पिणी काळाच्या तिसऱ्या आऱ्याच्या अखेरीस ऋषभदेव आणि चौथ्या आऱ्यात इतर २३ तीर्थंकर झाले. यापुढे वर्तमान अवसर्पिणीत तीर्थंकर होणार नाहीत. अवतार–वादाप्रमाणे कलियुगात कल्की अवतार जन्मणार आहे. त्यानंतर प्रलयकाळ येईल.

अवतारांमध्ये जलचर–उभयचर–स्थलचर असे मत्स्य–कूर्म–वराह या तिर्यंचांचीही गणना होते. अनेकांना त्यातून उत्क्रांतिवादाची चाहूल लागली आहे. जैन धारणेनुसार तिर्यंच कधीही त्या जन्मात तीर्थंकर असत नाहीत. अखेरचा मुद्दा म्हणजे कृष्णाने निर्दिष्ट केलेला ‘‘योगमायेने प्रकट होण्याचा’’ उल्लेख जैन शास्त्रास संमत नाही.

या सर्व चर्चेत अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असा की मुळात अवतार आणि तीर्थंकर यांची तुलना करायचीच कशासाठी ? हिंदूंनी ज्या कृष्णाला ‘अवतार’ मानले आहे तो जैन परंपरेनुसार ‘वासुदेव’ आहे. वासुदेव ९ आहेत आणि आता या अवसर्पिणीत त्यानंतर कोणी वासुदेवही होणार नाही. वासुदेव हे सज्जनपरित्राण, दुष्टनिर्दालन, धर्मसंस्थापना–ही कामे करू शकतात. प्रत्येक उत्सर्पिणी–अवसर्पिणीत वासुदेव होतच रहाणार आहेत. जैन शास्त्रानुसार प्रत्येक वेळी वेगवेगळे जीव ‘वासुदेव’ होणार आहेत.

जैन विचारसरणी हेच दर्शविते की जगतास तीर्थंकरांची गरज आहे आणि वासुदेवांचीही !

**********

## लेखांक ४० : गीतेत तपाचे स्थान

गीतेच्या ४,५,८,९,११ आणि १६ या अध्यायात तपाचा प्राय: यज्ञ, दान आणि वेद यांच्याबरोबर उल्लेख केलेला आहे. १७ व्या 'श्रद्धात्रयविभागयोग' नावाच्या अध्यायात तपाचा ६ स्वतंत्र श्लोकात विचार केलेला दिसतो.

'बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागता:' (गी.४.१०) या श्लोकात ज्ञान आणि तप यांचा स्वतंत्र उल्लेख नसून 'ज्ञानरूप तपाला' अथवा 'ज्ञानसहित तपाला' महत्त्व दिलेले आहे. गीतेत यज्ञसंकल्पना अग्रस्थानी असल्याने चौथ्या अध्यायातच यज्ञांच्या विविध प्रकारात 'तपोयज्ञा'चा निर्देश आहे. येथे गीतेला 'त्यागसहित तप' अपेक्षित आहे.

'अक्षरब्रह्मयोग' अध्यायाच्या अखेरच्या श्लोकात म्हटले आहे की,

वेदेषु यज्ञेषु तप: सु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् ।
अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ।। (गी.८.२८)

भावार्थ असा की वेद, यज्ञ, तप आणि दान याने पुण्यप्राप्ती होते. 'योगी' त्या पुण्यफलाचे बंधकत्व जाणून ते सर्व ओलांडतो. त्याहून परमस्थान जो मोक्ष-त्यासाठी प्रयत्नशील असतो.

९ व्या अध्यायात 'तप'सुद्धा परमेश्वराला अपर्ण करण्यास सांगितले आहे. भक्तिमार्गात जप आणि तप यांचे फार जवळचे नाते असते. 'विभूतियोग' अध्यायात त्या दृष्टीने 'यज्ञांमध्ये जपयज्ञ श्रेष्ठ', असेही विधान येते. 'विश्वरूपदर्शन' अध्यायात, ''हे विश्वरूपदर्शन वेद, तप, दान किंवा यज्ञाने होत नाही तर अनन्य भक्तीने होते''-असे विधान येते. 'यज्ञ, तप, दान ही धार्मिक कृत्ये 'ॐ तत् सत्'-अशा संकल्पाने करावीत, अश्रद्धेने केली तर कल्याणकर होत नाहीत'-असा विचार १७ व्या अध्यायात येतो. १८ व्या अध्यायात पुन्हा एकवार म्हटले आहे की, 'यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम्' (गी.१८.५).

परमश्रद्धेने, केलेले फलाशारहित तप 'सात्त्विक'; सत्कार-मान-पूजा प्राप्त व्हावी म्हणून दंभपूर्वक केलेले तप 'राजस'; मूढतेने स्वत:ला किंवा दुसऱ्याला पीडा, क्लेश देण्यासाठी केलेले तप 'तामस' होय-अशी वर्गवारी १७व्या अध्यायात दिसते.

देव, ब्राह्मण, गुरू आणि ज्ञानी यांचे पूजन, शौच (स्नान इ.), ऋजुता, ब्रह्मचर्य आणि अहिंसा यांना 'शारीरिक तप' म्हटले आहे. प्रिय, सत्य आणि हितकर बोलणे, स्वाध्याय आणि अभ्यास-यांना 'वाङ्मय तप' म्हटले आहे. मनाची सदैव प्रसन्नता, सौम्यता, मौन, संयम आणि भावसंशुद्धी-यांना 'मानस तप' म्हटले आहे.

वाचकहो, आत्तापर्यंतच्या लेखात आपण पाहिलेच आहे की वेदांची अपौरुषेयता आणि त्यांचे सर्वोपरि प्रामाण्य जैन परंपरेस मान्य नाही. सर्वच प्रकारच्या यज्ञांना आणि विशेषत: हिंसक यज्ञांना जैन आचार्यांनी वेळोवेळी विरोध केलेला दिसतो. गीतेत वेळोवेळी ज्या 'वेद, यज्ञ, तप आणि दान' या चार गोष्टींचा एकत्रित विचार केला आहे, त्यापैकी दोन तर जैन शास्त्रास संमत नाहीत.

'दान' आणि 'तप' या दोन गोष्टींना मात्र जैन धर्मात आणि आचारात अनन्यसाधारण महत्त्व आहे. गीतेने ज्यांना 'राजस' तप म्हटले आहे, तशा प्रकारचे वर्तन टाळण्याचे आदेश 'आचारांगसूत्रा'त दिसतात. त्याचा स्वतंत्र लेखात विचार करू. जैन ग्रंथात साधूंसाठी असे आदेश आहेत की त्यांनी अनेक प्रकारच्या शारीरिक-मानसिक अशा प्रतिकूल परिस्थिती (परिषह) समभावाने सहन कराव्यात. अशा पीडा समभावात सहन करण्याने होणारे 'तप'-पूर्वकर्मांची निर्जरा (क्षय) करण्यास कारण ठरते-असा जैन दृष्टिकोन आहे.

गीतेतील शारीरिक-वाचिक-मानसिक तपांपैकी बहुतांशी सर्वच तपांचा समावेश जैन आचारशास्त्रातील अंतरंग व बाह्य तपांमध्ये होतो.

सारांश काय ? गीतेत प्राय: ‘पुण्यप्राप्तीचे साधन’ हे तपाचे स्थान आहे. ‘जैन शास्त्रात यापेक्षा कोणता वेगळा विचार केला आहे’, ते उद्याच्या लेखात पाहू.

**********

## लेखांक ४१ : जैन आचारशास्त्रात तपाचे स्थान

'तप' ही जैन परंपरेची खास ओळख आहे. चातुर्मासात आणि विशेषत: पर्युषणपर्वात आजच्या ह्या आधुनिक युगातही जैन समाजात ''तप, उपधान, उपवास, दया, पौषध'' अशा विविध अंगांनी तपस्या केली जाते. तपस्येला येत चाललेल्या उत्सवी आणि अवडंबरात्मक स्वरूपावर जैन समाजातले विचारवंत वेळोवेळी प्रबोधनपर लेखही लिहिताना दिसतात. तपाचे माहात्म्य जैन परंपरेत इतके का आहे ?-कारण जैन आचारपद्धतीचा तो गाभा आहे. कर्मसिद्धांतात तपाचे विशेष स्थान आहे.

''सम्यक्त्व (श्रद्धा, दर्शन)-ज्ञान-चारित्र (आचरण)'' ही 'त्रिरत्ने' आहेत. भगवती आराधना आणि उत्तराध्ययनासारख्या प्राचीन ग्रंथांमध्ये त्रिरत्नाच्या बरोबरच चौथ्या 'तपा'चाही आवर्जून उल्लेख केलेला दिसतो. या चतुष्टयीचे महत्त्व सांगताना म्हटले आहे की,

नाणेण जाणई भावे, दंसणेण य सद्दहे ।
चरित्तेण निगिण्हाई, तवेण परिसुज्झई ।। (उत्त.२८.३५)

अर्थात्-ज्ञानाच्या सहाय्याने तत्त्वे जाणली जातात. दर्शनाने त्यावर श्रद्धा ठेवली जाते. चारित्राने अर्थात् संयमाचरणाने निग्रह केला जातो तर तपाने परिशुद्धी होते. गीतेनेही तपाला 'पावन करणारे' म्हटले आहे.

अशुभ प्रवृत्तींना रोखण्याचे काम तर तपाने होतेच, परंतु तपाचे वैशिष्ट्यपूर्ण काम म्हणजे पूर्वी बांधलेल्या कर्मांची निर्जरा (क्षय) करण्याचे सामर्थ्य तपामध्ये आहे. (तपसा निर्जरा च - तत्त्वार्थ.९.३). हाच आशय सोप्या प्राकृतात उत्तराध्ययनात व्यक्त झाला आहे. म्हटले आहे की, 'भवकोडीसंचियं कम्मं, तवसा निज्जरिज्जइ' (उत्त.३०.६). तपाचे मुख्य प्रकार, उपप्रकार आणि त्याचे फल सांगण्यासाठी उत्तराध्ययनात 'तपोमार्गगति' नावाचे स्वतंत्र अध्ययनच लिहिलेले आहे.

'तपाने केवळ पुण्यप्राप्तीच होते असे नव्हे तर सर्वश्रेष्ठ अशा निर्वाणपदाची प्राप्तीही तपाने होते'-असे विचार कुंदकुंदांच्या दर्शनपाहुडात व्यक्तविले आहेत.

बारसविहतवजुत्ता कम्मं खविऊण विहिबलेण स्सं ।
वोसट्टचत्तदेहा णिव्वाणमणुत्तरं पत्ता ।। (दर्शनपाहुड, गा.३६)

अर्धमागधी ग्रंथांमध्ये कडक तपश्चर्येची पुष्कळ उदाहरणे आढळतात. आचारांगाच्या 'उपधानश्रुता'त भ.महावीरांच्या १२ वर्षांच्या विहाराचे आणि तपाचे सविस्तर वर्णन दिसते. 'अंतगडसूत्रा'त स्त्रियांच्या आणि 'अनुत्तरौपपातिकसूत्रा'त पुरुषांच्या खडतर तपश्चर्यांचे उल्लेख आढळतात.

ऐहिक उन्नतीचा हेतू डोळ्यासमोर ठेवून केलेल्या तपाला 'निदानतप' म्हटले आहे. साधूंनी 'निदानतप' न करता 'आत्मकल्याणार्थ' तप करावे, असे आदेश दिसून येतात.

तपाची नेमकी व्याख्या करताना म्हटले आहे की, 'वासना-विकार क्षीण करण्यासाठी आणि आत्मिक शक्तीच्या साधनेसाठी शरीर, इंद्रिये व मन यांना ज्या ज्या उपायांनी तप्त केले जाते, ते तप होय.' अनशन, ऊनोदरी (भुकेपेक्षा कमी खाणे) इ. सहा तपे 'बाह्य तपे' असून त्यांचे स्वरूप आरोग्यसाधनेसाठीही अत्यंत उपयुक्त आहे. प्रायश्चित्त, विनय, सेवा, स्वाध्याय, अहंकारत्याग आणि ध्यान-ही सहा 'अंतरंग तपे' आहेत. जैन शास्त्रात विस्तारपूर्वक सांगितलेली १२ प्रकारची तपे खरोखरीच सर्वांना उत्तम मार्गदर्शक आहेत. आपल्याला झेपतील एवढीच तपे करण्याची सूचना अमृतचन्द्रांसारख्या आचार्यांनी दिली आहे.

विष्णूची किंवा शिवाची कडक उपासना-आराधना करणे, त्यांनी प्रकट होणे, भक्ताने वर मागणे, मागितलेल्या वराने सर्वांना संत्रस्त करणे-अशा प्रकारच्या तपस्येच्या हकिगती जैन पुराणग्रंथांत दिसत नाहीत. एकंदरीत, आत्मोन्नतीचे प्रभावी साधन म्हणून जैन परंपरेने तपाला अग्रस्थान दिलेले दिसते.

**********

## लेखांक ४२ : श्रद्धावान् लभते ज्ञानं

'कॅलिडोस्कोप' मध्ये तेच तेच रंगीत काचांचे तुकडे, कोन बदलल्यावर जसे वेगवेगळे दिसतात, तसेच गीतेचे तेच श्लोक आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर पुन्हा पुन्हा वाचले की वेगवेगळे भासू लागतात. अगदी लहानपणी गीता फक्त 'घडाघड पाठांतरा'चा विषय होती. शालेय संस्कृत पाठ्यपुस्तकात त्यातील काही 'वेचे' फक्त पोटापुरते–मार्क मिळवण्यापुरते अभ्यासले. बी.ए.च्या वर्षात गीतेतील विषयांनी, भाषेने भारावून गेले. एम्.ए.ला पौर्वात्य–पाश्चात्य अभ्यासकांनी गीतेतून काढलेल्या वेगवेगळ्या तात्पर्यांनी भांबावून गेले.

मध्यंतरीच्या काळात बरेच पाणी वाहून गेले. भांडारकर प्राच्य विद्या संस्थेतील प्राकृत–इंग्रजी शब्दकोशात काम करण्याच्या निमित्ताने जैन तत्त्वज्ञानाची ओळख झाली. वीस–पंचवीस वर्षात जैन शास्त्राची क्लिष्ट परिभाषा थोडी थोडी पचली. पुन्हा एकदा गीतेकडे नव्याच कोनातून बघायला लागले. पाने उलटता उलटता चौथा अध्याय सुरू झाला. ३३ व्या श्लोकात यज्ञाचा पुनर्विचार करून गीतेने 'ज्ञानयज्ञा'ला प्राधान्य दिलेले पाहून हायसे वाटले. त्या श्लोकापासून थेट चौथ्या अध्यायाच्या अखेरपर्यंत 'ज्ञानाचा महिमा' वर्णिलेला दिसला.

'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' इ. सुप्रसिद्ध गीतावाक्यांमध्ये जो ज्ञानाचा महिमा गायला आहे तोच शौरसेनी ग्रंथ 'भगवती आराधने'त किंवा अमृतचन्द्रांच्या 'पुरुषार्थसिद्ध्युपाय' मध्येही विस्ताराने वर्णिलेला दिसला. गीतेतल्या ४ थ्या अध्यायातला ३९ वा श्लोक पुढे आला आणि भास झाला की आपण तत्त्वार्थसूत्रातील पहिले सूत्र व त्यावरील व्याख्याच वाचत आहोत.

श्रद्धावान् लभते ज्ञानं, तत्पर: संयतेन्द्रिय: ।
ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ।।

अर्थात्, ''(साधनेमध्ये) तत्पर असलेल्या इंद्रियसंयमी श्रद्धावंताला जे ज्ञान मिळते, ते ज्ञान लाभल्यावर त्याला परमशांतीचा लाभ होण्यास उशीर लागत नाही.''

जैन शास्त्रानुसार, व्यवहारात सामान्यत: प्राप्त केलेले ज्ञान केवळ माहितीवजा शाब्दिक ज्ञान असते. त्याला 'सम्यक् ज्ञान' ही कोटी प्राप्त होत नाही. आत्मतत्त्वावर आणि जिनवाणीवर पूर्ण श्रद्धा ठेवल्याने त्या माहितीवजा ज्ञानालाही 'सम्यक्त्व' लाभते. 'श्रद्धावाँल्लभते ज्ञानं' म्हणजे श्रद्धावानालाच सर्वार्थाने सत्यज्ञानाचा बोध होतो आणि त्याच वेळी जर तो 'तत्पर' आणि 'संयतेन्द्रिय' असेल, म्हणजे जैन परिभाषेत 'सम्यक् चारित्राचा आराधक' असेल तर त्याची रत्नत्रयाची समन्वित आराधना सुरू होते. श्रद्धा, ज्ञान आणि संयम एकाच वेळी समसमानतेने वृद्धिंगत होत गेले की ''परम शांति'' अर्थात् निर्वाणाचा लाभ होतो.

'सम्यग्दर्शन–ज्ञान–चारित्राणि मोक्षमार्ग:' ह्या सूत्राचा भावार्थ हाच आहे–श्रद्धावान्, ज्ञानी आणि संयतेन्द्रिय असणे हे तत्त्वार्थसूत्रात आणि गीतेतल्या या श्लोकात एका व्यक्तीकडून आणि एकाच वेळी अपेक्षित आहे, क्रमाक्रमाने नाही. एरवी गीतेत मार्गांची विविधता सांगितली असली तरी खरा ज्ञानी, स्थितप्रज्ञ, कर्मयोगी आणि भक्त या सर्वांची अंतिम लक्षणे मात्र समान आहेत. त्याची गुरुकिल्ली या वैशिष्ट्यपूर्ण श्लोकात दडली आहे. याच कारणासाठी जैन शास्त्रकारांनी तीन घटकांचा यथायोग्य समावेश करून एकच मोक्षमार्ग सांगितला आहे.

सारांश काय तर प्रस्तुत श्लोकाचे जैन परिभाषेत रूपांतर केले की जैन दर्शनाचा मूलभूत गाभाच त्यात भासमान होऊ लागतो.

**********

## लेखांक ४३ : श्रद्धा–ज्ञान–आचरण परस्परसंबंध

गीतेत विविध प्रकारच्या 'योगांचे' अथवा 'मार्गांचे' एक–दुसऱ्यापेक्षा असलेले श्रेयस्करत्व आणि श्रेष्ठत्व प्रसंगाप्रसंगाने वेगवेगळ्या प्रकारे मांडलेले दिसते. उदाहरणार्थ, 'लोकेऽस्मिन् द्विविधा निष्ठा पुरा प्राक्ता मयानघ' (गी.३.३). या श्लोकात 'सांख्यांचा ज्ञानयोग' आणि 'योग्यांचा कर्मयोग' याचा उल्लेख केला आहे. गीतेच्या ६व्या अध्यायात 'योगी' अशी संज्ञा देऊन म्हटले आहे,

''तपस्वी, ज्ञानी किंवा कर्ममार्गी यापेक्षा 'योगी' श्रेष्ठ आहे. सर्व प्रकारच्या योग्यांमध्ये जो श्रद्धावान् भक्त माझ्याशी एकरूप होऊन मला भजतो, तो 'युक्ततम' होय'' (गी.६.४६–४७).

ध्यानयोगाच्या वर्णनाचा असा भक्तिपर उपसंहार काहीसा बुचकळ्यात टाकतो. आता बारावा अध्याय भक्तिपर आहे. परंतु त्याच्या बाराव्या श्लोकाचा अर्थ असा आहे– ''अभ्यासापेक्षा ज्ञान श्रेयस्कर आहे. ज्ञानापेक्षा ध्यान विशेष आहे. ध्यानापेक्षा कर्मफलत्याग श्रेयस्कर आहे. कारण त्याने लगेच परम शांती प्राप्त होते.''

'श्रेयस्कर' काय आणि 'त्याहून अधिक श्रेयस्कर' काय ?–याचा ऊहापोह करीत असता गीतेच्या वेगवेगळ्या व्याख्याकारांनी आपले मन्तव्य मांडण्यासाठी बऱ्याच कोलांटउड्या मारलेल्या दिसतात.

या पार्श्वभूमीवर ''श्रद्धा (सम्यक्त्वदर्शन)–ज्ञान–आचरण (चारित्र)'' यांच्या परस्परसंबंधांविषयी जैन शास्त्रकारांमध्ये बरीच (किंबहुना पूर्णच) एकरूपता दिसते.

ज्ञान, दर्शन, चारित्र आणि तप यांच्याविषयीचे उत्तराध्ययनातील विवेचन कालच्या लेखात पाहिले आहे. चारित्रपाहुडात कुंदकुंद म्हणतात, 'ज्ञानाने जाणले जाते. दर्शनाने प्रचीती घेता येते. ज्ञान आणि प्रचीती एकत्र आली की सम्यक् आचरण तेथे अवतरते.'

हेच तथ्य आचार्य शिवकोटींच्या शब्दात असे सांगता येते–''ज्ञान आणि दर्शन याचे सार यथाख्यात चारित्र आहे. अशा चारित्राचे पर्यवसान श्रेष्ठ निर्वाणात होते.''

दर्शनपाहुडात म्हटले आहे की, ''मोक्षमार्ग हा वृक्ष असेल तर सम्यक्त्व (श्रद्धा, दर्शन) त्याचे मूळ आहे. ज्ञान आणि चारित्र त्याचे खोड आणि शाखा–परिवार आहे.'' जैन परिभाषेत 'श्रद्धा' म्हणजे जिनकथित तत्त्वांवर पूर्ण विश्वास होय. जीव–अजीव–आस्रव–बंध–संवर–निर्जरा–मोक्ष या सात तत्त्वांचे स्वरूप प्रथम नीट समजून घेणे आणि त्यावरचा दृढ विश्वास म्हणजे सम्यक्त्व. आचरणात थोडीफार चूक झाली तर ती प्रायश्चित्तपूर्वक सुधारता येईल परंतु श्रद्धा डगमगली तर आत्मकल्याणाच्या मार्गाला कायमचे पारखे व्हावे लागेल.

सम्यक्त्व (खरी श्रद्धा) प्राप्त झाले की ज्ञानही तत्काळ सम्यक् बनते. 'दिवा पेटणे' आणि 'अंधार दूर होणे'– या दोन्ही गोष्टी एकदम होत असल्या तरी पहिले दुसऱ्याचे कारण आहे (पुरुषार्थ.श्लोक३४).

सारांश काय, तीन घटकांनी बनलाअसला तरी 'मोक्षमार्ग कसा एकच आहे', हे पटवून देण्याची जैन शास्त्रकारांची हतोटी विलक्षण आहे.

**********

## लेखांक ४४ : दैवी संपदा आणि दशविध धर्म

भगवद्गीता असो अथवा जैन शास्त्र, आध्यात्मिक आणि धार्मिक मार्गदर्शनाबरोबरच नैतिक गुणांचा परिपोष करणारी मूल्ये दोन्हीतही प्रतिपादन केलेली दिसतात.

विशेष व्यक्तींची गुणगणना करून लक्षणे देण्याची गीतेची आपली अशी खास शैली आहे. दुसऱ्या अध्यायात अर्जुन विचारतो, 'स्थितप्रज्ञस्य का भाषा ?' इत्यादि. कृष्ण त्याचे सविस्तर उत्तर देतो. स्थितप्रज्ञाची लक्षणे देत असतानाच इंद्रियमूढ, चंचल आणि असंयमी व्यक्तींचेही वर्णन करतो. नवव्या अध्यायात महात्म्यांच्या दैवी गुणांबरोबर राक्षसी आणि आसुरी प्रकृतीच्या व्यक्तींचाही कृष्ण आवर्जून उल्लेख करतो. तेराव्या अध्यायात ज्ञानाची वीस लक्षणे विस्ताराने सांगितली आहेत. सोळाव्या अध्यायात ही गुणगणना दैवी संपत्तीच्या रूपाने आली आहे. तेथे एकूण २६ गुण सांगितले आहेत. जिज्ञासूंनी ते गुण मूळ गीतेतून पहावेत. या यादीतील प्रत्येक गुणाचा अर्थ दुसऱ्याहून सर्वस्वी भिन्न होईलच असे नाही. दैवी संपत्तीच्या सात्त्विक स्वरूपाची नीट ओळख करून देण्यासाठी गीतेच्या या सोळाव्या अध्यायातील २६ गुण उपयुक्त ठरतात.

जैन शास्त्रात नैतिक सद्गुणांच्या परिपोषासाठी, चिंतन करावे म्हणून सर्व व्यक्तींना बारा मुद्दे देण्याची पद्धत आहे. या मुद्यांना 'अनुप्रेक्षा' (भावना) असे म्हणतात. अनुप्रेक्षा या बारा आहेत. कुंदकुंदाचार्यांनी लिहिलेला 'द्वादशानुप्रेक्षा' हा लघुग्रंथ अतिशय लोकप्रिय आहे. त्यातील अकराव्या अनुप्रेक्षेचे नाव 'धर्मानुप्रेक्षा' आहे. धर्माचे प्रथम दोन भाग केले आहेत–श्रावकधर्म व साधुधर्म. श्रावकधर्मामध्ये अकरा प्रतिमा सांगितल्या आहेत. अनगारधर्मामध्ये मात्र व्रत, समिति, गुप्ति असा धर्म न सांगता दहा उत्तम सद्गुण सांगितले आहेत.

कुंदकुंदांनी गुणांची फक्त यादी न देता त्यांची लक्षणे अतिशय मोजक्या शब्दात प्रभावीपणे सांगितली आहेत. शिवाय विशिष्ट प्रकारच्या नैतिक वर्तनाने हे सर्व धर्म साधूच्या अंत:करणात आपोआप प्रकट होतात असेही म्हटले आहे. याचाच अर्थ असा की या धर्मांच्या आराधनेसाठी कोणतेही क्रियाकांड करण्याची गरज नाही.

१) क्रोधाच्या उत्पत्तीचे साक्षात् कारण समोर उपस्थित असूनही, जो क्रोधावर ताबा ठेवण्याचा प्रयत्न करतो, त्याच्यामध्ये हळूहळू 'उत्तम क्षमाधर्म' प्रकट होतो.

२) जो आपले कुल, रूप, ज्ञान इ. चा अभिमान करणे कमी करत जातो, त्याच्यामध्ये हळूहळू 'उत्तम मार्दवधर्म' प्रकट होतो.

३) जो मन–वचन–कायेची कुटिलता सोडून, हृदय निर्मल ठेवण्याचा प्रयास करतो, त्याच्यामध्ये 'उत्तम आर्जवधर्म' प्रकट होतो.

४) जो अन्य जीवांना संत्रस्त न करणारे, हितकर, सत्यवचन बोलतो, त्याच्यामध्ये 'उत्तम सत्यधर्म' प्रकट होतो.

५) सर्व बाह्य परिग्रहाच्या आसक्तीतून निवृत्त होत–होत, जो शुद्ध वीतरागभाव धारण करतो, त्याच्यामध्ये 'उत्तम शौचधर्म' प्रकट होतो.

६) पाच महाव्रतांचे पालन आणि इंद्रियविजय करणाच्या दृष्टीने जो अग्रेसर असतो, त्याच्यामध्ये 'उत्तम संयमधर्म' प्रकट होतो.

७) विकार–वासनांवर विजय मिळवून जो ध्यान–स्वाध्यायात रममाण असतो, त्याचे 'उत्तम तप' निरंतर चालू असते.

८) मन–वचन–कायेने जो मोह आणि ममत्वाचा त्याग करतो, त्याच्यामध्ये 'उत्तम त्यागधर्म' प्रकट होतो.

९) नि:संग होऊन, आपल्याला सुखदु:खे देणाऱ्या आपल्याच भावनांवर जो काबू ठेवतो, त्याच्यामध्ये 'उत्तम आकिंचन्यधर्म' प्रकट होतो. 'न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।' (गी.३.२२) या गीतेतील कृष्णवचनातही, हाच आकिंचन्यभाव प्रकट झाला आहे.

१०) स्त्रियांसबंधीच्या सर्व प्रकारच्या विषय–वासनात्मक दुर्भावांचा जो त्याग करतो, तो दुर्धर 'ब्रह्मचर्या'चा धारक असतो.

कुंदकुंदांनी सांगितलेले हे दशविध धर्म म्हणजे क्रमाक्रमाने मांडलेली उच्च नैतिक आणि आध्यात्मिक मूल्येच आहेत. त्यांच्या नेमक्या व्याख्या देण्याचा प्रयत्नही लक्षणीय आहे. गीतेतील 'दैवीसंपत्' म्हणून सांगितलेल्या २६ सद्गुणांचा समावेश या दहा धर्मात सहजपणे करतो येतो. याशिवाय दोहोंमधल्या अनेक गुणांची नावे शब्दश: समानही आहेत.

**********

## लेखांक ४५ : आचारांग, उपनिषदे आणि गीता (१)

वाचकहो, आत्तापर्यंतच्या लेखात आपण प्राय: गीतेला अग्रस्थान दिले आणि जैन दृष्टीने त्याची समीक्षा करण्याचा प्रयत्न केला. श्वेतांबर जैनांच्या अर्धमागधी धार्मिक ग्रंथांत (आगम-ग्रंथात) 'आचारांग' ग्रंथाचे स्थान अग्रगण्य आहे. आचारांगाचा प्रथम खंड (प्रथम श्रुतस्कंध) 'प्राचीन अर्धमागधीचा नमुना' म्हणून अभ्यासकांनी गौरविला आहे. आचारांगाची गूढ, सूत्रमय वाक्यांनी बनलेली गद्यपद्यमय शैली अभ्यासली की उपनिषदांचे स्मरण झाल्याशिवाय रहात नाही. दहा प्राचीन उपनिषदांचा प्राय: सर्वमान्य काळ इ.स.पू. ६०० असा आहे. भ. महावीरांच्या सर्व कार्यप्रवृत्तीही इ.स.पू. सहाव्या शतकातच झाल्या. विषय कोणताही असला तरी प्रतिपादनाच्या शैलीवर त्या त्या काळातल्या शैलीचा प्रभाव हा राहतोच. अशा प्रकारे भाषाशैलीच्या दृष्टीने उपनिषदे आणि आचारांग ह्यात विलक्षण साम्य आहे.

गीता हे उपनिषदांचे सार आहे. गीतेची शैली मात्र वर्णनात्मक, काव्यात्मक आहे. तत्त्वज्ञान समजावताना गीतेत उपमा, दृष्टांत येतात. रचना छंदोबद्ध आहे. ईश्वर, परमेश्वर किंवा परमात्म्याच्या भूमिकेत जाऊन, कृष्ण प्रथमपुरुषी एकवचनात, अनेक विधाने उद्‌गारतो. भक्तीचे चढलेले रंग हे प्राचीन उपनिषदांपेक्षा गीतेचे वेगळेपण आहे. मात्र हे वगळता, उपनिषदांतून आणि विशेषत: कठोपनिषदातून गीता वारंवार उद्धरणे देत असते. आचारांग, उपनिषदे आणि गीता यांचा परस्परसंबंध लक्षात घेऊन ह्या आणि यापुढील लेखात साम्यभेदात्मक निरीक्षणे नोंदवण्याचा प्रयत्न केला आहे.

'कोऽहं'-मी कोण आहे ?-अशी आत्मजिज्ञासा उपनिषदांचा मुख्य विषय आहे. केनोपनिषदात 'केनेषितं पतति प्रेषितं मन:'-अशा शब्दात मन:प्रवृत्तींमागच्या कारणाचा शोध घेतला आहे. आचारांगाच्या पहिल्या अध्ययनाचा प्रारंभही 'अप्पणो अत्थित्त-पदं' अर्थात् स्वत:च्या अस्तित्वाच्या जिज्ञासेने होतो. 'के अहं आसी ? के वा इओचुओ इह पेच्चा भविस्सामि'-अशा शब्दात आचारांगात पूर्वजन्म आणि पुनर्जन्माची जिज्ञासा व्यक्त झाली आहे.

गीतेचा आरंभ रणांगणावर, शस्त्रे सज्ज झालेल्या अवस्थेत होतो. आचारांगाच्या पहिल्या अध्यायाचे नाव 'शस्त्र-परिज्ञा' असे आहे. 'आपल्या आजूबाजूच्या पृथ्वी, हवा, पाणी, अग्नी व वनस्पतींना आपले वर्तन कसे शस्त्रासारखे वाटते व त्यांचा वापर करताना कसा विवेक करणे जरूर आहे'-असा वेगळाच शस्त्रविचार आचारांग देते. गीतेत 'न कांक्षे विजयं कृष्ण' इ. वचने अर्जुन म्हणतो तर आचारांगात 'लोकविजय' कसा करावा-याचे आध्यात्मिक वर्णन येते. अहिंसा, समता, अनासक्ती, अपरिग्रह इ. 'लोकविजया'ची साधने आहेत असे भ.महावीर म्हणतात.

'एषणा' शब्दाला उपनिषदात आणि आचारांगात विशेष स्थान आहे. 'णो लोगस्स एसणं चरे' असा आचारांगाचा आदेश आहे. विरक्त मुनीला लोकैषणा (लोकसंग्रह, जनसंमर्द, प्रसिद्धी) काय कामाची ? बृहदारण्यक उपनिषदात 'खऱ्या ब्राह्मणाचे' लक्षण सांगताना म्हटले आहे की- 'ब्राह्मण: पुत्रैषणायाश्च वित्तैषणायाश्च लोकैषणायाश्च व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति ।'

सामान्य संसारी माणूस अशा एषणांनी (भौतिक आकांक्षांनी) ग्रस्त होऊन आपला गोतावळा कसा वाढवत जातो त्याचे प्रत्ययकारी, सर्व काळात लागू पडणारे वर्णन भ.महावीर करतात. त्याचा स्वैर अनुवाद असा आहे- ''प्रथम माणूस शारीरिक बळ वाढवतो. उद्योग करून पैसा कमावतो. नातेवाईक जमवून मौजमजा करतो. पितरांचे श्राद्ध इ. करतो. देव-देव करू लागतो. हळूहळू सत्ताधीशांशी संबंध जोडतो. चोर-तस्करांशीही संधान बांधतो. पाहुणे आणि तोंडपुजे याचक यांची सरबराई करतो. अखेरीस हे कमी पडते म्हणून की काय साधू-महाराजांशी संपर्क ठेवून आशीर्वादही घेत रहातो.''

उपनिषदांनी पुत्रैषणा, वित्तैषणा, लोकैषणाचा जो उल्लेख केला त्याचे किती प्रत्ययकारी आणि आत्ताही लागू पडेल असे वर्णन भ.महावीरांनी केले आहे ते पहा !

हाच विषय उद्याच्या लेखात पुढे पाहू.

**********

## लेखांक ४६ : आचारांग, उपनिषदे आणि गीता (२)

आचारांगाच्या तिसऱ्या अध्यायाचे नाव आहे 'शीतोष्णीय'. शीत, उष्ण, सुख, दु:ख-सर्व काही 'तितिक्षा' भावाने कसे सहन करावे ते साधु-आचारात २२ परिषहांच्या रूपाने वारंवार सांगितले जाते. गीतेतही अनासक्त, स्थितप्रज्ञाच्या वर्णनात 'शीतोष्णसुखदु:खेषु' अशी पदावली वारंवार येते. आचारांगाच्या याच अध्यायात 'सुत्ता अमुणी सया, मुणिणो सया जागरंति' असे उद्‌गार भ.महावीर काढतात. गीतेच्या दुसऱ्या अध्यायात जणू काही याच संकल्पनेचा विस्तार ६९ व्या श्लोकात केला आहे.

या निशा सर्वभूतानां तस्या जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुने: ।।

आशय असा की सामान्य लोक ज्या विषयांबाबत उत्सुक, जागृत असतात त्या बाबतीत ज्ञानी मुनी 'सुप्त' असतात. ज्या आत्मज्ञानाची मुनींना 'जाण' असते त्या बाबतीत सामान्य माणूस गाढ झोपलेला असतो.

गीतेच्या १५ व्या अध्यायात अश्वत्थवृक्षाचे समग्र रूपक आले आहे. हे रूपक गीतेने कठोपनिषदातून घेतले आहे. 'अग्गं च मूलं च विगिंच धीरे' या वचनातून भ.महावीर हेच सांगतात की आसक्तीरूप मुळाचा शोध घेऊन ती दूर करावी. धीरपुरुषाने विवेकाने वागावे. गीतेच्या जशी २ ऱ्या अध्यायात ''विषयचिंतन-आसक्ती-काम-क्रोध-संमोह-स्मृतिविभ्रम-बुद्धिनाश-सर्वविनाश'' इ. अनर्थशृंखला वर्णिली आहे तशीच क्रोध-मान-माया-लोभ-प्रेय-द्वेष-मोह-गर्भ-जन्म-मृत्यू इ.ची शृंखला आचारांगात परिणामकारकपणे सांगितली आहे.

'जे एगं जाणइ, से सव्वं जाणइ । जे सव्वं जाणइ से एगं जाणइ ।'

अशी गूढ सूत्रात्मक वर्तुळाकार वाक्यरचना आचारांगाचे वैशिष्ट्य आहे. 'एकेन ज्ञातेन सर्वं विज्ञातं भवति'-एक जाणल्याने सर्व जाणता येते-हे उपनिषदातील वचन सुप्रसिद्धच आहे. 'जे पिंडी ते ब्रह्मांडी'-हे वचनही सामान्यत: असाच बोध देते.

'जस्स नत्थि पुरा पच्छा, मज्झे तस्स कओ सिया ?' या आचारांगातील विधानाचा अर्थ असा की ज्याच्या पूर्वजन्मांचा आणि पुनर्जन्मांचा थांग लागत नाही अशा जीवाने आत्ताच्या या फक्त मधल्या मनुष्यजन्मात किती म्हणून रागद्वेष करावे ? कशाकशाचा म्हणून खेद करीत बसावे ? असाच उपदेश श्रीकृष्ण अर्जुनाला करतो.

'अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।
अव्यक्तनिधानान्येव तत्र का परिदेवता ?' (गी.२.२८)

'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्यवरान् निबोधत'-उठा, जागे व्हा, कल्याणाचा बोध घ्या-असा ऊर्जस्वल संदेश उपनिषदे देतात. आचारांगात भ.महावीर सांगतात-'उट्ठिए णो पमायए'-उत्थित व्हा, प्रमाद-आळस करू नका.

आचारांगाच्या 'परमात्म-पदा'ने ह्या विषयाचा शेवट करू. 'सव्वे सरा नियट्टंति । तक्का जत्थ न विज्जइ' असे आत्मानुभूतीचे वर्णन भ.महावीर करतात. तैत्तिरीय उपनिषदातही 'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह' अशा भाषेत आत्मसाक्षात्काराचा अनुभव सांगितला आहे. 'स्वर' (सर) ही वाचेची क्रिया आहे आणि तर्क (तक्का) ही मनाची. उपनिषदे आणि आचारांग 'न तस्य प्रतिमा अस्ति' आणि 'उवमा (उपमा) ण विज्जए' अशी अतिशय समान भाषा वापरतात.

आचारांगातील विचार भ.महावीरांच्या आध्यात्मिक अनुभूतींचे उद्‌गार आहेत. त्यांची भाषाशैली उपनिषदांशी विलक्षण जुळणारी आहे. अभ्यासक काहीही म्हणोत, आत्ता आपल्यासमोर असलेल्या गीतेच्या कितीतरी पूर्वीच्या काळी भ.महावीरांनी हे विचार व्यक्त केले आहेत. इतकेच नव्हे तर अशा कितीतरी ऋषींचे विचारधन जैन परंपरेने 'ऋषिभाषित' ग्रंथात जपले आहे. अजून एक वैशिष्ट्य असे की उपनिषदे संस्कृतात आहेत तर भ.महावीरांचे विचार

त्या काळी प्रचलित असलेल्या ‘अर्धमागधी’ नावाच्या लोकभाषेत (प्राकृतात) नोंदवलेले आहेत. त्या काळच्या लोकभाषेची थोडी झलक दिसावी म्हणून ह्या दोन लेखांचा हा प्रपंच !!

**********

**जैन दृष्टिकोणातून भगवद्‌गीता**

## लेखांक ४७ : भक्ती : गीतेतील आणि जैन परंपरेतील (१)

वाचकहो ! मागील लेखात आपण पाहिलेच आहे की ‘सम्यक्त्व’ अथवा ‘सम्यक्‌दर्शन’ हे शब्द जैन परंपरेत निस्सीम श्रद्धा या अर्थाने वापरण्यात येतात. ‘भक्ती’ हा शब्द मात्र सिद्धांतग्रंथांत टाळलेला दिसतो. आराधना आणि उपासना असे शब्द जैन आणि हिंदू दोहोंमध्ये समान असले तरी ‘आराध्य देवतेला प्रसन्न करणे’, असे जैन ग्रंथातील भक्तीचे स्वरूप नाही. भक्ती म्हणजे ‘श्रद्धा’ हे खरे पण ती कशावर ? याबाबत मतभेद आहेत. प्राय: भक्तिमार्गी हे ईश्वरावर अथवा इष्टदेवतेवर श्रद्धा ठेवतात. जैनधर्मानुसार मात्र ती नवतत्त्वांवर, जिनवाणीवर आणि केवलिप्रज्ञप्तधर्मावर ठेवण्यास सांगितले आहे. जनन्निर्मात्या ईश्वरावर श्रद्धा नसल्याने जैनांची गणना ‘नास्तिक’ अथवा ‘पाखंडी’ अशीही केली गेली. कर्मसिद्धांत, पुनर्जन्म व मोक्ष हे सर्व समान असूनही जैन ‘नास्तिक’ ठरले.

जे जे आदर्श आणि प्रेरणादायी आहे त्याची उपासना हा मानवाचा स्वाभाविक गुण आहे. जैन मान्यतेनुसार तीर्थंकर, सिद्ध, श्रुत, चारित्र, योगी इ.ची भक्ती केली जाते. झाडांची पूजा आणि प्राणिपूजा यांनाही जैन परंपरेत स्थान नाही. तीर्थंकर इ.ची भक्ती करण्याचे कारण की आपल्याला त्यांच्यासारखे बनायचे आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून चालायचे आहे. पण त्या भक्ताला माहीत आहे की त्यांना खुश केले तरी ते आपल्याला प्रत्यक्षत: ऐहिक किंवा पारलौकिक फळ मिळवून देणार नाहीत. तीर्थंकरांनी स्वप्नात येऊन दृष्टांत देणे, ऐहिक लाभ करून देणे–अशाकथाही जैन परंपरेत प्रचलित नाहीत.

भक्तिमार्गाचे मुख्य तत्त्व हे आहे की सर्व चराचर सृष्टीत परमेश्वर पुरेपुर भरलेला आहे. सर्वकाही त्याच्याच मार्गदर्शनाखाली चाललेले आहे. भागवत धर्माचा मूलमंत्रच आहे की, ‘वासुदेव: सर्वम्‌’. अशी धारणा जैनांमध्ये नाही. परमेश्वराने सगुण रूपात अवतरून भक्तांना मदत करू लागण्यासंबंधीच्या हकिगती जैन धार्मिक कथांमध्ये आढळत नाहीत.

अर्थात्‌ स्वर्गलोकातल्या देव–देवतांचे अस्तित्व जैनधर्माने नाकारलेले नाही. उपासनेने त्यांना प्रसन्नही करता येते. परंतु फळ देताना मात्र ती देवता भक्ताच्या कर्माला अनुसरूनच फळ देते. त्यापेक्षा जास्त देऊ शकत नाही. काही प्रतिकात्मक कथांमध्ये असेही रंगविले आहे की भक्ताने हट्ट करून जास्त फळ मागितले तर ते त्याला लाभत नाही. येथे स्पष्ट दिसते की भक्तीपेक्षा कर्मसिद्धांत हा अधिक प्रबळ आहे.

कर्मानुसार फळ मिळणारच असेल तर ते देवदेवतांच्या मध्यस्थीशिवायसुद्धा मिळू शकेल. म्हणजे सैद्धांतिक दृष्ट्या ‘फलदायी’ उपासनेला फारसा अर्थ उरत नाही.

गीतेतला भक्तिमार्गदर्शक श्लोक म्हणून पुढील श्लोक वारंवार उद्‌धृत केला जातो, ‘पत्रं पुष्पं फलं तोयं ये मे भक्त्या प्रयच्छति ।’. याची जैन दृष्टीने मीमांसा करता असे दिसते की पत्र, पुष्प, फल हे ‘वनस्पतिकायिक जीव’ आहेत. ‘तोय’ अर्थात्‌ ‘पाणी’ हेही ‘अप्कायिक जीव’ आहेत. पूजा करतानासुद्धा विनाकारण हे तोडणे, सिद्धांतदृष्ट्या कल्पत नाही. तसेच तीर्थंकर इ.ची भक्ती फक्त गुणरूपाने आहे. तो एकमार्गी रस्ता आहे. ‘तेषामहं समुद्धर्ता’ अथवा ‘अहम्‌ त्वाम्‌ सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि’ असे उद्‌गार तीर्थंकर इ. कडून निघणार नाहीत.

सैद्धांतिकदृष्ट्या जैन परंपरेतील भक्तीचे स्वरूप हिंदूंच्या भक्तिमार्गापेक्षा वेगळे असले तरी प्रत्यक्ष व्यावहारिक आचरणात मात्र जैनांनी हिंदूंच्या पूजापद्धती इ.चे अनुकरण केलेले दिसते. त्याविषयी पुढील लेखात विचार करू.

**********

**जैन दृष्टिकोणातून भगवद्गीता**

## लेखांक ४८ : भक्ती : गीतेतील आणि जैन परंपरेतील (२)

मोठा अडचणीत आणणारा प्रश्न आहे की ज्या धर्मात ईश्वराला स्थान नाही त्या धर्मात मंदिरे, पूजा, प्रतिष्ठा, भजन, पूजन, जप, आरती, नैवेद्य, स्तोत्र, अभिषेक इ.ना स्थान कसे असू शकते ? या सर्वांचे प्रचलन प्राय: सर्वच जैनांमध्ये दिसते. गीतेच्या दृष्टीने विचार करता यक्ष-यक्षिणी, ग्रामदेवता, क्षेत्रपाल, शासनदेवता इ.च्या भक्तीला 'काम्यभक्ती' म्हणता येईल आणि तीर्थंकर इ.च्या भक्तीला 'निष्कामभक्ती' म्हणता येईल. सामान्य संसारी जीवांनी कामना ठेवून केलेली भक्ती स्वाभाविकच मानली पाहिजे.

१६ व्या शतकाच्या आसपासच्या पूजा, प्रतिष्ठा, मंदिरे, मठ इ.चे प्राबल्य वाढल्यामुळे जैनांमध्ये 'स्थानकवासी पंथा'चा उदय झाला. लक्षणीय गोष्ट अशी की कर्मकांडाचे आणि जातिपातीचे प्रस्थ वाढल्यामुळे हिंदुधर्मातही 'एकेश्वरी शीखसंप्रदाया'चा उगम याच सुमारास झाला.

पवित्र तीर्थक्षेत्रांच्या यात्रा हिंदू व जैन दोन्ही परंपरेत दीर्घकाळापासून चालू आहेत. हनुमानजयंती, रामनवमी यांसारखे तीर्थंकरांच्या पंचकल्याणकांचे उत्सवही जैन वातावरणात दिसतात. चातुर्मासाचा काळ हिंदू व जैन दोघेही साजरा करतात. परंतु जैनधर्मात दान, तप व उपवासाला प्राधान्य असते तर हिंदूंचे चातुर्मास उत्सव, सणवार व व्रतस्वरूप असतात.

पुराणांमधील व्रत-वैकल्यप्रधान धर्माचा हळूहळू जैनधर्मावरही प्रभाव पडलेला दिसतो. परिणामी ज्ञानपंचमी, शिळासप्तमी, सुगंधदशमी, मौनएकादशी अशी व्रते जैन पद्धतीने साजरी केली जाऊ लागली. १४ व्या शतकात होऊन गेलेल्या जिनप्रभसूरींचा 'विधिमार्गप्रपा' नावाचा व्रतप्रधान ग्रंथ आहे. जैन परंपरेत व्रतप्रधान धर्माचा आरंभ या काळापासूनच दिसतो.

व्रतांइतकेच महत्त्व जैन परंपरेत स्तोत्रांनाही दिसते. कुंदकुंदांच्या दशभक्तीपासून आत्तापर्यंतच्या काळात प्राकृत, संस्कृत, अपभ्रंश आणि आधुनिक भारतीय भाषांमध्येही जैनांनी विपुल स्तोत्ररचना केली. 'जैन स्तोत्रसंदोह' या नावाचे दोन जाडजूड ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. 'सप्तस्मरणस्तव' या नावाचा एक प्राचीन स्तोत्र संग्रहही उपलब्ध आहे. या स्तोत्रांमध्ये भ.पार्श्वनाथांच्या स्तुतीपर स्तोत्रांची संख्या अधिक आहे. 'भक्तामर' आणि 'कल्याणमंदिर' ही काव्यमय कल्पनांनी भरलेली, सुंदर संस्कृत स्तोत्रे, मुखोद्गत करण्याचा जैनांचा प्रघात आहे. भक्तामर स्तोत्राचे एक वैशिष्ट्य असे की त्यात आदिनाथांची स्तुती करताना 'ब्रह्मदेव, शंकर, बुद्ध, पुरुषोत्तम' ही नावे विशेषणांसारखी वापरली आहेत.

कित्येक काळापासून जैन समाज भारतात आणि भारताबाहेर विखुरलेल्या स्वरूपात आहे. त्या त्या प्रदेशातील भाषा, चालीरीती यांच्याशी तो एकरूप होतो. अर्थातच प्रादेशिक समजले जाणारे सण, वार, उत्सव, व्रते यांचा प्रभाव त्यांच्यावर पडल्याशिवाय रहात नाही. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर चतुर्थी, एकादशी, महाशिवरात्र असे उपवास तसेच नवरात्र, गणपतीपूजन इ. उत्सव जैनही करताना दिसतात.

बहुसंख्येने असलेल्या हिंदुधर्मीयांच्या सतत संपर्कात रहात असल्यामुळे भक्तिप्रधानधर्माचा पगडा जैनांवर पडणे साहजिकच आहे. हिंदूंशी कितीही एकरूप झाले तरी आहारशुद्धी, उपवास, तप आणि दान या चारांच्या आधोर जैन समाज आपली स्वतंत्र ओळखही टिकवून आहे. वर म्हटल्याप्रमाणे देवी-देवतांची तो काम्यभक्ती करेल परंतु वीतरागी तीर्थंकरांसमोर उभे राहून, 'पुत्रपौत्रधनधान्यसमृद्ध्यर्थम् पूजनमहम् करिष्ये' असे कदापिही म्हणणार नाही हेच त्यांचे वेगळेपण होय.

**********

## लेखांक ४९ : उपसंहार

धर्मनिरपेक्षता अथवा सर्वधर्मसमभाव हे भारताचे राष्ट्रीय धोरण आहे. भारताच्या प्रतिज्ञेत आपण नेहमीच म्हणत असतो की, 'भारतातल्या विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्यांचा पाईक होण्याचा मी प्रयत्न करीन'. आदर्श म्हणून हे विचार कितीही स्पृहणीय वाटले तरी, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या ६३ वर्षात जागतिकीकरणाचे वारे वाहत असतानाही आपण दुसऱ्या एका बाजूने जात, पात, धर्म, वंश व संप्रदाय यांनाही अनेक कारणांनी खतपाणी घालत आहोत. त्याच वेळी आचार-विचाराच्या अभेद्य भिंतींना झरोके तयार करण्याचे विधायक कामही काही विचारवंत करत आहेत. गीता आणि जैन तत्त्वज्ञान यातील विचारांची सांगड घालताना समन्वयवादाचा छोटासा झरोका निर्माण करून त्यातून काहीतरी विचारशलाकांचे आदान-प्रदान व्हावे, असा या लेखमालेचा हेतू होता.

परिणामी काही वेळा जैन विचारांच्या बाजूने कौल दिला गेला तर काही वेळा गीतेच्या व्यवहारोपयोगी तत्त्वज्ञानाची मांडणी केली गेली. दोन्हीतले जे चांगले आहे, त्याची दखल घेण्याचा हा प्रयास होता.

प्राचीनता, सूक्ष्मता, चिकित्सा, प्रत्येक जीवाची स्वतंत्रता, प्रत्येक माणसाच्या ठिकाणी असलेले नैतिक आणि आध्यात्मिक विकासाचे अनंत सामर्थ्य, आत्मिक स्वावलंबन आणि आत्मनिर्भरता, कर्मसिद्धांतावर दृढ विश्वास आणि निरीश्वरवाद, नयांच्या मांडणीत दिसणारी लवचिक समन्वयवादी दृष्टी, पंचमहाभूतांना चैतन्यमय मानून पर्यावरणरक्षणाची दिलेली तात्त्विक बैठक, आचरणात दान-तप-आहारशुद्धीला दिलेले महत्त्व---ही आणि अशी अनेक वैशिष्ट्ये जैन परंपरेबाबत नोंदविता येतील.

गीतेत प्रतिबिंबित झालेल्या विचारांच्या आधारे हिंदू (वैदिक अथवा ब्राह्मण) परंपरेचीही आपली अशी खास वैशिष्ट्ये आहेत. बोलक्या प्रश्नोत्तरातून मांडलेले जीवनलक्षी तत्त्वज्ञान, लोकसंग्रहाच्या संकल्पनेतून व्यक्त झालेले सामाजिक भान, प्रवृत्ति-निवृत्तीच्या दुविधेत पडलेल्या व्यक्तीला दिलेला निष्काम कर्मयोगाचा संदेश, व्यक्तींच्या वेगवेगळ्या क्षमता लक्षात घेऊन नीती आणि सदाचाराला पोषक असे अनेक व्यवहार्य मार्ग, सद्गुणाची गणना करीत असताना त्याच्या बरोबरीनेच दुष्ट, दुर्जन, आसुरी प्रवृत्तींवर टाकलेला प्रकाश, एकंदरीतच ऋग्वेदापासून दिसूनयेणारे उत्साही, कार्यप्रवण विचारांचे प्रवाह आपल्याला गीतेत ठिकठिकाणी झुळझुळताना दिसतात.

कोणतेही तत्त्वज्ञान प्रत्यक्ष आचरणात आणायला गेले की त्यात आचाराच्या बाजूने अनेक मर्यादा निर्माण होतात. संप्रदाय-उपसंप्रदायात झालेली फाटाफूट, कर्मकांड आणि अवडंबर, सामाजिक प्रतिष्ठेसाठी, अहंभावच्या पोषणासाठी धर्माचा वापर, साधु-बुवा-महाराजांच्या आहारी जाऊन तयार केलेली वैचारिक बेटे व झापडबंद वृत्ती- असे अनेक दोष काळाच्या ओघात तयार होतातच. हिंदू आणि जैन दोघेही त्यातून सुटलेले नाहीत. ते दोष शक्यतो दूर सारून परस्परांच्या जीवनोपयोगी विचारांची देवाणघेवाण करून आपण अधिकाधिक सुसंस्कारी व उदार होण्याचा प्रयत्न करू या !!

**********

## लेखांक ५० : आवाहन

पुणे विद्यापीठातील जैन अध्यासनाची जी उद्दिष्टे आहेत, त्यात, ‘‘जैन तत्त्वज्ञान, साहित्य, आचार आणि कलानिर्मिती यांची यथायोग्य ओळख आम समाजाला करून देणे’’-असे एक उद्दिष्ट नोंदवलेले आहे. त्याची परिपूर्ती व्हावी म्हणून गेली ३-३ ।। वर्षे जैन अध्यासन कार्यरत आहे. जैनविद्या-सामान्यज्ञान-प्रतियोगिता, जैनेतरांसाठी निबंधस्पर्धा, ‘सकाळ’ आणि ‘लोकमत’ मधून स्तंभलेखन, आकाशवाणीवरून ‘प्राकृत-सरिता’ कार्यक्रमाचे प्रसारण आणि इतरही अनेक उपक्रम राबविण्यात आले. लोकांकडून मिळालेला प्रतिसादही खूपच उत्साहवर्धक होता.

‘गुरुपौर्णिमा’ ते ‘ऋषिपंचमी’ हा चातुर्मासातील काळ भारतीय संस्कृतीत अतिशय पवित्र मानला जातो. ‘केवळ जैन तत्त्वज्ञानाची ओळख करून दिली तर अ-जैन त्याकडे कितपत लक्ष देतील ?’-याचा भरवसा वाटला नाही. ‘भगवद्‌गीता आणि जैन विचारांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला तर उत्सुकतेमुळे अनेक लोक वाचतील’-असा अंदाज केला. प्रथमत: ‘लोकमत’च्या संपादकांविषयी कृतज्ञता व्यक्त करते. त्यांनी योजनेला संमती तर दिलीच परंतु माझा भ्रमणध्वनीचा क्रमांक आपणहून देऊन जनसंपर्कालाही वाव दिला.

स्तंभलेखनाच्या कालावधीत अक्षरश: शेकडो दूरध्वनी आले. जैन आणि अ-जैन यांची टक्केवारी अंदाजे ४०-६० होती. एक-दोन दूरध्वनी वगळता सर्व प्रतिसाद पुरुषवर्गाकडून मिळाला. एकूणातील ९५ टक्के दूरध्वनी रसग्रहणात्मक दाद देणारे होते. अंदाजे ५ टक्के लोकांनी प्रतिकूल अभिप्रायही व्यक्त केले. त्यांचा आशय बहुतांशी असा होता-

१) या दोन्ही विचारधारा एकत्रित करून का दिल्या ?
२) तुम्ही नेमक्या कोणत्या बाजूच्या आहात ?
३) श्रीकृष्णाच्या जीवनाचे रहस्य श्रद्धेने समजून घेतल्याशिवाय गीतेचे अंत:करण आपणास कसे उमगेल ?
४) अनेक विवाद्य मुद्यांवर आपणाशी चर्चा करणे आवडेल.
५) जैनांबरोबरच बौद्धांचे विचारही सांगितले असते तर बरे झाले असते इ.इ.

प्रिय वाचकहो, जैन अध्यासन आपल्या प्रतिक्रिया लेखी स्वरूपात जाणू इच्छित आहे. आपल्या अनुकूल आणि प्रतिकूल प्रतिक्रिया-कारणांसह स्पष्ट करून-जैन अध्यासनाकडे पाठवा. लेखन मर्यादा कृपया एक फुलस्केप असू द्या. त्यातील निवडक प्रतिक्रियांना जैन अध्यासनाकडून योग्य पारितोषिक मिळेल. स्वत:चे नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक लिहायला विसरू नका.

आपल्या प्रतिक्रिया व सूचना पोस्टाने पुढील पत्त्यावर पाठवा.

**डॉ. नलिनी जोशी, जैन अध्यासन, आंबेडकर भवन, तत्त्वज्ञान विभाग**
**पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ४११००७**

**********